

दिशा

डॉ. सुहास पेठे

दिशा

(वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त दिशा..)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* दिशा

पुस्तकरूपाने प्रकाशित चौथी आवृत्ती : ऑगस्ट २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : **www.pethekaka.com**
युट्यूब चॅनेल : **Shri Pethe Kaka**
अँड्रॉईड ॲप : **SadhanNandadeep** (साधननंदादीप)

अपरिहार्य वास्तवाच्या
कधी दिशाहीन, कधी संभ्रमित
प्रवाहात जगतानाही
शाश्वत कल्याणाची दिशा
जपण्याचा प्रयत्न करणाऱ्या,
करू इच्छिणाऱ्या
सर्वांना -

विधायक चिंतनाच्या
या काही
दिशा..

सादर समर्पित...

- सुहास पेठे

दिशा

अनुक्रमणिका

१. नोकरांचे नोकर .. ५
२. एका लग्नाचे दोन हार .. ८
३. पडद्यावरची पत्रं ..१०
४. बोटांवरची शाई ..१३
५. स्वागतार्ह अपयश ..१६
६. कर्तृत्वाचा वाटा ..२०
७. बिनवासाची फुलं ..२४
८. कृतज्ञतेपलीकडं ..२७
९. मदतीचं गणित ..३३
१०. सहजीवनाचे दीप ..३८
११. विसावा, टप्पा की मुक्काम ? ..४३
१२. भेट परतभेट ..४९
१३. गुण कशात ? ..५५
१४. पेटीतली बाळं ..६१
१५. निःशंकांचा पेच ..६८
१६. देवाची मुलगी ..७६
१७. सत्प्रवृत्तींची वाटचाल ..८२
१८. डाकू कोण ? ..९१
१९. औषध की विष ? ..९६
२०. अकरावी दिशा.. ..१०३

१. नोकरांचे नोकर

स्वयंपाक होत आला. सर्वांना चांगलं, ताजं जेवायला मिळावं म्हणून संध्याकाळी ऑफिस करून घरी आल्यावरसुद्धा ताजा स्वयंपाक करण्याची मनीषाची धडपड होती. जेवण होत आलं म्हणून तोवर ताटं-वाट्या मांडण्यासाठी मुलीची मदत घ्यावी म्हणून मनीषानं मुलीला हाक मारली. तिला ती ऐकू गेली नसावी, हे मनीषाच्या लक्षात आलं. कारण तिच्याकडून काही प्रतिसादही आला नाही. ओ ही ऐकू आलं नाही. म्हणून तिच्या खोलीत जाऊन तिला सांगून यावं म्हणून तिच्या खोलीत डोकावली तर तिनं हातानंच, काय ? म्हणून खूण केली. पानं घ्यायला जरा मदत करतेस का ? म्हटल्यावर कानावरचा मोबाईल न हालवता हातानंच, पाच मिनिटांनी, म्हणून तिनं खूण केली.

आई परत घरात आली. पाच-दहा मिनिटांत स्वयंपाक झाला. मुलीचा पत्ता नव्हता. शेवटी पुन्हा सांगत बसण्यापेक्षा मनीषानं हाताबरोबर पानं घेतली. मुलाला हाक मारली. त्यानं पाच मिनिटांत येतो म्हणून आपल्या खोलीतूनच उत्तर दिलं. मुलांच्या वडिलांना हाक मारावी म्हणून तिनं हॉलमध्ये जाऊन, जेवायला झालं, येताय ना, म्हटलं. ते टीव्ही पहात होते. ते म्हणाले, अग महत्त्वाचा एपिसोड आहे. दहाच मिनिटांत संपेल. लगेच येतो. तोपर्यंत मुलांना बोलव. आता त्यांना काय बोलायचं म्हणून मनीषा पुन्हा मुलांच्या खोल्यांकडं गेली. तोवर मुलाचा कॉम्प्युटरवरचा गेम अगदी रंगात आला होता. जरा थांब आलोच, म्हणून त्यानं वरही न पहाता उत्तर दिलं.

मनीषा मुलीच्या खोलीकडं गेली. तोवर तिच्यासमोरच मुलीचा मोबाईल पुन्हा वाजू लागला. दुसरा कॉल आला होता. एवढा घेऊन येते,

अर्जंट आहे असं म्हणून तिनं मोबाईल उचलला. मनीषा पुन्हा स्वयंपाकघरात परतली. टेबलावर ठेवलेलं अन्न वाफा देत गार होत चाललं होतं. मनीषा शांतपणे खुर्चीवर बसून राहिली. जवळपास अर्धा तास कुणीही किचनमध्ये फिरकलं नाही. अन्न गार झालं. मग एकेकजण यायला सुरुवात झाली. मग आधी आलेल्या वडिलांनी नंतर आलेल्या मुलांवर राग काढला. मुलांनी एकमेकांवर राग काढला. तुझ्यामुळं उशीर झाला असं एकमेकांना म्हटलं. खरं कुणीच मान्य करीत नसल्यानं नुसतीच रागवारागवी होऊन सारे जेवायला जागेवर बसल्यावर मनीषा स्वतःचा राग, खेद, कंटाळा झटकून उठली आणि तिनं सर्वांना वाढायला सुरुवात केली.

अशा कित्येक मनीषा घरोघरी आहेत. त्यांची अशीच चिडचीड होते आहे. ताज्या स्वयंपाकाचेच नव्हे तर अनेक प्रकारचे कष्ट वाया जात आहेत. ताजं, गरम अन्न गार-शिळं होऊन पोटात जातं आहे. व्हायचे दुष्परिणाम होतात. विशेषतः दुसऱ्यानं आपण होऊन घेतलेल्या कष्टांची जाणीव तर सोडाच पण चीजही होत नाही. एक तर असे कष्ट करणारा त्रस्त होतो, रागावतो, नाही तर सारं सोडून देतो.

मुळात टीव्ही आला तो घरात बसून जगाची माहिती, संपर्क पुरवण्यासाठी. तो आम्हाला उपयोगी पडणाऱ्या साधनांतला एक. आपला एक मदतनीस. एक नोकर. त्यानं माहितीबरोबर हळूहळू करमणुकीच्या गूढ, अजब गुहेत प्रवेश केला. त्या जादूच्या पोतडीतून अशा काही चांगल्यावाईट चीजा काढायला सुरुवात केली की, बघणारा केव्हा बेसावध झाला ते त्या बघणाऱ्यालाही कळलं नाही. अनेकदा जागं करूनही कळलं नाही. हळूहळू नोकरानं मालकाचा ताबा घेतला. मालकानं बाहेर केव्हा जायचं, बाहेरून केव्हा यायचं, समोर किती वेळ, कधी कधी बसायचं हे आता हा टीव्हीसारखा एक निर्जीव नोकर ठरवू लागला. त्यापुढं घरातल्या

माणसाची, त्याच्या महत्त्वाच्या जिवंत कष्टांची किंमत उरली नाही.

तेच गेमनं मुलांचं केलं, मोबाईलनं वापरणाऱ्यांचं केलं आहे. किती नोकर आता मालकाच्या डोक्यावर बसले आहेत. त्यात एकमेकांना द्यायचा गरजेचा वेळ कमी होतो आहे, त्यामुळं वाचन-फिरणं-व्यायाम-सामाजिक कर्तव्यं अशा अनेक चांगल्या गोष्टींना हवा असलेला वेळ खाऊन टाकला आहे. त्याचा परिणाम अस्वास्थ्यात झाला आहे. वस्तूंच्या, या नोकरांच्या गरजा लक्षात घेऊनसुद्धा आपण त्यांना त्याचं स्थान मालक म्हणून दाखवून देऊन, हे चित्र सुधारणं गरजेचं नाही का ?

नाही तर ही नोकरांची नोकरी करीत राहाण्याची नामुष्की कायम पदरी येईल. बरं, या नोकरीत निवृत्तीसुद्धा नाही, कारण मनानं बेसावधपणे पत्करलेली नोकरी आहे. या गुलामगिरीचं स्वरूप वेळीच ओळखलं नाही तर निवृत्तीपर्यंतच नव्हे तर मरेपर्यंत ही नोकरी करून विनाश ओढवून घ्यावा लागेल, हे खरं ना ?

२. एका लग्नाचे दोन हार

अनेकांना आपलं सामान्यपण नकोसं वाटतं, काही तरी करून असामान्य व्हावं - असं वाटतं. लोकांनी त्याची दखल घ्यावी, आपल्याला हार घालावा, असं वाटतं. वास्तविक थोडी विधायक, वेगळी कल्पना, तिचा निष्ठेनं पाठपुरावा, त्यासाठी स्वतः शारीरिक, आर्थिक झळ सोसणं - असं काही केलं तर थोडं का होईना, असामान्यपण मिळवणं अशक्य नाही. मग ते कुणाही रुग्णाच्या सेवेला जाणं असो, कुणा गरजूला निरपेक्षपणे मदत करीत राहाणं असो, कुणा मुक्या प्राण्यांना चारा घालणं-पाणी देणं असो- अक्षरशः अगणित मार्ग सामान्य माणसांनाही उपलब्ध असतात.

पण त्यासाठी लागणारे कष्ट, स्वतःला तोशीस कुणाला नको असते. ज्यांची तयारी असते ते, ते करतातच. ते हाराचेही मानकरी होतात. पण हे नको असणारी माणसं सामान्य असतात. अशा सामान्य माणसाला तसे हार स्वीकारण्याचे प्रसंग बिचाऱ्यावर दोनदा येतात. पहिला स्वतःच्या लग्नात, विधीचा भाग म्हणून समजून उमजून अन् दुसरा शेवटच्या दिवशी अंत्यविधीपूर्वी, नकळत ! भले तो व्यवहारात कितीही कर्तृत्ववान असो नसो. रीतरिवाज म्हणून हे दोन हार पडून तो कृतकृत्य होतो.

कदाचित काहींच्या वाट्याला, तो पुरुष असो वा स्त्री, जर नोकरी करीत असेल तर निवृत्तीच्या दिवशी निरोपसमारंभ झाला तर पडण्याची शक्यता. शक्यता अशासाठी की, तो नोकरीत इतरांशी कसा काय वागला यावर हार की गुच्छ हे ठरतंच.पण मुळातच त्याला समारंभानं निरोप द्यायचा की नाही हेही ठरतं. पण प्रामाणिकपणानं, निदान किमान चांगुलपणा ठेवून वागला, तर हा तिसरा हारही शक्य असतो, मिळतो.

पण अलीकडं लग्नाच्या एकाच प्रसंगात होणारं कौतुक ताणून एका हाराचे दोन हार पदरात पाडून घेऊन काही काळ तरी एकाच लग्नाच्या कर्तृत्वा(?)वर दोन हार मिळवण्याचा प्रयत्न जोरात आहे, तो म्हणजे साखरपुडा ! तो लग्नासारखा करून हा चौथा हार मिळवण्याचा प्रयत्न सर्रास सुरू झालेला दिसेल. वास्तविक दोन घराण्यांचा विवाहाचा विचार पक्का झाला, त्याचे तपशील ठरले, त्याला सर्वांनी संमती दिली की त्यानिमित्तानं एका पुड्यात साखर देवासमोर ठेवणं आणि ही बातमी सर्वांना तोंड गोड करून सांगण्यासाठी ती साखर सर्वांना वाटणं. एवढी जरूर असलेला हा छोटासा आनंददायी प्रसंग ! तो खरा किती सुटसुटीत, विशेषतः दोन्हीही बाजूच्यांना सोयीचा, अकारण खर्च टाळणारा, सर्वांना आश्वासक !

मात्र अलीकडं जणु काही एकच लग्न दोन वेळा साजरं होतं आहे की काय असं वाटावं असा या साखरपुड्याचा आग्रह, विशेषतः मुलाच्या पक्षाकडून धरला जातो. मुलीच्या बाजूला अजून तरी नाईलाजानं लग्नासारखं कार्यालय घेण्यापासून हारतुऱ्यांपर्यंत सगळं करावं लागतं. साजरं करण्यासारखं कुठल्याच क्षेत्रातलं कर्तृत्व तथाकथित मुलाकडं नसतं की काय म्हणून त्याच एका लग्नाच्या तिकिटावरच हा दुसरा हार मुलगा स्वीकारतो. तोच त्याचा त्याच्या आयुष्यातला बहुधा चौथा हार ठरतो !

खरं तर सामान्यांनीसुद्धा कर्तृत्व करून चौथाच काय कितवाही हार मिळवण्याची जिद्द जरूर जरूर बाळगावी. पण यावर थोडा विचार करून अशा अकारण साखरपुड्यातला हार हा हार नसून 'कर्तृत्वाची हार' आहे, हे लक्षात घेऊन, तो नाकारणारा मुलगा व्हावं. त्याला योग्य पाठिंबा देणारे नातेवाईक आणि सामाजिक घटकसुद्धा नक्की पुढं येतील !

३. पडद्यावरची पत्रं

ऑफिसमध्ये चांगली पंचवीस-तीस वर्षं नोकरीत काढलेले एक गृहस्थ माझे मित्र आहेत. ते विशेषतः पेनचे शौकीन आहेत. पूर्वी शाईची पेनं होती तेव्हासुद्धा कार्यालयीन कामात चालणाऱ्या निळ्या, काळ्या, तांबड्या अशा शाईची कितीतरी प्रकारची पेन्स त्यांच्याकडं असत. खास पॉइंटची, टाकासारखे तिरके छाट असलेली, शीर्षकं देण्यासाठी वेगळी,सतत भरपूर काम असलं तर शाईची जंबोसाइझ - अशी खूप पेन्स ते बाळगीत असत. अनेकदा ते परगावी असोत किंवा गावात असोत, गडबडीत असले की, पत्रानं भेट घेत. ती पत्रं आमच्याकडं जपून ठेवली जात. त्यांची पेनची आवड आणि चोखंदळपणा पाहून मी त्यांच्या वाढदिवसाच्या आधी अनेक दुकानांत हिंडून त्यांच्याकडं न आढळलेलं एखादं पेन हुडकण्याचे कष्ट घेत असे. विशेष करून पुण्या-मुंबईकडं आधी कधी खेप झाली तर तिथं चार दुकानं हिंडून ते आणूनही ठेवीत असे.

त्या काळातले टाइपरायटर मागं पडतील अशा नेटक्या स्वरूपात ते गृहस्थ हाती पत्र लिहीत असत. अनेकदा काही महत्त्वाची पत्रं त्यांच्याकडून हाती लिहवून घेतली जात आणि त्याच्या झेरॉक्स प्रती काढून इतर कार्यालयांना परिपत्रकं जात. हे स्वतः अधिकारी झाले तरी हे काम असंच चालू राहिलं होतं. त्यांच्याकडून आलेलं पत्र टेबलावर पडलेलं असलं तर लांबून जाणाऱ्या-येणाऱ्याची नजर वेधून घेतल्याखेरीज राहात नसे. पुढं बॉलपेन्स-जेलपेन्सचा जमाना आला आणि त्यांनी काळानुरूप शाईच्या पेन्सचा शौक जपला असला तरी त्यात बॉलपेन्स-जेलपेन्समधली व्हरायटी शोधून आपला छंद, वेगळेपण आणि उपयुक्तता अजूनही जपली होती.

मध्यंतरी दोन-तीन वर्षं मी बदलीच्या निमित्तानं परगावी राहायला गेलो. संपर्क थोडा कमी झाला. मधली खबरबात कळली नाही. म्हणून पुन्हा मूळ गावी बदली होताच त्या गृहस्थांच्या ऑफिसमध्ये चक्कर टाकली. आत गेल्यावर तर ऑफिसच मुळात ओळखू येईना. आत वातानुकूलित यंत्रणा बसवलेली असल्यानं दारं काचेच्या तावदानांची झाली होती. त्यातही ती 'पुश-पुल'चे बोर्ड झळकवून बंद केलेली होती. त्यात बाहेर एक बंदूकधारीही उभा होता.

ओळख सांगून आत गेलो. सुदैवानं ते साहेब असेच मध्ये कुठं तरी दोन वर्षं बदलीवर काढून पुन्हा त्याच ऑफिसमध्ये आले होते. आतला सारा नूरच फर्निचरनं पालटून टाकला होता. ज्याच्या त्याच्या टेबलवर एकेक संगणक, मॉनिटर, माऊस. मागल्या एका कोपऱ्यात छोट्याशा पण आकर्षक केबिनमध्ये ते बसलेले दिसले. त्यांची नजर मॉनिटरवर होती. एक-दोन मिनिटांनी त्यांनी वर पाहाताच मी लांबून हात केला. त्यांनी आत बोलावलं. बसायला एकट्यापुरतीच जागा होती.

मी सहज त्यांच्या टेबलवर नेहमीप्रमाणं उजव्या हाताला पाहिलं. तिथं नेहमी त्यांचा तो प्रसिद्ध, आवडता पेनसंग्रह ठेवलेला असे. ती जागा रिकामीच होती. खरं तर पूर्वीच्या मानानं ते टेबलच मुळात एवढं लहान होतं की, त्यावर असं काही ठेवणंही शक्य नव्हतं, हे दिसतच होतं. त्यांनी हसून स्वागत केलं. त्यामुळं मी जरा सावरून म्हटलं, 'ऑफिसनं अगदी कात टाकली आहे तुमच्या !' ते दिलखुलास हसले. तसे या बदलानं ते खिन्न नव्हते. ते शाईपेनवरून बॉलपेनवर, बॉलपेनवरून जेलपेनवर आले तसेच ते अलगद माऊसवर आले होते. मला ते पाहून एकीकडं बरं वाटलं पण त्या पेनांची नि पत्रांची आठवण डोक्यातून जात नव्हती.

त्यांनी माझी अस्वस्थता बहुधा जाणली असावी. ते म्हणाले 'अहो,

आता संगणकीकरण. सगळा बोटांचा नि बटणांचा कारभार. आता हातानं लिहायची जरूरच नाही उरली. फक्त तर्जनी चालवायची की मध्यमा तेवढं ठरवायचं. लेफ्ट क्लिक, राइट क्लिक. छान आहे ! एका बोटानं मी अख्खा की-बोर्ड टायपिस्टपेक्षा वेगानं चालवतो. फक्त चुकून कुठं मस्टर, पोस्ट-कुरिअरची पावती आली तर सहीसाठी खिशाचं पेन काढायचं. आता तर मस्टरही जाणार. रोजच्या सहीच्या निमित्तानं पेन उघडलं जाई. आता कार्ड पंच होणार. कधी महिन्याभरातनं खिशाचं पेन काढलं तर ते पेन निदान चाललं म्हणजे मिळवली ! आता फक्त पडद्यावर नजर ठेवून राहायचं. तिथं ढीगभर परिपत्रकं, पत्रकं, पत्रं येतात. ती शक्यतो तिथंच वाचायची. पुन्हा पडद्यावरच पत्र लिहायची. त्यांना सही लागत नाही. लागलीच तर संगणक करतो. फक्त सारे पासवर्ड लक्षात ठेवायचे. माझं घरगुती, खासगी पत्रसुद्धा आता पडद्यावर येतं - जातं..!'

ते अजूनही काही बोलत होते. पण माझ्या डोळ्यांसमोरची ती देखणी पत्रं, परिपत्रकं जाईनात. मनाच्या मोठेपणानं काळाच्या रेट्याबरोबर आलेला पत्रं लिहायचा स्क्रीन - पडदा त्यांनी आपला केला होता. पण त्यांची वेगवेगळ्या वळणाच्या हस्ताक्षरांतली पत्रं, पत्रं काय कलाकृतीच होत्या त्या, त्या गेल्या, त्यातला नेटकेपणा गेला, सौंदर्य गेलं, प्रतिभा-कल्पकता गेली, लिखाणाला असलेला व्यक्तित्वाचा स्पर्श हरवला, असं बरंच काही. मी एसीनं आधीच गारठलो होतो, या साऱ्यानं अजूनच गारठलो. त्यांनी दिलेला चहा घेऊन घर गाठलं. त्यांच्या हस्ताक्षरातल्या त्या कलाकृती हुडकून जपून ठेवण्यासाठी - माझ्यासाठीच नव्हे तर माझ्या पुढच्या पिढीसाठीही. त्या पिढीला लिहिणारे पाहायला मिळणार की नाही कुणास ठाऊक, निदान त्यांच्या कलाकृती तरी सोपवण्यात कसूर नको म्हणून !

४. बोटांवरची शाई

एक मध्यम शहर. त्यातले एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विद्वान. भारतातल्या सर्वोच्च पदव्या मिळवलेले. उमेदीच्या काळात परदेशात जाऊन तिथं अधिक शिक्षण घेऊन पदवी घेऊन आलेले. आपल्या क्षेत्रात अधिक संशोधन करून देशावरच्या प्रेमापोटी बाहेर परदेशी संधी असूनही कुठं न जाता आपल्याच गावात औद्योगिक क्षेत्रात एक युनिट त्यांनी सुरू केलं. उत्तम सुरू होतं. त्यांचं संशोधनपर लेखन भारतात, भारताबाहेरच्या नियतकालिकांतही प्रसिद्ध होत असे.

आपल्या लोकशाहीचा सुवर्णमहोत्सव साजरा होऊन गेला. त्यानंतर आता हीरक महोत्सवही झाला. दरम्यानची एक संसदीय लोकशाहीची सार्वत्रिक निवडणूक होती. आमच्या शहरातल्या मतदानाच्या बूथवर ते योगायोगानं रांगेत पुढंच उभे होते. योग्य ठिकाणी नाव नसणं, पुढं ते कुठल्या तरीच ठिकाणी मिळणं वगैरे सोपस्कार सुरू होते. ते सुदैवानं लवकर यशस्वी झाले. त्यांचं नाव सापडून सही करून ते पुढच्या टेबलवर गेले. तिथून ते त्यांच्याच नादात गडबडीत पोलिंग बूथकडं जाणार होते तेवढ्यात वाटेतल्या टेबलवरच्या माणसानं त्यांना अडवलं, टेबलवर हात ठेवायला लावून त्यावर मतदान केल्याची खूण असलेली, न पुसणारी शाई उठवली. 'ओह, यस्' म्हणत त्यांचा हात रंगून ते बोट वाळेपर्यंत सांभाळीत ते मतदान कक्षाकडं मतदानासाठी गेले.

त्यांच्यासारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या व्यक्तीचं मतदान मी शांतपणे पाहात होतो. सुशिक्षित शब्द जरा कमी वाटावा इतके ते उच्चशिक्षित होते. त्यांच्या विषयातलं नुसतं तांत्रिक ज्ञान त्यांना होतं असं नाही,ते जगन्मान्य

होतं, त्यातही त्याचा उपयोग त्यांनी स्वदेशासाठी करून स्वतःचा तसा व्यावहारिक तोटाही काही तत्त्वांसाठी पत्करला होता. एवढंच नव्हतं, मतदानाच्या कर्तव्यासाठी त्यांनी वेळात वेळ काढला होता. त्यासाठी त्यांची कार त्यांना नुकतीच बूथवर सोडून गेलेली मी पाहिली होती. बूथवरच्या नियमांना त्यांनी सुसंस्कृतपणे केलेलं सहकार्य तर मी पाहिलं होतंच. फक्त माझ्या डोळ्यांसमोर त्यांच्या बोटावरचा सर्वांना सारख्याच अविश्वासानं लेखणारा, न पुसला जाणारा शाईचा वेडावाकडा थेंब दिसत होता, अस्वस्थही करीत होता. जाताना समजूतदार स्मितहास्य करून मला ओळख देत ते निघून गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळची वर्तमानपत्रं नेहमीप्रमाणं मतदानाच्या रंगीबेरंगी बातम्यांनी भरलेली होती. सर्वांत पहिल्या नि शेवटच्या पानावर झळकत होते ते मोठमोठ्या राजकारणी-थोर मंडळींचे मतदानाचे फोटो. त्यांतही अनेकजण उच्चशिक्षित होते, अतिउच्चशिक्षित होते. सर्वजण उच्चपदस्थ होते. कुणी पंतप्रधान, शिक्षणमंत्री, गृहमंत्री, वेगवेगळ्या पक्षांचे प्रमुख प्रत्येक जण आपलं बोट उलटं वर करून हास्यमुखानं मतदान पार पाडल्याचं दर्शवीत होते. सर्वांच्या चेहऱ्यावरचे कृतकृत्यतेचे भाव स्पष्ट जाणवत होते.

पण मला मात्र का कुणास ठाऊक एक अस्वस्थता जाणवत होती. सुदैवानं कालच्या त्या प्रतिष्ठित पण समजूतदार गृहस्थांची संध्याकाळीच एका कार्यक्रमाच्या निमित्तानं गाठ पडली. नंतर ते घरी सोडायला आले ते थोडा वेळ काढून बसले.

मी म्हटलं, 'तुमच्या सारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या विद्वानाच्या बोटावर मतदानाच्या शाईचा ठिपका उठवल्यानं अस्वस्थता वाटली.'

'हो, यात थोडी अस्वस्थता येते हे खरं. देशाची दुर्दैवी अवस्था

आहे. अविश्वासाचा प्रश्न आहे. आपण सही तर करतोच आहोत. अनेक भाषासुद्धा आपल्याला येतात. चाललेला व्यवहार, प्रसंगही आपल्याला कळतो आहे. भले त्यात आपल्या मताला किंमत असो वा नसो. देशाच्या कारभारातलं आपलं कर्तव्यही आपण प्रामाणिकपणे बजावायला गेलो आहोत. आपण एक साक्षर आहोत, सुशिक्षित आहोत पण तशी परिस्थिती आज स्वातंत्र्य मिळून पन्नास-साठ वर्षं झाली तरी देशातल्या सर्वांची नाही. त्यामुळं आजही आपल्याला हत्ती, घोडे, बाण, घड्याळं, झाड असल्या खुणांवर अवलंबून राहावं लागतं आहे. हे आपलं दुर्दैव आहे. आपल्याला आपल्या अपेक्षित नेत्याचं नावसुद्धा वाचता येत नसेल तर त्यांची मनं काय वाचता येणार ? अन् पुढं पाच वर्षं आपल्या होणाऱ्या फसवणुकी अन् सामान्यांची पिळवणूक अन् त्याच्या मोठमोठ्या अंतस्थ योजना काय वाचता येणार ? मग लोकशाहीची कल्पना बाल्यावस्थेतच काय, कल्पनेतच राहिली असली तर नवल नाही !'

ते निघून गेले. मला वाटलं, हा प्रश्न गंभीर तर आहेच पण इतका सोपाही नाही. निरक्षरांचं एक वेळ समजू शकतं. पण साक्षरांकडूनसुद्धा पुन्हा मतदान होऊ नये म्हणून एखादी शारीरिक जखम करावी तशी नखावरच नव्हे तर जवळच्या त्वचेवरही खूण करावी लागते हेही दुर्दैवच. आम्ही पन्नास-साठ वर्षांत लोक साक्षर तर बनवू शकलो नाहीच पण जे शिकले तेही एवढे प्रामाणिक बनवू शकलो नाही की, एकदा स्वतः मतदान करून आल्यावर ते किंवा इतर कुणी, कुठं पुन्हा मतदान करणार नाही. आपल्या शिक्षणातल्या कसाचा विचार आपला स्वतंत्र देश किंवा देशवासी करतील तो दिवस भाग्याचा ! नाहीतर स्वातंत्र्याचा शतक महोत्सव झाला तरी बोटांवर शाई लावली जाईलच, वर्तमानपत्रांतले बोटं दाखवणारे व स्मितहास्य करणारे फोटोही येत राहतील..!!

५. स्वागतार्ह अपयश

माझ्यासमोर सुदैवानं दोन्ही चित्रं होती. प्रत्यक्ष जगणारे दोन वेगवेगळ्या घरांतले दोन तरुण होते. दोघेही बऱ्यापैकी बुद्धिमान, घरचे बरे. शिवाय महत्त्वाकांक्षी. त्यालाही पालकांची साथ. त्यामुळं पुढं पहिला चांगले मार्क्स् मिळून मेरिटवरच इंजिनिअरिंगला प्रवेश मिळवून शिकायला लांबच्या गावी गेला. दुसऱ्याची बुद्धिमत्ता तेवढीच असली तरी शेवटी केवळ काही मार्क्स् कमी पडून त्याला मेरिटवर प्रवेश मिळाला नाही. थोडं धडपडावं लागलं. आईवडिलांना शेवटी देणगी उभी करावी लागली. पालकांची नाही म्हटलं तरी थोडी धावपळ झाली, थोडी नाराजीही.

वेगवेगळ्या गावी दोन्ही मुलांची पहिली वर्षं पार पडली. पहिल्यानं प्रथमपासूनच हुशारीनं अभ्यासाचा अंदाज घेऊन काम केलं असावं. तो सुटला इतकंच नव्हे तर पहिला वर्गही त्याला मिळाला. दुसरा कसाबसा पास झाला पण एटीकेटीचा शिक्का बसूनच. तिकडं पहिल्यानं मागं वळून पाहिलंच नाही. तो सदैव उत्तम यश मिळवीत गेला. शेवटी चांगल्या मार्कानं पदवी मिळाली, शेवटच्या परीक्षेपूर्वीच कॅम्पस्-सिलेक्शनमुळं नोकरीही चांगल्या कंपनीत ठरली होती. तो बारावीनंतर एकदम पदवीचे पेढे द्यायला आला पण रुबाबातच आला, बसला तो टाईम्स वगैरे चाळत. बहुधा आईवडील जा म्हणून सांगतात, तसा आलेला. सगळं आयुष्यच जणू काही असं आखून यशस्वी करीत जाणार. कारण तिथं परदेशी जायची, अधिक पैशाची संधी होती याची त्याला खात्री होती. लग्न वगैरेचेही निर्णय ठरले असावेत असं बोलण्यात जाणवत होतं. मी शुभेच्छा दिल्या.

दुसरा दुसऱ्या वर्षी पहिले विषय न सुटल्यानं अडकला. त्याची

बुद्धिमत्ता कमी नव्हतीच फक्त थोडा आत्मविश्वास कमी पडला. अपयशामुळं घरचं पाठबळ कमी पडलं. इतर आवडत्या विषयांच्या वाचनामुळं, मित्रमंडळी, काही उपक्रम यांमुळं अभ्यासाकडं थोडं दुर्लक्ष झालं, म्हणून अडकून जायला झालेलं दिसत होतं. मी पाहिलं की, त्याचं सर्कल काही तसं वाईट किंवा उनाड मुलांचं नव्हतं. पण इतर सगळ्यांवर जाणारा वेळ थोडा जास्त होता. त्याला थोडी समाजकार्याची आवड होती. त्यामुळं तशा संस्थांत जाणं-येणं, उपक्रम होते. त्यात वेळ जात होता. चार लोकांना त्याची मदत मात्र मोठी होती. अभ्यासातही गुण कमी पडले तरी इतरांची सहानुभूती खूप होती. ते आपण होऊन त्याची कामं करून त्याला अभ्यासाची आठवण देत होते. त्यासाठी मोकळा करीत होते. अनेक अडचणींत वृद्धांना, मित्रांना त्याचा आधार वाटत होता.

त्याच्या खेपा आमच्याकडंही वारंवार होत. तो सश्रद्ध होता. त्याला ईश्वराबद्दल कुतूहल होतं. जिज्ञासा होती. त्याचं वाचन होतं. नापास होऊन अडकावं एवढी त्याची बुद्धिमत्ता कमी नव्हती तरी त्यातून आता त्याला जावं लागणार होतं. त्याचा वापर कसा करावा याचं नियोजन आपण केलं पाहिजे याची एक स्वागतार्ह समजूत त्याला आली होती. त्या समजूतदारपणाला हे शैक्षणिक अपयश कारणीभूत ठरलं होतं. त्यानं चर्चा करून वर्षाचा योग्य लाभ घ्यायचं ठरवलं. त्याला या थोड्या शैक्षणिक पीछेहाटीच्या दिवसांत दिलासा देणाऱ्या, धीर देणाऱ्या, मदत करणाऱ्यांबद्दल कृतज्ञता निर्माण झाली. राहिलेलं वर्ष सुटून गेलं. पुढचीही सुटली. अपयशाच्या थोड्या कडू-गोड टप्प्यानंतर वर्षभर उशीरा, पण चांगला संतुलित होऊन तो बाहेर पडला. चांगलं यश घेऊन. थोडे प्रयत्न करून त्यानं इतर एक डिप्लोमाही वर्षभर केला. दोन वर्षं उशीरा पण त्यालाही चांगली नोकरी लागली. तोवर त्यानं जाणीवपूर्वक बुद्धिमत्ता, चांगुलपण,

इतर माणसांची पारख, त्यांची मदत-स्थान ओळखणं, त्यांच्याही उपयोगी पडणं-अशा अनेक गोष्टींनी व्यक्तिमत्त्वाचं संतुलन मिळवलं होतं.

त्याच्या आयुष्याचे पुढचे प्लॅनही कुठं आकाशात गवसणी घालण्याचे नव्हते. आईवडिलांना सांभाळायचं होतं. आहे त्या कंपनीत अनुभवानं प्रगती करायची होती. आईवडिलांच्या पिढीत जमलं नव्हतं ते घर त्याला त्यांना बांधून द्यायचं होतं. त्याची सामाजिक कामालाही मदत त्याला वाढवायची होती. आता हाताला सवड झाली की, तो शारीरिक कष्टांबरोबर त्या सेवाभावी संस्थेत आर्थिक मदत करू इच्छीत होता. साऱ्या बारीकसारीक घटनांतही त्यानं संपर्क कायम ठेवला होता, त्यामुळं माझ्याशीही त्याचा आत्मीय संबंध जुळलेला होता, तो उलट वाढला होता. त्याच्या सत्संकल्पांना मूर्त स्वरूप यावं, त्याचे पाय असेच जमिनीवर राहून त्याच्यापासून इतरांनाही शिकायला मिळावं असं वाटत होतं.

असाच एकदा आला असता मी सहज त्याला विचारलं, 'आता तू नोकरीतसुद्धा स्थिरस्थावर झालास. पुढं काही दोनाचे चार हात करणार की नाही ?'

त्याचा होकार लक्षात आल्यावर त्याला सहज म्हटलं, 'काही विशेष अपेक्षा वगैरे आहेत की, आपलं तुझंतुझं काही ठरलं वगैरे आहे ?'

'नाही, तसं काही ठरलेलं नाही. मोठी माणसंच ठरवा. फक्त एवढीच अपेक्षा आहे की, जिनं आयुष्यात कुठल्या तरी बाबतीत निराशा, अपयश सोसलं आहे आणि त्यातून काही शिकली आहे अशी मुलगी पहा - म्हणजे झालं !'

मी म्हटलं, 'अरे ही काय अपेक्षा आहे ?'

तो म्हणाला, 'मी विचारपूर्वक अन् तुमचा पूर्वीचा मोलाचा सल्ला लक्षात ठेवूनच बोललो आहे. विनाथांबा यशस्वी गाड्यांपासून जरा सावधच

राहावं. अपयशानं येणारा समजूतदारपणा माणुसकीचीही ओळख ठेवतो आणि देवाचीही. प्रपंचातही गोडी आणतो अन् व्यवहारातही ! त्यामुळं असं सावध अपयश स्वागतार्हच असतं ! असं तुम्हीच एकदा म्हणाला होतात ना ?'

माझ्याच वाक्यानंतर मी काय बोलणार होतो ? त्यातल्या सत्यामुळं आणखी एक जीवन घडतानाचा आनंद त्याच्यारूपानं मला मिळत होता. त्याचं जीवन जमिनीवरचे पाय न सोडता समृद्ध होणार होतं. अधिक संतुलित होणार होतं. एका अपयशाची चव योग्य पद्धतीनं घेऊन घडलेलं एक भावी यशस्वी जीवन मला आकाराला येताना दिसत होतं. ते स्वतः माणुसकीचं होतं, समृद्ध होतं आणि इतरांना आधारभूत ठरणारं होतं. त्याची छोटी सुरेल नांदी मी ऐकत होतो !

६. कर्तृत्वाचा वाटा

माझ्यासमोर एक मध्यमवयीन कर्तृत्ववान बाई बसल्या होत्या. वृद्धत्व खुणावीत असलेल्या. म्हणाल्या, 'माझे वडील वारकरी होते. लहानपणापासून गरिबी. घरी थोडी फार शेती होती. गाई, गुरं, गोठा. भाजीपाला विकावा लागे. पण आम्ही शिक्षण घ्यावं म्हणून ते सारखे मागं असत. घर आल्यागेल्याचं होतं. अडीनडीला धावण्याचं होतं. मी शिक्षणात पुढं गेले. चांगलं स्थळ मिळून मुंबईत नोकरीनिमित्तानं राहिले. फिरत्या, बदल्याही झाल्या. आर्थिक विवंचना आम्हाला कुठल्याच नाहीत. एक मुलगा तोही उत्तम शिकून आता चांगल्या हुद्यावर नोकरीला आहे. आता नातवंड घरात आलं आहे.'

मग मी म्हटलं, 'मग आता अडचण कुठं आहे ? आनंदानं उरलेला प्रपंच असाच पुरा करा.' बाईंचे डोळे भरून आले.

'तीच तर अडचण आहे. मला कुठलीच अडचण नाही. कधी वस्तू हवी वाटली, घ्यावी वाटली की हे घेऊन येतात. मुलगा विचारतो. कुठल्या गोष्टीला तयार असतो. सूनसुद्धा मुलीसारखी मिळाली आहे. वाटतं हा सगळा त्या वडिलांनी केलेल्या पुण्याईचा परिणाम आहे. तो पांडुरंग सांभाळतो आहे.'

मी मुद्दामच म्हटलं की, 'तसं म्हणण्यासारखं कुठं काही झालं आहे का ? तुम्ही कर्तृत्ववान आहात. सुशिक्षित आहात. घरची सारी अनुकूलता आहे. जितकं लक्ष देऊन, नेटकेपणानं, सावधानतेनं तुम्ही प्रपंच इथंवर आणला आहे. तर चांगलंच आहे ना ?'

त्यांना पुन्हा अधिक वाईट वाटून त्या म्हणाल्या, 'तसं नाही ना !

आत्तापर्यंत माझ्या लग्नापासून या नातवंडांपर्यंत इतके प्रसंग येऊन गेले. काही तर असे होते की कर्तृत्वानं कधीच हरलो होतो. जिवांच्या आशा सुटाव्यात असेही प्रसंग आले. सगळी अपयशं, अपघातापासून सर्व. दरवेळी मी पांडुरंगाला साकडं घाली. तुझं बाबा एवढं सगळं करतात. आम्ही तुझी लेकरं आहोत. आम्हाला सांभाळ. मी हरिपाठ म्हणेन, तुझं नाम घेईन. प्रसंगातून तर इतके अलगद बाहेर आलो, कळलंही नाही. अनेकदा तर अतर्क्य घटना घडून, मदत होऊन आम्ही बाहेर पडलो. तो प्रसंग निभेपर्यंत काय नाम झालं ते. काय हरिपाठ म्हटला तोच. लहानपणापासून कानांवरच होता. पाठ. त्यामुळं संकट टळेपर्यंत आवृत्त्यांवर आवृत्त्या केल्या. पण एकदा नेहमीचं रूटीन सुरू झालं की, हरिपाठही नाही नि नामही गायब !'

'मग याची तुम्हाला आठवण होत असेल ना कधीकधी पुढं ?' मी विचारलं.

त्या म्हणाल्या 'तर ! पण ती कधी दुसरं संकट उभं राहिल्यावर, एकटं असताना ! त्यावेळी निर्धारही व्हायचा की, आज निदान रामकृष्णहरी म्हटल्याशिवाय राहायचं नाही. पण काय चार वेळा तेव्हा तोंडात येई तेवढंच. पुन्हा ते काही घडत नाही. आता ही अवस्था सहन होत नाही म्हणूनच मी इथं आले आहे. माझी इच्छा आहे, मला कळतं आहे. बालपणचा संस्कार आहे. वडिलांचं एवढं उदाहरण माझ्यासमोर आहे. पण मग माझ्याकडून का घडत नाही ?'

मी म्हटलं, 'तुम्ही अजून स्वयंपाक करता का ?'

त्या म्हणाल्या, 'हो. सून नोकरीला जाते.'

'छान. त्याला तुम्हाला किती वेळ लागतो ?'

त्या उत्तरल्या, 'साधारण दोन-तीन तास. टप्प्याटप्प्यानं करते. कारण त्यांच्या जायच्या वेळा वेगवेगळ्या असतात. डबे द्यायचे असतात.'

मी विचारलं, 'मग त्यात तुम्हाला अडचणी येत असतील ? काही वेळा भाजीच करायची राहात असेल, कधी पोळ्याच कमी पडत असतील, कधी ठरवूनसुद्धा दहाला व्हायच्याऐवजी डबा अकराला तयार होत असेल. तीन माणसं वेगवेगळ्या नोकरीची म्हटल्यावर असं घडणं स्वाभाविकच आहे !'

त्या उत्तरल्या, ' छे हो, त्याला दहाला जायचं असतं तर माझा डबा कधी पावणेदहाला तयार नाही, असं घडलं नाही. भाज्या-उसळी-आमटी या बाबतीत तर माझा हातखंडा आहे. मी चोखंदळही आहे. त्यात हवामानाप्रमाणं मी बदल करते. त्यानुसार आदले दिवशी ताजी भाजी माझी नीट करून ठेवलेली असते.'

मी म्हटलं, 'वा ! म्हणजे तुमच्याकडं ठरवलेल्या गोष्टी बरोबरच नव्हे तर वेळेच्या आधी आणि त्याही उत्तम दर्जानं पार पाडायची पण क्षमता आहे. अशी तुम्ही तुमच्या हरिपाठाची वेळ आणि रामकृष्णहरीच्या माळेची वेळ ठरवलीत तर ? समजा ही तिघंही आपापल्या कामाला गेल्यावर नुसती आवराआवर करायची. पण दहा माळा झाल्याशिवाय स्वतः नाही जेवायचं असं ठरलं तर ? संध्याकाळच्या सर्वांच्या यायच्या वेळा समजा सहापासून सुरू होतात तर तुम्ही संध्याकाळी साडेपाचला हरिपाठ म्हणायचं ठरवलं तर?'

'पण त्यांची वेळ थोडी अनिश्चित असते. कधी पाच, कधी साडेपाच, कधी सहा.'

'ठीक आहे, तुम्ही तुमच्या वेळेत सुरू करा. ते आले की थांबा. मध्ये मनात हरिमुखे म्हणत त्यांना चहा करून द्या. मग उरलेला हरिपाठ पुरा करा. तोवर तुम्ही मात्र चहा पिऊ नका.'

'हां. हे शक्य आहे. हे तर रोजच होईल. सुट्टीत तर सूनच स्वयंपाक

सांभाळते. त्या दिवशी तर उपासना करणं सहज शक्य आहे. तसं पाहिलं तर एरवी इतकी गडबड असते. सर्वांच्या वेळा सांभाळायच्या असतात. तरीसुद्धा आम्ही कौशल्यानं भाजी-आमटी टाकतानासुद्धा मागं-पुढं करून, एका वेळी दोन-दोन तीन-तीन पदार्थ करून, ते ते पदार्थ नि त्यांच्या त्यांच्या वेळा गाठतोच.'

'आता वहिनीसाहेब एवढंच करा - हेच प्रापंचिक कौशल्य नि अनुभव - यानं गोळा झालेल्या कर्तृत्वाचा वाटा, ज्यानं हे कर्तृत्व तुमच्या अंगी दिलं आहे, त्याला कृतज्ञतेनं द्याल का ? तुमची खंत जाईल, कृतज्ञतेनं - आनंदानं घडेल, कुणाला त्रास नाही अन् पांडुरंगानं इतकी वर्षं वाट पाहिली त्याचं सार्थकही होईल !'

असा देवानं दिलेल्या कर्तृत्वाचा वाटा त्याला द्यायचं प्रत्येकानं ठरवलं तर चित्तावर उत्तम संस्कार घडवायला पैसे भरून कुठल्या वर्गाला नि शिबिराला जायला नको ! घरच्या घरी कृतज्ञतेच्या असंख्य कृती घडतील, घरची कर्तव्यंही पार पडत राहतील, देवाला कर्तृत्वाचा वाटाही रास्तपणे, पोच होत राहील - रोजच आणि आनंदानं !

७. बिनवासाची फुलं

बरेच दिवसांनी बळवंतराव रस्त्यात भेटले. हातात नवी कॅरीबॅग दिसली.

काही खरेदी असावी म्हणून सहज विचारलं, 'वा, खूप दिवसांनी भेट झाली. काय म्हणतेय प्रकृती ?'

ते म्हणाले 'आहे, तशी बरी आहे. पण फार उभं राहवणार नाही. आपलीही खूप दिवसांत भेट नाही.' जवळच चौकात एक उपाहारगृह होतं. पूर्वीची आमची चहाची जागा होती. दोघांचीही नजर सहजच तिकडं गेली. म्हणून एकमेकांना खुणेनंच 'चला' म्हणत तिकडं गेलो. मालक ओळखीचेच होते. ते आत जाताच म्हणाले, 'तुमच्या गप्पा झाल्या की, खूण करा. मीही येतो चहा घ्यायला.'

बळवंतरावांना आपला एकमेकांचा स्नेह आठवून डोळ्यांच्या कडा ओलावल्यासारख्या झाल्या. एक कोपरा धरून बसलो. इकडे तिकडे गोष्टी झाल्या. मग खरेदीचा विषय झाला. त्यांनी पिशवीतलं शर्ट-पॅन्ट पीसचं कापड दाखवलं.

मी म्हटलं, 'छान आहे. पण तुमचा नेहमीचा बाज नाही.'

ते म्हणाले, 'खरं आहे. पण ते कापड आता फार महागलं. हे आपलं पेन्शनच्या खिशाला परवडणारं आहे. नेहमीच्या निम्मा दर आहे.' मग क्षणभर थांबून म्हणाले, 'आपली नोकरी असतानाच्या गोष्टी वेगळ्या होत्या. आपण स्वतःलाही हयगय केली नाही, मुलाबाळांची नाही अन् देण्याघेण्यालाही नाही.'

हे मात्र खरं होतं. बळवंतरावांचा हात अगदी सढळ म्हणूनच

प्रसिद्ध होता. कुणाच्या साठी-सत्तरी-निवृत्ती-लग्नकार्य कशालाही त्यांचं देणंघेणं एक नंबरचं असे. उलट जवळचा नातेवाईक करणार नाही असा घसघशीत अहेर ते करीत. आत्ताचं त्यांचं स्वतःसाठी घेतलेलं कापड त्यामुळंच जरा अस्वस्थ व्हायला लावणारं होतं.

त्यांच्या ते सहज लक्षात आलं म्हणून ते होऊनच पुढं म्हणाले, 'काय आहे, आता तुम्ही जवळचे आहात म्हणून म्हणतो तुम्हाला वाटेल यांचा मुलगा एवढा कलेक्टर दर्जाचा अधिकारी आहे. यांना काय कमी आहे ? पण त्याचा मोठेपणा त्याला. चांगला आहे. व्यसनी नाही. आपलं आपलं सांभाळतो. खूप आहे.'

'तो कुठं लांब असतो ना ? पण तो स्वभावानं चांगला आहे. तुम्ही कशाला काळजी करता ?' मी सहज म्हटलं.

ते काही बोलले नाही. त्यांनी जवळच्या दुसऱ्या पिशवीतली दोन सुंदर हस्ताक्षरातली पत्रं समोर ठेवली. त्यांच्याच मुलाचं अक्षर सहज ओळखत होतं. म्हणाले,'वाचा, काही खासगी नाही.' त्यांच्या शब्दाखातर मी उघडल्यासारखं केलं. त्यात पहिल्यापासून आईवडिलांबद्दल कृतज्ञता, काळजी, त्यांनी आजवर लहानपणापासून केलेल्या उपकारांचे प्रसंग, त्यांची आठवण - असा बराच मजकूर होता. ते पत्र, हे पत्र म्हणून खरोखरच आदर्श वाटावं असंच होतं.

मला उत्साह वाटून मी म्हटलं, 'छान. तुमचे संस्कार किती चांगले. त्याची त्याला किती जाणीव आहे पहा. अशी मुलं आजकाल मिळत नाहीत.'

बळवंतराव हसले. 'खरं आहे. एवढी जाणीव, एवढी कृतज्ञता हीसुद्धा आज दुर्मीळ आहे हे खरं आहे. पण असं फक्त सुंदर सुंदर पत्र दर महिन्याला येतं. बिनवासाची फुलं ती. काट्यांपेक्षा चांगलीच म्हणा. अहो, पैशाचं काय करील एवढा पैसा दरमहा त्याच्याकडं ओतला जातो आहे.

पण आमच्या खिशातल्या पेन्शनमध्ये कधी या पत्राबरोबर हजार-दोन हजाराचीही भर पडत नाही. बाकीचं तर आमचं काही करावं लागत नाही. तो भारताच्या दुसऱ्या टोकाला आहे. आम्ही तर काही वाटखर्च करून भेटायला जाणंही मुश्किल आहे. त्याला सवड होत नाही. मग आमच्या खिशाएवढी खरेदीच योग्य नाही का ?'

माझ्या पटकन लक्षात आलं. ही कृतज्ञता जरूर चांगली आहे. पण ती पोकळ आहे. ते म्हणतात ते खरं आहे. ती 'बिनवासाची फुलं'आहेत ! लांबून दिसायला एकदम छान, आकर्षक पण सुगंधाचा आनंद द्यायला पूर्ण असमर्थ. या मुलाची पत्रं त्याच्या हुशारीमुळं वाचनीय आहेत, प्रेक्षणीय आहेत, पण वडिलांना अधिक चांगलं साधं शर्टचं कापड द्यायलाही ती असमर्थ आहेत. आदर्श पत्र म्हणून ती एखाद्या पत्रलेखनाच्या पुस्तकात समाविष्ट होतील, पारितोषिकंही मिळतील पण ज्यांना लिहिली त्यांना ती 'शब्द बापुडे पोकळ वारा'च आहेत.

तितक्यात मालकमित्र आमचं बोलणं आवरत आलं हे बघून चहा आणायला सांगून आमच्या दिशेनं येताना दिसले. मला खात्री होती, त्यांचा कपभर चहा खऱ्या प्रेमानं सांगितलेला होता, गल्ल्यावर त्याचे पैसे घेतले जाणार नव्हते कारण तो खूप दिवसांनी भेटलेल्या मित्रप्रेमापोटी होता. कपभर चहाचं मोल त्या हातभर सुबक पत्रापेक्षा जास्ती होतं, बळवंतरावांनाच काय, कुणालाही ! ते छोटंसंच फूल होतं, पण वासाचं होतं !

८. कृतज्ञतेपलीकडं

आज गुरुवार असल्यानं देवळातली गर्दी जरा जास्तच होती. गुरुजींनीसुद्धा पूजेचे कष्ट विशेष घेतलेले असत. फुलांची आरास मोठी. रंगीबेरंगी सुंदर फुलंही सीझनमुळं खूप येत. शिवाय देवळाच्या स्वतःच्या पुष्पवाटिकेतही फुलांना कमी नसे. त्यामुळं मंदिरात शिरताना फुलांचा मंद सुगंध उदबत्तीपेक्षाही जास्त दरवळत असे. वातावरण प्रसन्न राही. मूळचं मंदिर आता छोटंसं झालं होतं. त्यापेक्षा ज्यांनी ते स्थापलं त्यांचं शेजारचं समाधिमंदिरच मोठं झालं होतं. ज्यांनी ते मूळ मंदिर स्थापलं त्या सत्पुरुषांनी देह ठेवल्यावर त्यांची बांधलेली समाधी भव्य होती. ती त्यांच्या साऱ्या चाहत्यांनी कृतज्ञतेनं बांधली होती. मूळ मंदिराला त्यात घेऊनच हे भव्य मंदिर उभं होतं. त्यात मूळ रक्षाकलशावर त्या सत्पुरुषांची भव्य मूर्ती होती. हुबेहूब. प्रेरक. पाहाताक्षणी माणसाचे हात जोडले जावे इतके सात्त्विक भाव मूर्तीच्या चेहऱ्यावर असत.

येणाऱ्या जाणाऱ्यांची गर्दी संध्याकाळी वाढत चालली. काही मंडळी लवकर येऊन मंदिरात त्या सत्पुरुषांच्या चरित्राचं पारायण करीत बसली होती. काहींच्या मंदिराला प्रदक्षिणा चालू होत्या. अनेकांनी येताना हारफुलं आणली होती. ती मूर्तीला वाहिली जात होती.

तोवर बाहेर एक टेम्पो येऊन थांबला. आतल्या लोकांची थोडी धावपळ झाली. काही महत्त्वाची वस्तू, माल आला असावा. टेम्पोचा फाळका उघडला होता. आतल्या मोठमोठ्या करंड्या उतरवून घ्यायला आतली भक्तमंडळी धावत गेली. मी कुतूहलानं पाहिलं. ते गाव नवीन असल्यानं मला हा प्रसंग नवीनच होता. फक्त गुरुवारची गर्दी लगेच कळली.

पण हा विषय कळला नव्हता. त्या करंड्यांतून फुलं असावी की आणखी काही ?

आत नेतानेता तुळशीचा मंद सुगंध आला. म्हणून शेजारच्या एका वृद्ध माणसाला हळू आवाजात विचारलं. ते म्हणाले, त्या तुळशीच आहेत. आपल्या बाबांची आवड आहे ती. एक शेठजी पाठवतात दर शेवटच्या गुरुवारी. अर्धा टेम्पो तरी तुळशी असतील. आता हळूहळू सभागृहात तुळशीचा सुगंध वाढला. तुळशीच्या मंजिऱ्या नि पानाला एवढा चांगला वास असतो याची फारशी कल्पना नव्हती. एरवी कधी हातावर घेऊन पाहिलं तरच येतो. कधी दारात, बागेत, कुठं खूप तुळस आली असली तर जाणवते एवढंच माहीत होतं. चार-पाच लोक एकत्र येऊन तोपर्यंत तुळशीच्या करंड्या सोडून त्यांच्या व्यवस्था लावण्यात मग्न झाले होते. मग त्या तुळशींची मोठी आरास त्या बाबांच्या-सत्पुरुषांच्या मूर्तीभोवती मांडण्यात आली. माझी वेळ झाल्यानं मी उठून बाहेर पडलो.

दुसरे दिवशी संध्याकाळी पुन्हा फिरतफिरत देवळाकडं आलो. आज शुक्रवार असल्यानं वाटेवरच्या देवीच्या देवळात गर्दी झालेली पाहिली होती. इथं मात्र पूर्ण शांतता होती. कालच्या पार्श्वभूमीवर आजचा फरक लगेच लक्षात येत होता. आत्ता मला येताना लागलेल्या देवीच्या देवळासमोरच्या रांगेचं आणि शुक्रवार-गुरुवारचं नातं पुन्हा एकदा आठवून मनाशी थोडी गंमत वाटून हसूही आलं. असो, भक्तिभाव तरी आहे असा विचार मनात येऊन मी या बाबांच्या मंदिरात प्रवेश केला. आत मूळ मूर्तीसमोर नंदादीप होता. सत्पुरुषांच्या मोठ्या मूर्तीच्या मागं एक लाइटवरची माळ सुरू होती. आज तीर्थप्रसाद देणारं कुणी नव्हतं. सहज कोपऱ्यात बसावं म्हणून पाहिलं तर कालचे वृद्ध गृहस्थ माळ ओढीत बसले होते.

थोडा शेजारी बसलो. त्यांना काही विचारावं असं मनात आलं

होतं.पण त्यांच्या जपात-ध्यानात व्यत्यय नको म्हणून बोललो नाही. थोड्या वेळानं बाहेर नजर गेली. तिथं एका झाडाखाली कालचं निर्माल्य ढीग करून रचलं होतं. त्यात सर्वांत मोठा ढीग तुळशीचा होता. मला त्या कालच्या तुळशीच्या टेम्पोची आठवण झाली. तितक्यात तिकडून मंदिराची स्वच्छता करणारे कुणी एक-दोन कामगार आले. त्यांनी आणलेल्या पाट्यांतून ते तुळशी नि फुलांचं निर्माल्य उचलून टाकण्यासाठी भरायला सुरुवात केली.

मी सहज त्या वृद्ध गृहस्थाकडं पाहिलं. त्यांनीही ते तुळशीचं निर्माल्य उचललेलं पाहिलं होतं.

ते माझ्याकडं बघून म्हणाले, 'तुम्ही गावात नवीन आला का ?'

मी म्हटलं, 'हो !'

मूर्तीकडं बोट करून ते म्हणाले, 'मग सांगतो, मी या बाबांबरोबर होतो. तो जीव फार प्रेमळ आणि साधा होता. त्यांच्या आशीर्वादानं कितीकांच्या बंगले - गाड्या झाल्या असतील. पण यांनी कधी आपली ही मठी सोडली नाही. राहाणी फार साधी. ज्याच्या दुकानात नोकरी होती त्यालाही त्यांनी आपलं मोठेपण कळू दिलं नाही. काटकसरीनं राहिले. आपण पुढं एवढ्यावर जगू शकू म्हटल्यावर देवाच्या नावानं दुकानातली चाकरी मालकाला सांगून सोडली. पुन्हा मागं वळले नाहीत. पुढं तर मालकसुद्धा दर्शनाला येत. पण हे त्यांचा मालक म्हणून तितकाच आदर ठेवीत. आपलं काम प्रामाणिकपणे करा, श्रद्धा ठेवा, कर्तव्य सोडू नका आणि जमेल तेवढं देवाचं नाव घ्या एवढीच त्यांची सांगी होती.'

'मग हे तुळशीचं एवढं माहात्म्य काय होतं ?' मी विचारलं. 'त्या मोठ्या मनाच्या माणसानं झाडावरचं फूलसुद्धा देवाला घालायला लागणार असल्याशिवाय तोडलं नाही. तुळशीसुद्धा वाहात, तीही एक.

त्यासाठी इथं दारात तुळशी लावल्या होत्या. स्वतः पाणी घालून वाढवल्या. अनेकदा ते एकेक दिवस नुसत्या तुळशीच्या पानांवर रहात, पानं खायची वर पाणी प्यायचं. त्याला ते 'तुळशीचा वार' म्हणत. साध्या राहणीचा आणि कुणाला अन्नपाण्याचा त्रास होऊ नये याचा तो मार्ग होता. तेवढी श्रद्धाही बळकट होती. तेवढ्यावर त्यांचं भागे. पण तुळससुद्धा विनाकारण तोडलेली त्यांना पाहावत नसे. आता तुळशीवर तर कोणी राहातच नाही. पण त्यांना आवडते म्हणून ही तुळस वारेमाप तोडतात आणि टेम्पोवारी त्यांना घालून त्यांची भक्ती करतात. लोकांना नाडणाऱ्या शेठजींकडून टेम्पो येतो. आता निर्माल्याचा गाडा जाईल. तुम्हाला ठाऊक आहेच.

'त्यांचे उपकार अनेकांवर आहेत. ते त्यांच्या लक्षात आहेत. त्यांची भजनं ते म्हणतात. कृतज्ञता चांगलीच पण त्यांना व्यवहारात प्रामाणिकपणा हवा होता आणि देवाचं जास्तीत जास्त नाम घेणं आवडत असे. आता याकडं कुणाचं लक्ष वेधलं तर या भक्तमंडळींना बरं वाटणार नाही. मी बाबांकडून अजून एक शिकलो ते कृतज्ञतेपलीकडंही जायला. ते म्हणायचे उपकार तर माणसावर असंख्य प्रकारचे असतात. निसर्ग-माणूस-देव कितीतरी प्रकारचे. त्याची जाणीव ठेवावी. ते सतत मनाशी कबूल करीत असावं. त्यामुळं अहंकारसुद्धा वाढत नाही. उपकारांची जाणीवसुद्धा नसणाऱ्यांपेक्षा हे चांगलंच. पण एवढ्यावर थांबू नये.

'माणसं या उपकारांची जाणीव ठेवतात, व्यक्त करतात, गाणी गातात, आरत्या करतात. पण खरं तर जो उपकार करतो त्याची तळमळ वेगळीच असते. ती आपण काही प्रत्यक्ष वागण्यानंच, कृतीनंच पुरी करू शकतो. ते स्वतः तसं करीत. मला ते पटलं. म्हणून मी जास्तीत जास्त तसं करायचा प्रयत्न करतो. आता या उतार वयात दिवसभर नातवंडं सांभाळायचं कर्तव्य करतो. सकाळी देवपूजा करतो. त्यावेळी देवाला फूल-तुळशी वाहातो.

संध्याकाळी येताना देवावरच्या फुलांतलं एक फूल किंवा तुळशीतलं एक तुळशीपत्र बाबांना घेऊन येतो. त्यांना नवं तोडून आणण्यापेक्षा ते आवडे म्हणून. संध्याकाळी जास्तीत जास्त वेळ इथं कोपऱ्यात बसून देवाचं जास्तीत जास्त नाम घ्यायचा प्रयत्न करतो.

'तुम्ही नवीन, जिज्ञासू म्हणून उपयोग होईल म्हणून तुम्हाला हे एकदा सांगितलं. बाबांचे उपकार उदंड आहेत. पण एरवी मी ते गात बसत नाही. जाणीव बाळगतो. त्यांना आवडेल अशी कृती करतो. मी एवढा व्यवसाय केला पण त्यांना आवडेल असा प्रामाणिक राहिलो. पोटाला कधी कमी पडलं नाही. पण आज जायला लागलं तरी कुणाचं देणं नाही की कुणाच्या फसवणुकीचा शब्द येणार नाही - एवढं बाबांसाठी म्हणून केलं. त्याचं समाधान मला आहे. बाबांनाही असेल.'

मला तो भाव आणि त्या कृती ऐकूनसुद्धा आतून बरं वाटलं. प्रेरणा मिळाली. मला श्री प्रभाकर महाराजांची आठवण झाली. ते सोलापूरचे थोर नामनिष्ठ सत्पुरुष. त्यांचे एक जवळचे शिष्य होते. त्यांना काही कामानिमित्त काही वर्षं परगावी राहावं लागलं. त्यांना प्रभाकर महाराजांबद्दल फार कृतज्ञता वाटे. दूर गेल्यावर जास्तच. म्हणून त्यांनी कृतज्ञता व्यक्त करणारं एक मोठं लांबलचक पत्र तिकडून महाराजांना पाठवलं. सोबत उत्तरासाठी एक कार्डही पाठवलं. महाराजांनी ते सगळं पत्र शांतपणे वाचलं. त्यांचं कौतुक न करता, निर्विकारपणे त्या कार्डावर 'मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट । बाष्कळपणाची वटवट । करूंच नये (सर्वथा)।' अशी एकच ओळ लिहून ते पत्र परत पाठवून दिलं.

मला क्षणभर अशा अनेक ठिकाणी चाललेली तथाकथित भक्ती आठवली.ते ते सारे सत्पुरुष हयात असते किंवा तशी काही व्यवस्था असती तर किती लोकांना अशी कार्डं आली असती कुणास ठाऊक असंही वाटलं.

असा उपदेश जगण्याचा आटोकाट प्रयत्न करणाऱ्या या आजोबांना मात्र असलं कार्ड जरूर आलं नसतं. कारण ते कृतज्ञ तर होतेच पण त्याही पलीकडं जाऊन ते खरं कामही करीत होते. त्याचं वैशिष्ट्य अन् थोरवी जाणून मी त्यांच्या पाया पडलो आणि म्हटलं, 'खरं आहे. मलाही आज तुमच्या बरोबर नाम घ्यायला बसू द्या.'

त्यांनाही संतोष झाला. आम्ही कोपऱ्यात पुन्हा जपाला बैठक घातली. समोर त्या आजवर मला अज्ञात असलेल्या सत्पुरुषाची मूर्ती होती. या गृहस्थांना क्षणापूर्वी केलेला नमस्कार त्यांना पोचल्याचे भाव त्या मूर्तीच्या चेहऱ्यावर दिसत होते अन् कालच्यापेक्षाही प्रसन्नता आज स्पष्ट प्रतीत होत होती !

९. मदतीचं गणित

तसा प्रसंग फार मोठा नव्हता. रावसाहेबांना ट्रेनिंगसाठी दूरच्या राज्यातल्या ऑफिसला जायचं होतं. दोन-तीन दिवस जाता-येता प्रवास. तिथं पुरा एक महिना जाणार होता. घरापासून दूर राहावं लागणार, पण त्याची त्यांना विशेष काळजी नव्हती. रावसाहेब कंपनीत अधिकारी असल्यानं घरच्या जबाबदाऱ्या सांभाळायची पत्नी आणि मुलांना सवय होती. प्रशिक्षणातल्या कामाचाही त्यांना ताण नव्हता. अडचण फक्त एकच होती. त्यांना स्वतःला रामनाम घ्यायची आवड होती. त्यांचं पूजापाठ असं कुठलं मोठं अवडंबर नसलं तरी या मनाच्या आवडीमुळं आणि ठेवणीमुळं ते नेहमी आनंदात असत. आता प्रवासात कोण भेटतं इथंपासून एक महिना कुणाच्या संगतीत काढावा लागणार इथंपर्यंतच्या गोष्टींनी त्यांचं मन थोडं काळजीत पडलं होतं.

कारण ही आवड इथल्या ऑफिसपुरती माहिती होती. नेहमीप्रमाणं बाकीचं वातावरण, खाणं-पिणं, पार्ट्या - असल्या गोष्टींपासून ते सहसा दूर असत. काही विशेष प्रसंग असेल तरच त्यांना बोलवायचं याची इतरांनाही कल्पना होती. आता प्रशिक्षणाचं वातावरण वेगळंच होतं. इतर ठिकाणचे अधिकारी शिक्षणापेक्षा बदल म्हणून थोड्या मौजमजेच्या उद्देशानं आले असण्याची शक्यता नेहमीप्रमाणं होती. आपल्याबरोबर कंपार्टमेंटमध्ये असलेल्या प्रवाशाच्या प्रकारापासून ते महिनाभर खोलीत राहणाऱ्या बरोबरीच्या अधिकाऱ्यापर्यंत सर्व गोष्टींत आपली साधना कशी टिकून राहणार याची एक सात्त्विक काळजी त्यांना होती. 'हाक मारा मदत तयार आहे' या वचनावर विश्वास ठेवून त्यांनी निघण्यापूर्वी रामाला आर्ततेनं प्रार्थना केली

आणि लगेज उचलून स्टेशन गाठलं.

कूपेत तेच प्रथम गेले. दुसरं कोण आत येईल हे अर्थात सांगता येत नव्हतं. म्हणून ते एक पर्याय म्हणून साखळ्यांनी सामान अडकवून वरच्या बर्थवर पांघरूण घेऊन पडून नामस्मरण करीत राहिले. कोण येईल तेव्हा पाहू. फक्त मधूनमधून ते खाली पहात. दोन-तीन तास तरी कुणी आलं नाही. मग मात्र एक साहेब आत आले. त्यांनीही बॅग वगैरे ठेवल्या. वर झोपलेल्या रावसाहेबांचा अंदाज घेतला. तेही थोडे अस्वस्थ होते. पण त्यांनी खालच्या बेडवर पथारी टाकली. इकडं तिकडं पाहून कोटच्या खिशातून कसलं तरी पुस्तक काढून वाचायला सुरुवात केली.

रावसाहेब वरून कानोसा घेत होतेच. आतल्या सीटवर बसताना त्यांनी सीटला केलेला नमस्कार त्यांच्या नजरेतून सुटला नव्हता. ते पुस्तकावर लक्ष ठेवून होते. ते पुस्तक आडवं उघडलं जात होतं. बहुधा धार्मिक असावं. क्षणात उलगडताना त्यांना वर मारुतीचं चित्र दिसलं. 'हनुमानचालिसा' नाव त्यांना अस्पष्ट दिसताच, रावसाहेबांना इतकं हायसं वाटलं की पांघरूण काढून ठेवून हातातली माळ गळ्यात अडकवून ते एका झेपेतच खालच्या सीटवर आले. हातानंच त्यांनी समोरच्या गृहस्थांना 'प्रणाम' केला. खिडकीशी बसून त्यांनीही 'जय रामजी की' म्हणून रावसाहेबांना हात जोडून नमस्कार केला.

दोघांनीही एकमेकांकडं हसून पाहिलं. फार काही सांगण्याची गरजच नव्हती. दोघांच्याही अडचणींची उत्तरं दोघांनाही मिळाली होती. मग औपचारिक विचारपूस झाली. तेही निर्व्यसनी, हनुमानभक्त होते. तेही यांच्याच कंपनीत दुसऱ्या राज्यातले अधिकारी होते. तेही चिंतेतच होते की, या सिगरेट-ड्रिंक्स्च्या जमान्यात आपण कसे सुरक्षित जाऊ-येऊ-राहू ? सोबत कोण असेल ? जुळवून तर घ्यावंच लागेल. त्यांनीही आर्ततेनं हनुमानजींकडं

प्रार्थना केली आणि बाहेर पडले होते. हे जपमाळ घेऊन खाली उतरल्यावर त्यांचा आनंद शब्दांत न सांगण्यासारखा होता. दोघांनी तिथंच पुढंही रूम घेताना एकत्र मागण्याचं ठरवून टाकलं. मदत तयार असते हेच खरं अशा सारांशाला ते आले होते.

अशी काळजी एक नव्हे अनेक बाबतींत अनेकांना पडलेली असते. त्यांतल्या त्यात सन्मार्गानं चालू इच्छिणाऱ्यांना अलीकडं जास्तच. कारण चैनी-फसवणुकी-मद्यादी व्यसनांना सध्या विघातक प्रतिष्ठा आली आहे. सरळ, सज्जनपणे जगणं भोळसट नि बावळटपणा मानणारी उथळ नि 'पुरोगामी' संस्कृतीही रुजत आहे. अशा साऱ्या वातावरणात नोकरीला जा, लग्नाला उभे रहा, घरादाराचा व्यवहार करायला जा, व्यवसाय करायला जा, कुठं यात्रा-करमणुकीसाठी फिरायला जा. कुठंही या विघातक वातावरणाची एक धास्ती सरळमार्गी माणसांना विशेषतः अलीकडं जास्तच वाटते. वैध-अवैध पैशाची अनावर, अतिरेकी ओढ, निकोप न राहिलेल्या जीवघेण्या स्पर्धा मग त्या अगदी रस्त्यावर कार चालवण्यापासून व्यावसायिक, राजकारणातल्या किंवा नोकरशाहीतल्या पदांच्या असोत की कसल्या, अत्याचारांचं वाढतं प्रमाण असो किंवा आणखी काही - अशा साऱ्यांमुळं सामान्य सरळ माणसाला सतत एक असुरक्षिततेची भावना कुठंतरी मनात सतत वाटत राहाते, हा अनुभव अनेकांना येतो.

मोठ्या व्यवहारात काळजी असतेच पण साधं टॅक्सीत किंवा रिक्शात बसलं तरी मनात येतं की हे योग्य ठिकाणी, जवळच्या रस्त्यानं आपल्याला नीट पोचवतील ना ? कुठल्या ऑफिसमध्ये गेलं तरी हे आपल्याला सरळ वागणूक देतील ना - अशा साध्यासाध्या गोष्टींतही काळजी वाटायला लावील अशी परिस्थिती अनेकांच्या वाट्याला येते, हे खरं आहे. पण तिथं हे लक्षात ठेवायला हरकत नाही की, आपला मार्ग

सत्याचा असेल, सरळ असेल तर आपल्याला मदतीचा प्रतिसाद कुठून ना कुठून मिळतोच. असलेलं संकट आपण काळजीचं जाळं विणून घरी आधीच वाढवू नये. योग्य रस्त्यानं प्रवास सुरू करावा. पुढं वाट दाखवणारा, सोबत देणारा भेटतोच.

श्री गोंदवलेकर महाराजांनी एक मोठं छान व्यावहारिक उदाहरण एकदा दिलं आहे. पूर्वीच्या काळी रोज नदीवरून पाणी आणणं हा एक मोठा कार्यक्रम होता. नद्या लांब. घरात माणसं खूप. निदान प्यायचं पाणी आणायचं म्हटलं तरी केवढ्या तरी खेपा कराव्या लागत. त्या कमी घडाव्या म्हणून मोठे हंडे पाणी आणायला वापरीत. एकदा डोक्यावर घेतला की हंडा घरापर्यंत वाहण्याची कुवत माणसांच्या अंगी असे. पण तो भरलेला हंडा डोक्यावर उचलून घेणं मात्र कठीण असे. त्यामुळं पाण्याला जाण्यापूर्वी लेकी-बाळी आधीच कुरकुरू लागत की पाण्यावर, नदीवर हंडा उचलायला मदत करायला कुणी नसलं तर अर्धाच आणावा लागेल. मग खेपाच जास्त पडतील. एकटीला भीती वाटते. अशा वेळी श्री महाराज म्हणत, असं सांगण्याची पद्धत होती की, आपण हंडा घेऊन मदतीची खात्री बाळगून नदीवर जावं. तिथं पाणी भरावं. मग हंड्याला हात लावणारा, उचलून डोक्यावर द्यायला मदत करणारा कुणी हमखास भेटतो. तसा अनुभवही येई. ते लक्षात ठेवावं.

हे म्हणणं आश्वासक आहे. अनुभवाचं आहे. बाह्य परिस्थिती तर अशी पालटतच राहील. ती प्रतिकूल असेल. सरळपणाला, सज्जनपणाला, सचोटीला तर या युगात अधिकच प्रतिकूल राहील. पण अजून माणुसकीही आटलेली नाही अन् ती टिकवणारी ईश्वरी व्यवस्थाही. मात्र मदतीचं गणित घरी बसून काळजी करीत बसण्यानं सुटत नाही. निश्चयानं, श्रद्धेनं, प्रत्यक्ष वाटचाल करण्यानं सुटतं. आपणही अशी शक्य तेवढी कुणाला मदत करीत

राहण्यानं सुटतं. मदतीतल्या अडचणी या प्रतिकूल परिस्थितीमुळं दिसणं स्वाभाविकच आहे. ते गणित आहे. सोडवणं अवघड असणारच पण आपण आपले प्रयत्न निष्ठेनं, मनापासून सुरू ठेवले आणि मनःपूर्वक प्रार्थना केली असेल तर आर्ततेच्या, तळमळीच्या रीतीनं ते गणित योग्य वेळी सुटतं.

पूर्वीही याच रीतीनं ते सुटत आलं आहे, इथून पुढंही सुटेल !

१०. सहजीवनाचे दीप

नेहमीप्रमाणं सहजीवनगृहनिर्माण सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. मुळात कार्यकारिणीच्या सभेलाच कुणी उपस्थित राहायची वानवा. कुणी आलाच तर सेक्रेटरी, अध्यक्ष, विशेषतः खजिनदार वगैरेंना सूचना देण्यासाठीच आला तर. नाही तर त्याचं स्वतःचं कुठलं काम करून घ्यायचं असलं, कुठं सही-शिक्का हवा असला, कुठली परवानगी हवी असली तर. त्यात वार्षिक सभा म्हणजे बराचसा उपचार. कायद्याच्या कलमानुसार पुरा करायचा सोपस्कार. आता पहिल्यासारखा कुणाला उत्साहही राहिला नव्हता. सोसायटी करताना नि घरं बांधताना असलेला उत्साह नेहमीप्रमाणं ओसरत चाललेला.

प्रथम आदर्श सोसायटीची स्वप्नं. महिन्याची सभासुद्धा वार्षिक सभेसारखी. सर्वांसाठी करमणुकीचे कार्यक्रम, मुलांसाठी उपक्रम, अपार्टमेंट्स्चा एकत्रित गणपती वगैरेसारखे उपक्रम. मग हळूहळू ठरावीक लोकांनाच काम पडणं, कुणाची किरकोळ धुसफूस, हिशेबाच्या शंका अशा गोष्टी शिरून पांगापांग. आता कार्यकारिणीची सभासुद्धा दोन-चार माणसांनी उपचार म्हणून घ्यायची, काही वेळा तर मिनिटबुकांत दाखवायची गोष्ट होत होती.

वार्षिक सभेला सर्वांनी जरा जोर धरून मेंबर गोळा करण्याचे प्रयत्न. चहा-खाणं ठेवूनही उपस्थिती नाही. बरं काही अडचण म्हणावी तर वेगवेगळ्या इमारतींतून टीव्हीचे आवाज, सुटीच्या गप्पा सारं सुरळीतपणे सुरू. प्रश्न नेहमीचेच. वर्गणीचे थकबाकीदार. त्यांच्या हिशेबावरून वादावाद्या. सोसायटीतला कचरा, स्वच्छता, गेलेले कॉमन दिवे, सांडपाण्याच्या अडचणी.

मदतीपेक्षा तक्रारींचे सूरच जास्त. थोडंफार काम करणारे होते तेही थोडे या चर्चेमुळं नाउमेदच. गोपाळराव ही मीटिंग कधी चुकवीत नसत. आपण अपार्ट्मेंट्मध्ये राहतो. वर्षातून एकदा तरी या सभेला जाणं एक नैतिक जबाबदारी म्हणून. वयाच्या अधिकारानं ते त्या कार्यकारिणीच्या सदस्यांना पाठिंबा देत. त्यांनी केलेल्या कामाचं कौतुक करीत. एखादी सोपी गोष्ट असेल तर सुचवीत, करीत. नाउमेद होणाऱ्यांना धीर देऊन पुन्हा कामाला प्रवृत्त करीत.

साधारणपणे ही फुकटची हमाली कोणी घ्यायला तयार नसे. पण गोपाळरावांच्या शब्दाखातर कुणी तरी कार्यकर्ते तयार होत. वर्गण्या वेळेवर न देणाऱ्यांना गोपाळराव आवाहन करीत. मुख्यतः कामं राहात ती वर्गणी जमा न झाल्यानं. कधीकधी साऱ्या अनिश्चिततेमुळं कामगारही पेमेंटची खात्री नसल्यानं फिरकत नसत. दर वर्षीची कार्यकारिणी उभी करणं हेही एक दिव्यच असे. त्यात पुन्हा, 'कुवत असलेल्यांची इच्छा नाही, आणि इच्छा असलेल्यांची कुवत नाही.' हा सार्वत्रिक पेच इथंही असेच. त्यातून वाट काढीत ही सभा पार पडली.

दुसऱ्या दिवशी सकाळी जिन्यात झाडण्याचा आवाज येऊ लागला. म्हणून लोक बाहेर डोकावले. तर गोपाळराव धोतराचा काचा मारून हातात झाडू घेऊन जिना झाडीत वरून खाली उतरून येत होते. हातात केराची सुपली. या बिल्डिंगमध्ये ते राहात नसल्यामुळं काहींची उत्सुकता ताणली गेली. पण लगेच दारं उघडून गोपाळरावांना विचारायचं मात्र कुणाला धाडस झालं नाही. दुसऱ्या दिवशी दुसऱ्या विंगमध्ये गोपाळराव झाडू-टोपली घेऊन हजर. गोपाळराव समंजस, वयस्कर, अजातशत्रू असल्यामुळं एक झालं, इतर कुणाला त्यांना कामात अडवायचं धाडस झालं नाही.

पुढं सोसायटीत मीटिंगहॉलच्या बाहेर एक बोर्ड लागला. तीन

रकाने. पहिल्यात सोसायटीतल्या उणिवा, अडचणी. दुसऱ्या रकान्यावर माझी कृती. तिसरा रकाना टीप / सूचना असा. खाली आवाहन - 'कुणाला यावर काही लिहायचं असल्यास स्वागत ! फक्त प्रत्येक रकान्यात नोंदीच्या शेवटी नाव व फ्लॅटनंबर भरावा.' ते आखून ठेवलेलंच होतं.

पुढच्या आठवड्यात अडचणीखाली 'निधी उभारणी, सोसायटीत झाडूवाला नेमणे शक्य नाही, कॉमन जागेत केरकचरा.' माझी कृती - 'माझी स्वतःची विंग मी आठवड्यातून एकदा झाडीन, रोज एक याप्रमाणं इतर विंग आठवडाभर तब्येतीप्रमाणं झाडीन. गोपाळराव (१०१). ही नोंद झालेली होती.' 'टीप'मध्ये 'इतर विंग आपापली जबाबदारी घेईपर्यंत किंवा मी थकेपर्यंत', अशा नोंदी होत्या. जाता येता कळत होत्या. आपापसात चर्चा होई. पण कुणी पुढं झालं नाही. कुणी गोपाळरावांना, तुम्ही तसदी कशाला घेता वगैरेही सुचवलं. पण त्यांनी शांतपणे काम चालू ठेवलं.

पंधरा दिवसांनी 'ए' विंगखाली वरून टाकलेला कचरा. कृती - 'मी दिसल्यावर उचलून टाकला.' टीप - 'तक्रार नाही. गोपाळराव (१०१).' अशी नोंद आढळली. मध्येच एका तारखेला 'पार्किंगमध्ये मोटारसायकल क्र. --- वेडीवाकडी लावल्याने येणाऱ्या-जाणाऱ्यांना अडथळा.' कृती - 'बाईक लॉक असल्याने उचलून नीट लावली.' टीप - 'गंगाधरराव (१०२) यांनी पुढे होऊन मला मदत केली. आभार. गोपाळराव (१०१).' अशा नोंदी व्हायला लागल्या. आता मात्र सोसायटीत जागृती झाली. लोकांना बोर्ड पहायचीसुद्धा सवय लागली. चर्चा होऊन जबाबदाऱ्या समोर यायला लागल्या.

महिन्याभरानं पुन्हा गोपाळरावांची महत्त्वाची नोंद आली. 'सध्या एक तृतीयांश म्हणजे दहा फ्लॅटची वार्षिक वर्गणी अत्यल्प असूनही थकीत. त्यामुळे असलेल्या वर्गणीतून फक्त कॉमन लाईट, पाणी एवढेच शक्य.'

'माझी कृती'खाली 'पेन्शनमधून मी दरमहा एका थकित फ्लॅटची वर्गणी भरणार.' 'स्वतःची जबाबदारी जो तो कळून पार पाडेपर्यंत' - अशी टीप. लोकांना वाटलं बाकी कष्ट वगैरे ठीक आहे. पण प्रत्यक्ष दुसऱ्याचे पाचपाचशे रुपये भरायचे होणं कठीण. पण गोपाळराव ठाम होते. दुसऱ्या एक तारखेला 'फ्लॅट क्र. ३०२ ची वर्गणी थकीत. मी भरली. पावती फ्लॅटच्या टपालपेटीत टाकली आहे.' सूचना - 'कृपया पावती जपून ठेवावी - गोपाळ (१०१).'

हे वाचल्यावर मात्र फ्लॅट क्र. ३०२ गोपाळरावांकडे वर्गणीचे रोख पैसे देऊन दिलगिरी व्यक्त करून आले. पुढच्यांना अंदाज येऊन दोघे सेक्रेटरींकडे जाऊन थकबाकी भरून आले. गोपाळरावांची कुणाबद्दलही तक्रार नव्हती. सहजीवनाचे फायदे घ्या आणि जबाबदाऱ्याही घ्या - एवढं मात्र ते सुचवीत.

दोन महिन्यांनी अचानक हृदयविकारानं गोपाळरावांना अलगद उचललं. आता मात्र सोसायटी हालली. वार्षिक साधारण सभाच काय, कुठल्या स्थापनेपासूनच्या मीटिंगला नव्हती एवढी गर्दी गोळा झाली. पुढचे सोपस्कार झाले. सर्व परतले. सर्वत्र खिन्नता होती. स्वतःच्या घरातलं माणूस जावं तशी प्रत्येकाची अवस्था होती. ज्यांचे दोष त्यांना जाणवले होते त्यांचीसुद्धा मनःस्थिती हुरहूर लागल्यासारखी होती.

सर्व परतले तोपर्यंत बोर्डावर ठळक नोंद होती. उणीव - 'मोठी उणीव प्रिय गोपाळरावांचे निर्याण.' 'माझी कृती' - 'त्यांनी जाणवून दिलेल्या सहजीवनातल्या जबाबदाऱ्या मी पाळीन आणि इतरांनी नाही पाळल्या तरी माझ्या कुवतीप्रमाणं मी त्यांच्याही जबाबदाऱ्या पाळीन. गंगाधरराव (१०२).' 'टीप' - 'शक्य असेल त्यांनी उस्फूर्त सहकार्य करावं.'

सोसायटीत दुसरा दिवस उजाडला. पहाटे फिरायला जाणाऱ्यांच्या,

दूधवाल्यांच्या खेपा सुरू झाल्या. ज्याचं त्याचं बोर्डाकडं लक्ष जात होतं. पहाटेच सर्व विंगमधल्या सर्वांच्या फ्लॅट क्रमांकाच्या नोंदी गंगाधररावांच्या आवाहनाखाली झाल्या होत्या. तोवर उजाडलं. गंगाधरराव केरसुणी घेऊन आपल्या विंगच्या जिन्याचा केर काढायला वरच्या मजल्यावर जाताना लोकांनी पाहिले. हातात केराची सुपली. मनात किंचित किन्तु असलेल्यांचीही शंका फिटून गेली.

हळूहळू प्रत्येक विंगमधले लोक बाहेर पडले होते. एकत्र आले होते. एका विंगचा जिना झाडायला इतक्यांची गरज नव्हतीच. चर्चा झाली. आठवड्याचा एक वार एकानं उचलला तरी आठवडाभर पुन्हा पाळी येणार नव्हती. त्रास कुणालाच होणार नव्हता. जिनाही सतत स्वच्छ राहणार होता. सर्वजण एकत्र होऊन गंगाधररावांकडं गेले. तोवर विंगचा जिना झाडीत गंगाधरराव तळमजल्यावर पोचले होते. त्यांच्यासमोर हा प्रस्ताव सर्वांनी मांडला. तो त्यांनाही मान्य झाला.

काल सोसायटीतला एक दीप मालवला होता. पण उरलेले एकोणतीस दीप उजळले होते. खऱ्या 'सहजीवन' सोसायटीला सुरुवात झाली होती !

आता प्रतीक्षा होती ती या दीपांच्या प्रकाशात चालणाऱ्या इतरांची आणि या दीपांवरून आपापले दीप उजळून घेऊ इच्छिणाऱ्या इतर असंख्य सोसायट्यांची, संस्थांची !

११. विसावा, टप्पा की मुक्काम ?

ज्येष्ठ-आषाढात दर वर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आषाढी एकादशीचं लक्ष्य ठेवून असंख्य दिंड्या प्रस्थान ठेवतात. तशीच एका खेडेगावातून पंढरीकडं निघालेली ती दिंडी होती. आबांनी पूर्वी कधीच दिंडीत भाग घेतला नव्हता. याच वर्षी जरा जोर करून ते घरातून बाहेर पडले होते. खरं तर बरोबरच्या त्यांच्या मित्रांनी त्यांना जरा बाहेरच काढलं होतं म्हणा. कारण आबा सारखेच बिझी. आधी आयुष्यभर शाळेची नोकरी. बदल्या. चार मुलांचा प्रपंच. एकाच्या मॅट्रिकमधून बाहेर पडतात तोपर्यंत दुसऱ्याची मॅट्रिक जवळ. त्यातून बाहेर येतात तोवर पहिल्याची इंटरची महत्त्वाची परीक्षा. मग पुढचे प्रवेश कोर्स. तोवर इकडं धाकट्याची सातवीची स्कॉलरशिपची परीक्षा. आबा बिझीच बिझी.

पण या वर्षी सर्व मित्रांनी मिळून घरी वहिनीसाहेबांची परवानगी काढून आधीपासून मोर्चे लावले होते. कारण दर वर्षी आबांची कामं कधी संपायचीच नाहीत. आधी सुटी संपून शाळा सुरू झाली म्हणून. कधी एखाद्याच्या ॲडमिशनची गडबड म्हणून. पुढं मुलाची इंजिनिअरिंगची परीक्षा लांबली - स्पर्धा निकाल - कधी प्रवेश - कधी मुलीसाठी स्थळं पाहाणं - कधी जवळच्या कुणाचं आजारपण - अपघात म्हणून. आबा सतत व्यग्र. कबूल करूनही पंढरीचा योग टळतच जाई. म्हणून इतर मित्रमंडळींचा जाण्याचा जोर या वर्षी विशेषच वाढला. त्याला यश आलं.

आबांना कष्टांची सवय होती. अडीअडचणींचीही सवय होती. त्यामुळं त्यांना दिंडीत ते काही कठीण गेलं नाही. फक्त फार चालणं आणि भजन-प्रवचन सवयीचं नव्हतं. पण म्हणणारे, सांगणारे तळमळीचे असल्यानं

प्रत्येक दिवशी आबांच्या या बाबतीतल्या ज्ञानात भर पडत होती. आजवर त्यांनी प्रपंचासाठी कष्टांत कुठं कसूरच केली नव्हती. पण त्यांत ते इतके दिवस बुडालेले होते की, त्यांना स्वतःकडं बघायला कधी सवड मिळाली नव्हती. आपल्या प्रपंचाकडंही त्यांनी कधी बाजूला होऊन पाहिलं नव्हतं. आता ती संधी अनायास आली होती. प्रवचन-कीर्तनातून परमार्थ उलगडत होता. पांडुरंगाची ओळख पटत होती. दिशा मिळत होती.

एके दिवशी सकाळी लवकर चालणं सुरू झालं होतं. काही दिवस गेल्यानंतर रोजचं चालणं, किलोमीटर, थांबे आबा हळूहळू विसरायला लागले. उठायचं, नामस्मरण, आरती, चालणं सुरू. त्या दिवशी चाल बरीच पडली. पोचायला दुपारचा एक वाजला. एका मोठ्या शाळेच्या पटांगणात मुक्काम पडला. जेवणं झाली. मंडळी विश्रांतीसाठी लवंडली. आबाही उशाला हात घेऊन शाळेच्या व्हरांड्यात आडवे झाले. डोक्यावर धोतराचा सोगा. दमल्या जिवाला पंढरीच्या ओढीच्या नादात अन् मिळालेल्या मोकळ्या वातावरणात गाढ झोप लागली.

कदाचित ते तसेच सात-आठ ताससुद्धा झोपले असते. पण अर्ध्या - पाऊण तासात त्यांच्या शेजाऱ्यांनी त्यांना हाका मारून उठवलं. आबा इतके गाढ झोपेत होते, त्यांना तो भासच वाटला. ते पुन्हा डोळे मिटून झोपी गेले. हाक मारणारे शेजारी आपली पथारी आवरून, तोंड धुऊन आले तरी आबा अजून गाढ झोपेतच होते. हे पाहिल्यावर मात्र शेजाऱ्यांनी जरा जोरात हाक मारून सांगितलं, 'आबा, लवकर उठा. दिंडी दहा मिनिटांत हालणार. मागं पडू आपण. चला घ्या आवरून. आपला आजचा मुक्काम इथं नाही, पुढच्या गावी आहे. हा विसाव्याचा थांबा होता दुपारच्या उन्हाचा !' आबा अजून डोळे चोळताहेत हे बघून ते पुन्हा वळता वळता म्हणाले, 'हा विसावा आहे, विसावा. मुक्काम नाही !'

आता मात्र आबा ताडकन उठले. त्यांनी थोड्या गडबडीनंच आवरलं. टोपी डोक्यावर ठेवून खांद्याला शबनम अडकवून ते तयार झाले. तोवर पांडुरंगाचा, माउलींचा, तुकोबांचा गजर होऊन पालखी हलली. ते टाळ घेऊन दिंडीत सामील झाले. त्यांचे हात टाळ वाजवीत होते पण कानात घुमत होतं, 'विसावा आहे, विसावा, मुक्काम नाही !' आतून कुणी तरी हा आवाज आपल्याला सारखा देतं आहे असं त्यांना वाटू लागलं. दिंडीत आठवडाभरात त्यांचं स्वतःच्या एरवीच्या दिनक्रमांचं चित्र सारखं समोरून जाई. कुठं कीर्तनात एखादा अभंग, एखादा विचार, निरूपण आलं, ते याला धरून असलं की त्यांना वाटे 'फुकट इतकी वर्षं खरोखर एखाद्या घाण्याच्या बैलासारखेच आपण राबतो आहोत. आपणच व्याप वाढवायचा, आपणच निस्तरायचा. रोज आपल्याला जगवणाऱ्या, प्रसंगात सावरणाऱ्या देवाला आठवड्याला सोडा महिन्यातून एकदा जायलासुद्धा आपल्या प्रपंचानं सवड दिली नाही. आता त्यांना वाटू लागलं, 'हेच ते !' 'त्यानं दिली नाही असं नाही. आपणच ती घेतली नाही.'

आज गेले आठ दिवस कसे आपण काठावर असल्यासारखे आहोत. काय अडलं ? तिकडं काय ते सांभाळत असतीलच. गडबड झालीच असती काही, तर सांगावा आला असताच. शिवाय आपण दर मुक्कामाला बूथवरून फोन करतो तेव्हा कुठं जाणवतही नाही की, तिकडं काही फार मोठी उणीव पडली आहे, कुणाचा घास अडला आहे. आपणच विणून ठेवलेला कोष. आपणच त्यातून बाहेर पडता येत नाही म्हणत इतकी वर्षं काढली. ही संतमंडळी, सज्जन मित्र भेटले, त्यांनी जोर केला, म्हणून हे कळलं. नाही तर आपण प्रपंच हा मुक्काम समजूनच आपलं काय राहिलं आहे ते उरलंसुरलंही आयुष्य गेलं असतं. यांच्या कृपेनं कळालं, प्रपंच 'मुक्काम नाही, विसावा आहे, विसावा !'

आबांसारखी अवस्था अनेक तथाकथित विद्वान, हुशार, कर्तबगार, शास्त्रज्ञ, कलाकार, यशस्वी, प्रथितयश - अनेकांची असते. कुणाचा प्रपंच चार भिंतीत चालतो, कुणाचा स्टेजवर, कुणाचा पैसे साठवण्यात, कुणाचा कुठल्या संस्थेत मांडलेला असतो. कुणाचा कुठल्या पक्षात, कुठल्या चळवळीत, कुठल्या विचारसरणीत...! कुणाचा कुठं ! पण ज्याला त्याला तो मुक्कामाची जागा वाटतो हे खरं. जोपर्यंत विसाव्याचा थांबा अन् मुक्कामातला फरक कळत नाही तोपर्यंत.

विसावा तर दुपारची वेळ टळली की सोडावाच लागतो. कुठं तासभर आधी, कुठं तासभर नंतर. विसाव्याच्या वेळी वारकऱ्याला पांडुरंग समजून पाया पडणारा गावकरी संध्याकाळी वारकरी तिथं दिसला तर साशंक होऊन पाहील. वाईट म्हणून नव्हे. पण हा मागं का राहिला असं वाटेल. विसावे विसाव्याच्या वेळेतच सोडले तर छान असतात. एखादी दिंडी लवकर हालली, वारकरी लवकर दिसेनासे झाले तर त्या दिंडीला मान उंचावून गाव पाहील, त्या दिशेला नमस्कार करील, थोडी चुटपूट वाटेल. पण साशंक नाही होत.

कर्तृत्वाचे, प्रगतीचे प्रपंचातले टप्पेसुद्धा असे विसाव्याचीच ठिकाणं असतात. काही विसावे, काही टप्पे. लौकिक शिक्षणाच्या विसाव्यातून ते पूर्ण होताच बाहेर पडावं. उगीच आयुष्यभर पदव्या घेत बसू नये, आता प्रपंच मांडायला त्यांचा वापर करावा. नोकरीत बदली झाली की गाव सोडावं तसं मुलाबाळांच्या टप्प्यातून अलगद बाहेर पडावं. नोकरीत साठी झाली की विसावा सोडून उत्तरायुष्याच्या टप्प्यात जावं. पैसा मिळवण्याचासुद्धा टप्पा विसाव्याचाच थांबा. गरजांचा साधारण अंदाज आला की थांबावं. तो मुक्काम नव्हेच. नाही तर साठीनंतरसुद्धा कुठं वेळ जात नाही, अनुभवाचा फायदा द्यायचा असल्या गोंडस नावाखाली पैशासाठी विसावा सोडू नयेसं

वाटेल. अधिक पैसा येईल पण काळ आयुष्य काढून घेईल अन् मोठमोठे आजार तो पैसा काढून घेतील. मुक्कामाला दिंडी जाणारच नाही. अस्वस्थतेची चोराची आळंदीच नशिबी येईल.

वास्तविक असे अनेक विसावे पार पडल्यावर किंवा तात्पुरते मुक्काम - टप्पे झाल्यावर त्या साऱ्यांचा फायदा माणसाला मिळून जावा. ज्याच्या त्याच्या पदरी कर्तव्यांची मापं टाकल्यावर उरलंसुरलं देवाच्या अभ्यासाला नि उपासनेला द्यायला मिळावं. ही तर आपल्याच आयुष्याची समाधानाच्या पंढरीकडं न्यायची दिंडी. देव कधीचा वाट पाहातो आहे. प्रत्येक विसाव्याच्या वेळी, वाटेतल्या मुक्कामाच्या वेळी तो सांभाळतो, त्याला आशा असते की, जरूर तेवढी विश्रांती झाली की हा दिंडी आपल्या दिशेनं रोज पुढं नेत राहील.

पण अनेक आयुष्यांच्या दिंड्या वाटेत कुठं तरी प्रतिष्ठेच्या, सत्तेच्या, वाढवून ठेवलेल्या प्रपंचाच्या, कलेच्या, छंदाच्या, पैशाच्या - अशा अगणित देवळांच्या आसऱ्याला कर्तव्य म्हणून विसावतात, त्या आयुष्यभर तिथंच मुक्काम करतात. भूल पडते. मग त्याचंच समर्थन करतात. हाच तो मुक्काम म्हणून विसाव्याला मुक्कामाचा बोर्ड लावून खोट्या समाधानात राहातात. उलट आणखी कोण आपल्या सोबत राहायला तयार होतो का पाहातात. सोबती खूप मिळतात. कारण रोज जे ते ठिकाण सोडून देवाच्या दिशेनं चालण्यापेक्षा असं रंगून जाणं साहजिकच सोपं असतं, कमी कष्टाचं असतं. मग कधी कधी मागून आलेल्या दिंड्या पुढं जाताना हाकारे आणि टाळ ऐकू येतात तेव्हा दुर्लक्ष करून अस्वस्थ न व्हायची सवय लावून घ्यावी लागते. तेही न जमलं तर व्यसनांचे मुक्काम चौकाचौकात साथ देतात. देवाची नि ध्येयाची भूल पाडायला समर्थ असतात.

पण जे सावध असतात ते लोक अध्ययन असो, अर्थार्जन असो,

गृहस्थपण असो - जिथले तिथं विसावे नि टप्प्यावरचे मुक्काम पार पाडीत शेवटी वृत्तीनं संन्यस्त आणि म्हणून अत्यंत समाधानी अवस्थेच्या पंढरीकडं नित्य वाटचाल करतात. घरचं घरच्यांना, समाजाचं समाजाला, देशाचं देशाला, जगाचं जगाला आणि देवाचं देवाला देण्याचे विसावे वेळीच पार करीत गेल्यानं स्वतःचं समाधान स्वतःला राहून देहदिंडी अंतिम मुक्कामाला नेतात.

हे तर कुणालाही करता येतं. पण त्यासाठी ज्या त्या टप्प्यावर 'हा विसावा आहे, विसावा, मुक्काम नव्हे' म्हणून हाकारा देणारा अंतर्यामीचा सोबती जोडावा लागतो, टिकवावा लागतो, त्याचं ऐकावं लागतं !

१२. भेट - परतभेट

साड्यांच्या दुकानात प्रवेश करताच मालकांनी हात जोडून व्यावसायिक स्वागत केलं. 'या साहेब, बरेच दिवसांनी भेट दिली.' लगेच नोकराला बोलवून 'अरे, जरा चहा सांग.' बरोबर साड्या घेऊन व्हायच्या वेळी येणारा हा चहा होता आणि त्याचा खर्च आपल्या बिलात आहे हे मला माहीत होतंच. पण उपचार म्हणून हेही सारं घडतं हे काही कमी नाही. निदान वातावरण चांगलं राहात होतं. आतल्या साड्यांच्या दालनातले लाईट लागले. आलो जरा आत जाऊन येतो, म्हणत मी काउंटरवरून पुढं गेलो. त्यांना त्यात आनंदच असल्यानं त्यांनी, जरूर, म्हणून खूण केली. लगेच त्यांच्या हाताशी आलेला त्यांचा कॉलेजमधला मुलगा पुढं झाला.

आतल्या गादीवर स्थानापन्न झाल्यावर त्यानं लगेच उरलेले लाईट लावीत प्रश्न केला, 'काय, वहिनी नाही आल्या ?'

'नाही घरी जरा पाहुणे वगैरे आहेत.'

लगेच तो सूर पकडून मुलानं पुढचा प्रश्न केला. 'मग साड्या देण्याघेण्याच्या दाखवू की घरी वहिनीसाहेबांसाठी ?' मी मनात म्हटलं, 'मुलगा छान तयार झाला. व्यवहाराचे बारकावे कळू लागले. शाळेतलं शिक्षण जीवनात थोडंच उपयोगी पडतं ?' मग नेहमीप्रमाणं संवाद होऊन आलेल्या पाहुण्यांसाठी सांगितल्याप्रमाणं देण्याघेण्यातल्या साड्या घेताघेता त्यानं एखादी खास वापराची पण न्या वाटलं तर वहिनींसाठी, नवा स्टॉक आला आहे, त्यांना आवडली तर ठेवा. नाही पसंत पडली तर केव्हाही आणा, अवश्य परत घेऊ म्हणत आणखी चांगल्या दोन साड्यासुद्धा जवळजवळ आग्रहानं घ्यायला लावल्याच. हजार - दीडहजाराची खरेदी

करायला गेलेला मी तीन हजार देऊन कपभर चहावर कधी बाहेर पडलो मलाही कळलं नाही. फक्त आणखीही काही त्यादिवशी घडलं.

त्या मुलाचं कौशल्य व्यावहारिक होतं. ते मला कळत होतं. माझे जाणारे पैसे मला कळत होते. पण कॉलेजमधून अजून बाहेर न पडलेल्या मुलाला व्यवहार कळू लागला याचा मला आनंद झाला होता. यात फार कुठं अशी व्यावसायिक फसवणूक नव्हती. आग्रहात तारतम्य, अनेक वर्षांतल्या संबंधांना टिकवण्याची काळजी, तिकडं या साऱ्याची व्यावसायिक यशस्वितेशी सांगड सारं काही होतं. दिखाऊ-मानपानाचं देणं-घेणं नि वापरण्यातलं दर्जाचं घेणं - हा फरक नि व्यवहाराची नाडी त्याला अचूक माहिती होती. अनेकदा निर्भेळ व्यवहार असला तर थोडा तोटा झालेला, थोडं सोसावं लागलेल्या प्रसंगांतसुद्धा पाहाण्याचा एक आनंद असतो तो मी तटस्थपणानं घेत होतो. वरवर दिसायला सारख्याच वाटणाऱ्या पण किंमतीत कमी, टिकायला कमी, मालातला फरक तर त्याला माहिती होताच, पण त्यानं मला खरा धक्का दिला तो पुढंच.

त्यानं तोवर आलेला चहा इकडं गादीवरच मागवला. माझ्या बरोबर घेतला. पण त्यानं चेहरा वाचला की काय कुणास ठाऊक.

तो मुलगा मला म्हणाला, 'साहेब, हे आता खरेदीचं राहू दे. तुम्ही ठरवा काय ते फायनल. पण मला असं वाटतं की तुम्ही देण्याघेण्याची घेतलेली साडी घरी ठेवणार आणि ती वहिनीसाहेबांना घेतलेली साडी बहुतेक पाहुण्यांनाच देणार !'

आता चकित व्हायची पाळी माझी होती. मला गल्ल्यावर बसलेल्या आणि चांगले व्यावसायिक म्हणून नाव कमावलेल्या त्याच्या वडिलांनासुद्धा तो चांगल्या अर्थानं मागं टाकील असं क्षणभर वाटलं. त्याचाही मला आनंदच झाला.

मी मोकळेपणानं म्हटलं, 'खरं आहे, छोटे शेठ, कसं काय ओळखलं ते ?'

'परवा तुम्ही गणपतीला आला होता ना ?'

मी चमकून म्हटलं, 'हो.'

तो म्हणाला, 'तेव्हा तुम्ही देवाला पैसासुपारी ठेवली होती. त्या सुपारीवरून मी ओळखलं. ती पूजेची नव्हती, खायची होती !'

'तुला फरक कसा माहीत ?'

'पपांनी सांगितलं आहे. आणि हेही सांगितलं आहे की, खायचीच सुपारी देवाला ठेवीत जा. मी ठेवतो. पण कुणी सहसा ठेवीत नाही ना ! त्यामुळं तशी ठेवलेली दिसली की लक्षात राहातं. मलाही ते पटलं आहे.' मला न राहवून मी त्याच्या पाठीवर शाबासकी दिली.

बाहेर येताना शेटजींना म्हटलं, 'मालक, एक सांगावंसं वाटतं, तुमच्या दुकानाची तर काळजी नाहीच आणि तुमच्या चिरंजिवांचीही नाही. त्याचबरोबर मला जगातल्या पारख अन् चांगुलपणाची पण नाही !'

तो म्हणत होता ते खरं आहे. अनेकदा हा मोठा धक्कादायक प्रकार असतो. दुकानात सुपाऱ्या द्या म्हटलं की, 'साहेब, खायची की पूजेची' म्हणून विचारतात. सर्वांना हेही माहिती असतं की, अशा देवापुढच्या सुपाऱ्या काही देव खात नाही नि पुजारीही. मुळात देवच मानत नाही, तो ती छोटी सुपारीही देत नाही, हे वेगळंच.

या सुपाऱ्या फिरून बाजारात येतात, फिरत राहतात. पण हेही आहे की, अशा देवाच्या सुपाऱ्या या देवाच्या, छोट्या म्हणून परतपरत नुसत्याच फिरत असतात. पण मोठ्या सुपाऱ्या ठेवल्या गेल्या तर त्यांचं सॉर्टिंग होताना खायच्या म्हणून त्या खायच्या सुपाऱ्यांच्या कप्प्यात टाकल्या जातात. मग तरी त्या जिवंत देवापर्यंत पोचतातच ना ? आता तसं पाहिलं

तर सुपारी ही मुळात काही फार सात्त्विक वस्तू नाही - हे सगळं खरं. पण माणसाचा भाव कळायला ती उपयोगी पडते हेही तितकंच खरं आहे.

माणसानं जी देवाला किंमत दिली आहे म्हणजे पर्यायानं दुसऱ्याला किंमत दिली आहे ती यावरून कळते. पण इकडं कुणी लक्ष देत नाही की, देव काय, दुसरा काय, तीच किंमत त्याला देणार आहे. देव तर जरूर. कर्माचं फळ तर जरूर. देणं देईल तसंच घेणंही येईल. कर्माच्या तराजूचा काटा सरळ आहे. तो छोट्या सुपारीला छोटीच सुपारी परत देणार आहे, देखाव्याच्या वस्तूला देखावा नि अंतरंगातल्या भेटीला अंतरंगाचीच भेट परत करणार आहे. भेट-परतभेट अशीच सुरू रहायची आहे.

पण जगाला असे वरवरचे व्यवहार करणं, त्याची पुन्हा प्रसिद्धी करून घेणं, त्यावर संबंध जोखणं सवयीचं झालं आहे. खरं पाहाता बाह्य देण्याघेण्यालासुद्धा तशी खरी किंमत नसतेच. असते ती त्यामागच्या खऱ्या भावाला. म्हणून भगवंताच्या तराजूत भावाचं तुळशीपत्रसुद्धा सोन्याच्या लगडीपेक्षा जास्त वजनाचं भरतं. विशेष म्हणजे, सारं जग कदाचित या बेगडी देण्याघेण्याला भुलेल, स्वतःही त्यात भाग घेईल, ते न केलं तर त्या माणसाबद्दल राग बाळगेल. त्यावर त्याचे संबंध ठेवील - पारखील - तोडील पण आतून कुठं तरी खऱ्याची पारख त्याला असते. अंतर्मन म्हणजे न दिसणारा भगवंतच तो. तो आतून सांगत असतो की हा व्यवहार खोटा आहे. शक्यतो खरा व्यवहार कर.

मग हे सारं करताकरतासुद्धा आतून माणूस कुठं तरी खऱ्या भावनेच्या, ओलाव्याच्या, निःस्वार्थीपणाच्या, निरपेक्षतेच्या शोधात असतो. तो त्याला एखाद्या समाजसेवकात भेटतो, एखाद्या गरीब कार्यकर्त्यात भेटतो, एखाद्या चळवळीच्या चालकात भेटतो, अकारण किंवा महागडी औषधं न घेण्याचा सल्ला देणाऱ्या डॉक्टरमध्ये भेटतो, जगासाठी तळमळीनं झिजणाऱ्या

निःस्वार्थी सत्पुरुषात भेटतो. त्यावेळचा आनंद अवर्णनीय असतो. फार काळ पुरतो, प्रेरणा देतो.

अर्थात जगाचा व्यवहार एवढा मोठा नि देखावा एवढा रूढ असताना अशा जागा, असा अनुभव हा क्वचित भेटेल. कदाचित दुर्मीळ फुलासारखा शोधावा लागेल हे खरं, पण ही खऱ्या भावनेची वनस्पतीही जगाच्या दिखाऊ व्यवहाराला पुरून उरेल इतकी जुनी आणि चांगल्या अर्थानं चिवट अन् नष्ट न होणारी आहे. ती जगवायला ईश्वर तर मदत करतोच आहे पण अशी माणसंही ती टिकवून धरायला मदत करीत आहेत, करीत राहतील.

तोवर मात्र जगाचा व्यवहार असाच चालेल. अशाच दोन प्रकारच्या सुपाऱ्या मिळतील, अशाच देण्याघेण्याच्या साड्या मिळतील. मग हे दुर्मीळ चांगुलपण, खरेपणाचा व्यवहार, शुद्ध भावाचा - प्रेमाचा व्यवहार टिकवायचा असेल तर ज्यांच्या हे लक्षात येतं, त्यांना तो कौशल्यानंच टिकवावा लागेल. टिकवायचा ठरवला तर टिकवता येतो. जग कधी बदलेल तेव्हा बदलेल.

माझ्यापुढंच एकदा मोठ्या गिफ्टसेंटरच्या दुकानच्या पायऱ्या चढून एक पतीपत्नी दुकानात जात होती.

पत्नी पतीला बजावीत होती, 'आपला आहेर असला तरी आत गेल्यावर आम्हाला वापरायला हवं आहे असं सांगा !' बोलणं पुरं व्हायच्या आतच त्यांनी दुकानात प्रवेश केला. मला काही संदर्भ लागला नाही. पण त्यांच्या मागून आत गेल्यामुळं माझा नंबर त्यांच्या मागंच होता. हे गिफ्टसेंटरमध्ये काय घेणार हे उगीचच कुतूहल होतं. मी पाहात राहिलो.

पतीनं आत गेल्यावर मालकांना विचारलं, 'मिक्सर आहे?'

मालक म्हणाले, 'खूप व्हरायटी आहेत. पण कुठला दाखवू ? देण्याघेण्याचा की तुम्हाला स्वतःलाच वापरायचा आहे ?' पतीच्या क्षणार्धात लक्षात आलं.

त्यांनी स्पष्ट सांगितलं, 'आम्हाला वापरायला हवा आहे.'

वास्तविक उभयतांच्या मित्राच्या घरी तो त्यांना भेटच द्यायचा होता. पण बाजारात भेट वस्तू दिखाऊ नि स्वस्तातली मिळते. ती तितकीच टिकते. स्वार्थाच्या वापरालाच फक्त अस्सल, महाग, दर्जेदार उत्पादन दाखवलं जातं. हे पत्नी जाणत होती. पतीला खरा व्यवहार टिकवायचं कौशल्य शिकायला मिळालं होतं. पण पत्नीकडं दुर्मीळ, खऱ्याची, भावाची वनस्पती अजून जिवंत होती. नंतर त्यांच्या गप्पांतून ते कळलं.

मला मिक्सरसारख्या वस्तूही देण्याघेण्यातल्या मिळतात एवढं ज्ञान नव्हतं. पुढं ओघात मालकांना विचारलं. ते म्हणाले, 'अहो, मिक्सर काय घेऊन बसलात कूलर, हीटर, फ्रीजच नाही तर संगणकसुद्धा द्यायचेघ्यायचे मिळताहेत, आता बोला !' मला वाटलं माणूस उगीच संगणकयुगाच्या नि तंत्रज्ञानाच्या गप्पा मारतो. प्रगतीच्या या शतकांतही तो जुनीच बेगडी-बेन्टेक्सची आवड नि जाणीव घेऊन वावरतो आहे.

भाग्य एवढंच की, कुणाच्या तरी मनाच्या कोपऱ्यात शुद्ध भावाच्या, खऱ्या नात्यांच्या, खऱ्या देण्याच्या मौलिक वनस्पतीसुद्धा देवदयेनं, माणुसकीच्या सिंचनानं टिकून आहेत. त्याही पुरेशा चिवट आहेत. म्हणून कुणाच्या ना कुणाच्या रूपानं व्यवहाराच्या रखरखीत वाळवंटातही निर्भेळ आनंदाच्या सद्‌भावनांचे ढग प्रसन्नतेचा शिडकावा करून जात आहेत, कौशल्यानं जपावी लागणारी ही वनस्पती त्यामुळं टिकून आहे आणि टिकून राहणारही आहे ! जगण्याची निवड करणं आपल्या हातात आहे. भेट तशी परतभेट मिळणं सुरूच राहणार आहे..!!

१३. गुण कशात ?

जुन्या काळातली गोष्ट आहे. एका झोपडीत एक साधू राहात असे. तो कुठं जात - येत नसे. रोज उठून झोपडी व परिसर झाडून स्वच्छ ठेवी आणि जनसंपर्कापासून सहसा दूर राही. कुणाकडून कशाची अपेक्षा करीत नसे. लोक आले तर त्यांना तो आदर देई. त्यांनी काही शंका, प्रश्न विचारले तर त्यांचं समाधान करी. तो प्रदेश गारठ्याचा असल्यानं त्याच्या झोपडीत एक धुनी पेटवलेली असे. साधं लाकूड लावलेलं असे. कधी तो तिथं नसला किंवा त्या धुनीजवळ दुसरे कुणी असले तर ते लाकूड पुढं करीत, कधी संपलं तर बाहेर परसूपरड्यातलं आणून लावीत. मंदपणे चालणाऱ्या त्या धुनीची राख त्या खड्ड्यात पडे. कधीकधी एखादा व्याधीनं ग्रस्त होऊन त्रासून गेलेला कुणी आला आणि सर्व उपाय करून, थकून त्यांना प्रार्थना केली तर ते साधू त्या धुनीतली थोडी राख, भस्म म्हणून त्याला देत. बहुधा हा उपाय वाया जात नसे. त्या माणसाला उतार पडून तो बरा होई. एरवी जिज्ञासूंचं इतर पारमार्थिक विषयांचंही समाधान होई. त्याच्या साधुत्वाची कीर्तीही हळूहळू पसरत गेली. त्या साधूकडची गर्दी त्यामुळं वाढत गेली.

हे सारं दुसरा एक साधू पाहात असे. तो थोडा महत्त्वाकांक्षी होता. त्यानं याची कीर्ती ऐकली. थोडे दिवस बसून निरीक्षण केलं. त्यानं विचार केला की, जास्त गर्दी ओढायला हे राखेचं काम अधिक सोपं आहे. गावाच्या दुसऱ्या एका कोपऱ्यात त्यानं एका पडक्या देवळात तळ ठोकला. एक धुनी पेटवली. राख जमू लागली.लोकही हळूहळू येऊ लागले.याचा उद्देश भस्म देऊन लोक बरे करून कीर्ती मिळवण्याचा होता. बाकी देव, सदाचरण,

जिज्ञासापूर्ती वगैरे काही नव्हतं आणि त्याला ते शक्यही नव्हतं. लोकांना काय असंख्य व्याधी. कुठं नि कशा का बऱ्या होईनात. लोकांनी प्रथम गर्दी केली. हा साधू भस्माचे पैसे घेई. पहिला साधू भस्माचं काहीच घेत नसे.पण बरं होण्याच्या आशेनं लोकांनी पैसेही मोजले.भस्म वापरून थोडी वाट पाहिली. याचं तसं बरं चालू लागलं. तो खूश झाला. पण बराच काळ गेला तरी गुण मात्र पडेनासा झाला. कदाचित आपलंच काही चुकलं असेल, आपणच पापी असू - अशा सरळ विचारानं अनेक लोक प्रथम शांत राहिले. पण गुण न पडणाऱ्यांची संख्या जास्त झाल्यावर मात्र लोक उघड बोलू लागले. हळूहळू या दुसऱ्या तथाकथित साधूच्याही ते कानावर आलं. तो पैसे घेत असल्यानं त्याच्या लक्षात पुढचा धोका आला. पैशामुळं आणि गुण नसल्यानं आपल्याला हे त्रासाचं होईल असं वाटून त्यानं विचार केला की, हे सारं हाताबाहेर जाण्याआधी काही करणं आवश्यक आहे. त्या पहिल्या साधूकडं जाणं थोडं अपमानाचं असलं तरी गाव सोडून जाण्यापेक्षा ते करणं बरं म्हणून त्यानं गुपचूप रात्रीचं त्या खऱ्या साधूकडं जायचं ठरवलं. तो साधू थोर मनाचा असल्यानं त्याच्याजवळ आपण हे सारं सांगू शकू या खात्रीनं तो तिकडं गेला. साधू झोपडीत एकटाच ईशस्मरणात तल्लीन आहे, हे पाहून त्यानं त्या खऱ्या साधूचे पाय धरले.

म्हणाला, 'साधूबाबा, क्षमा करा. मी काय करतो तुम्हाला माहीत असेलच.' साधू जरा हसला. पण गंभीर झाला.

या दुसऱ्यानं विचारलं, 'मीही अशीच राख देतो, कुणालाही गुण येत नाही असं कसं काय ?'

साधू म्हणाला, 'अरे, राख सारखीच आहे. खरं तर यात पडू नये. राख म्हणजे काही औषध नव्हे !'

मग हा म्हणाला,'मग कधी-कधी तुम्ही देता ना ? त्याला गुण

कसा येतो ?' साधू म्हणाला, 'अरे, एक तर मी सहसा हे करीत नाही. केलं तरी एक लक्षात घे, गुण राखेत नसतो, हातात असतो !' दुसरा साधू काय ते उमजला. या खऱ्या साधूला नमस्कार घालून गाशा गुंडाळून तपःश्चर्येला रवाना झाला.

पुढं काही काळानं एके दिवशी त्या साधूनं त्या झोपडीत शांतपणे देह ठेवला. जवळच ती धुनी शांतपणे धूर देत होती. सकाळी येणाऱ्या पहिल्या माणसासाठी संदेश ठेवला होता. 'याच धुनीतल्या अग्नीनं मला अग्निसंस्कार करा. या झोपडीतलं कुणाला काय हवं असेल ते घेऊन जायला सांगा. जागा स्वच्छ करून कृपया मालकाच्या ताब्यात द्या. इथं कुठलंही स्थान निर्माण करू नका. ते निर्माण होईल पण जिवंत ठेवायला तपःश्चर्या लागेल, ती कठीण आहे. निरंतर ईशस्मरण, पूर्ण निष्कांचनता, राखेतून गुण आल्यास मी घातलेल्या चार अटी पाळण्याची तयारी आणि या पद्धतीनं असंच निरपेक्ष निर्वाण - ज्याची तयारी असेल त्यानं पुन्हा झोपडी उभी करायची परवानगी जागेच्या मालकाला विचारावी.'

बातमी वाऱ्यासारखी पसरली. लोकांना त्या साधूचा वियोग चटका लावून गेला. कुणी तरी त्या साधूकडून भस्म घेऊन जाऊन बऱ्या झालेल्या लोकांपैकी एकाला मिनत्या करून बोलकं केलं. तो म्हणाला,'आता ते गेले म्हणून सांगतो. त्यांनी मला एक भस्म दिलं. मी खरोखरच बराही झालो. पण त्याच्याबरोबर चार अटी घातल्या होत्या. एक - यानं बरं झालं तर कुणालाही सांगायचं नाही. दुसरं - बरं झालं नाही तर मात्र इतरांना तसं सांगायचं, तिसरं - बरं झालं तर देवाचं स्मरण ठेवून जगायचं आणि चौथं - पुन्हा शारीरिक आजार बरे होण्यासाठी इथं यायचं नाही, यायचं तर सद्‌बुद्धी - सत्संग यासाठी यायचं !' हे सांगतानाही त्या साधूच्या मोठेपणाच्या आठवणीनं त्याला अश्रू आवरत नव्हते.

हळूहळू कळलं की, असे तर असंख्य लोक होते. जे राखेनंच काय त्या साधूच्या नुसत्या सहवासानं नुसते शारीरिकदृष्ट्याच नव्हे खरं तर मानसिकदृष्ट्या बरे झाले होते. सत्प्रवृत्त झालेल्यांची संख्या तर अगणित होती. ते मनोमन कृतज्ञही होते. पण साधूच्या अंतिम इच्छेशी प्रामाणिक होते. म्हणून त्याच्याविषयी वाटूनही त्यांनी साधूनं लिहून ठेवल्याप्रमाणं केलं. मात्र मालकानं ती झोपडी पाडायला किंवा परत घ्यायला पूर्ण सात्त्विक नकार दिल्यानं ती गरिबाची झोपडी प्रेरणा देत तशीच राहिली.

साधूच्या इच्छेनुसार त्यांनी त्याचं पुढं काही होऊ दिलं नाही. पण ज्या आठ तत्त्वांना धरून तो साधू आजन्म जगला ती तत्त्वं - निस्पृह रहा, संचय करू नका, त्यागाची धुनी पेटती ठेवा, ईशस्मरण सोडू नका, कर्तव्यं टाळू नका, सेवा सोडू नका, नम्रता सोडू नका, मृत्यूसाठी स्वागताची कमान सदैव उभी करून ठेवा - तिथं कोरली गेली आणि त्यानं भस्म देताना सांगितलेल्या चार गोष्टीही. त्यात खऱ्या जाणकार, जवळच्या, निष्ठेच्या माणसांनी अट घातली की, कुणी पुढं इथं आलं तर त्यानं प्रथम ते वाचावं, एक वर्ष पाळावं, मग त्याला झोपडीत दर्शनाला प्रवेश दिला जावा. उरलेलं आयुष्यभर ते टिकण्यासाठी झोपडीचं दर्शन फक्त वर्षातून एकदा मिळत असे. त्यामुळं साधू नसतानाही त्याच्या त्यागाच्या मार्गावरून चालणारे लोक संख्येनं थोडे पण निरंतर सुरूच राहिले.

ही गोष्ट वाचल्यावर आपल्या असंख्य तीर्थस्थानांची आणि समाध्यांची आठवण अपरिहार्यपणे होईल. देणग्या, अभिषेक, पूजा, आरत्या, दर्शनाच्या बाऱ्या, अमावास्या - पूर्णिमा, जयंत्या - पुण्यतिथ्या, पेढे, बत्तासे, खजूर, साखरफुट्याणे, बेदाणे अगणित प्रकारचे प्रसाद, तथाकथित जेवणावळी, त्याला देणग्या, असंख्य ठिकाणी दानपेट्यांतले पैसा-सोनं नाणं यांचे ढीग, मग त्याच्या विनियोगासाठी मार्बल, संगमरवर, निवासाच्या साध्यापासून

लक्झरीपर्यंत सर्व प्रकारच्या व्यवस्था, मग ज्याच्या त्याच्या प्रापंचिक स्वभावाप्रमाणं उत्सव-दिंड्या, आरत्या-फेऱ-फुगड्या-गाणी-बजावणी त्यात पुन्हा लग्नकार्यासारखे मान-मानकरी-जातीपातींच्या चढाओढी, मानपान, रुसवेफुगवे, राजकारणं... ही भली थोरली यादी डोळ्यांपुढून सरकू लागते.

मूळ ज्याच्या जिवावर हे उभं राहातं ते सत्पुरुष कुठं आणि या साऱ्या प्रापंचिक याद्या कुठं ! ते सत्पुरुष - कुणी फाटकी वस्त्रं नेसलेले, कुणी लंगोटी लावलेले, कुणी पारावर, कुणी झाडाखाली, कुणी एखाद्या कुडाच्या झोपडीत आयुष्य काढलेले. त्यांच्याजवळ हे भक्त उभं करतील त्यापेक्षाही भव्य साम्राज्य, संपत्ती नि सत्ता उभी करण्याची प्रचंड कुवत. पण त्यांची हृदयं करुणेनं भरलेली, व्यवहार अतीव साधेपणाचा, उभा जन्म त्यागाचा. शिकवण साधी-सरळ, अपेक्षा प्रामाणिक प्रपंच करण्याची. पण याचं भान या साऱ्या गडबडगोंगाटात कुणाला असेल का ?

या साऱ्या सत्प्रवृत्ती आणि सद्गुणांचा जीवनातला आचार ही ज्यांना खरी श्रीमंती, सौभाग्य वाटते अशा त्या साधुपुरुषांपासून ही सारी त्यांची वारसदार, हक्कदार, वहिवाटदार मंडळी किती दूर गेली असतील, हे त्यांच्याही लक्षात येऊ शकेल. कांदा, मीठ, भाकर, कुठं कधी कोरड्याला पाणी, कधी आमटी-भात, कधी शिळंपाकं अन्न, कधी भिक्षेतलं कच्चं पीठसुद्धा पाण्याबरोबर देवाची इच्छा म्हणून खाऊन हे साधू समाधानाची ढेकर देत. पुन्हा देवाचं स्मरण करीत लोकांच्या सेवेला सादर होत.

आता भक्तांचे आजचे चांदीच्या ताटातले नैवेद्य त्यांना तृप्त करीत असतील की त्यांच्या पोटात कालवाकालव करीत असतील ? स्वतः हातात झाडू घेऊन घरचाच नव्हे तर गावच्या रस्त्यावरचा कचरा काढणाऱ्या साधूंच्या आताच्या भव्य मंदिर परिसरात, स्वतः येताना वाटेत खाल्लेल्या वस्तूंच्या प्लॅस्टिकच्या पिशव्या नि पाउच बेसावधपणे फेकून देणारे नि तोसुद्धा कचरा

न काढता दर्शन घेऊन परतणारे 'भक्त' पाहून आपण सहनशक्तीची साधना करीत सूक्ष्मरूपानं इथंच राहावं की, त्याच रूपानं इथून तेवढा कचरा तरी काढावा किंवा इथून त्यांच्याही आधी निघून जावं याचा निर्णय घेताना त्यांना द्विधा होत असेल. दुःख तर खचितच होत असेल. असं खूप काही घडत असेल.

हे सारे प्रश्न कुणाला पडत असतील ? हा विचार करू शकणाऱ्यांना नक्कीच पडत असतील. कारण ते लोक हे जाणू शकतील की, मुळात हे साधुपुरुष उभं आयुष्य जगतात ते अशा काही तत्त्वांसाठीच. त्या तत्त्वांचं विस्मरण लोकांना झालेलं त्यांना दिसलं आणि ही गाडी कुठल्या तरी स्टेशनवर जाताना दिसली की, ते नक्की अस्वस्थ होत असतील. सूक्ष्म रूपानं ते असतीलच तर ती तत्त्वं जगणाऱ्या अशा खऱ्या साधूच्या झोपडीत नक्की मुक्काम करतील. भले तिथं गारठा असो, उकाडा असो, उपास पडो, विजनवास पडो ! तिथं मात्र अशा खऱ्या साधूंच्या सहवासात ते आनंदात असतील. तिकडं भले त्यांच्या भव्य देवळात त्यांच्याच मूर्ती किंवा समाधीच्या दर्शनासाठी बारी लागलेली असेनाका !

ते इकडं झोपडीत आनंदात राहतील. गुण भस्मात नसतो, त्या मागच्या त्यागी हातात असतो ! तसं खरं दर्शन अन् समाधान मूर्तीत नाही त्या मागच्या देवत्वात अन् साधुत्वाच्या अंगीकारात असतं. हे कदाचित भक्त जाणत नसतील पण ते तरी जाणतातच ना ? त्यामुळं ते असा अंगीकार व साधुत्व असेल अशा ठिकाणी समाधानानं राहात असतील आणि साधुत्वाचा गुणही तिथंच नांदेल, हे काही वेगळं सांगायला नको.

१४. पेटीतली बाळं

मनुष्य जन्म कितीही श्रेष्ठ असला आणि 'कदाचित' निसर्गातली श्रेष्ठ निर्मिती असला तरी निदान माणसाचं बालपण तरी अत्यंत परावलंबी असतं. इतकं की गाईगुरांच्या चतुष्पाद आणि म्हणून मनुष्यश्रेणीपेक्षा कनिष्ठ मानल्या जाणाऱ्या प्राण्यांच्या बालपणापेक्षाही किती तरी दुबळं. अर्थात याला माणसाच्या शरीरशास्त्राप्रमाणं पुढं विलक्षण प्रगत होणाऱ्या मेंदूची निसर्ग योजनेनंच राखलेली अपुरी वाढ कारणीभूत जरूर असेल, हे खरं. पण एक वेळ स्वतःला स्वतःचं लहानपण आठवत नसलं तरी दोनचार दिवसांचं एखादं बाळ पाहिलं की दया यावी इतकं ते दुबळं असतं.

पाहिलं की वाटतं, रडणं आणि हातपाय हलवणं याच्याशिवाय याच्या हाती खरोखरच काही नाही. कुणी दिलं तर पाणी, कुणी दिलं तर अन्न-दूध, कुणी पांघरलं तर पांघरूण, कुणी उचलून दुसरीकडं ठेवलं तर दुसरी जागा, खोली, अंगण, गॅलरी - काय ते दिसणार. निर्णयाचं तर बोलूच नका. आता या वेळी दूध पिणं योग्य, पाणी घेणं योग्य की, काही न घेणं योग्य, त्यांतसुद्धा साधं दूध प्यावं, गाईचं प्यावं की त्यातसुद्धा पाणी घालून घेतलं तर ते पचेल - असे असंख्य निर्णय त्या बाळाला घेता येत नाहीत. इतकंच नाही तर ते सारे निर्णय विशेषतः आईला, वडिलांना किंवा घरातल्या कुणा अनुभवी माणसाला विचारपूर्वक घ्यावे लागतात. मूल तर पूर्णतः त्यांच्यावर अवलंबून असतं. त्यांनी दिलेलं घ्यायचीसुद्धा निर्णयबुद्धी त्याला कमी पडते. ते नाकारतं. इतकं परावलंबी.

हे तर झालं सामान्य, व्यवस्थित वाढलेल्या, जन्मलेल्या बाळाचं, त्याच्या संगोपनाचं. दुर्दैवानं किंवा काही वेळा काही हलगर्जीपणानं काही

बाळं अपुऱ्या दिवसांची जन्मतात. बाहेरच्या वातावरणाला तोंड द्यायला अजून ती समर्थ नसल्यानं, पूर्वी योग्य वैद्यकीय मदतीअभावी ती मृत्युमुखीही पडत. पण आता अशा अगदी सातव्या महिन्यात किंवा अन्य काही अपुऱ्या वाढीमुळं अकाली, अपूर्ण अवस्थेत जन्मणाऱ्या बाळांची आता खूपच काळजी घेतली जाते. विशेषतः उरलेल्या वाढीसाठी , संरक्षणासाठी साध्या भाषेत वैद्यकीय निरीक्षणाखाली ती 'पेटीत' ठेवली जातात, ज्यात त्याच्या उरलेल्या वाढीची काळजी घेतली जाते. अशा पेटीतल्या बाळांच्या वाढीची विशेष काळजी घेतली जाते. बालपणी व थोडा काळ पुढंसुद्धा. एकदा त्यांनी सामान्य वाढीची पातळी गाठली की मात्र इतर मुलांबरोबर त्यांना वाढवलं जातं, ते उचितही असतं.

हे सारं आठवायचं कारण असं की आमच्या ऑफीसमधल्या एक सहकारी बाई दुपारी एक वाजता घरी फोन करीत. जवळजवळ गजर लावल्यासारखी त्यांना त्याची आठवण होई. पाच मिनिटं इकडंतिकडं. फोनवरचा संवाद ऐकण्यासारखा असे.

'किती वाजता आलास ? आज दहा मिनिटं यायला उशीर झाला का ? काय झालं ? बरं, आल्यावर मेन डोअरचं ग्रिल लावलंस का ? दाराला कडी घातली का ? डायनिंग टेबलवर जेवण झाकून ठेवलं आहे. त्यांतल्या एनॅमलच्या भांड्याचं झाकण काढून पाहिलंस का ? त्यात तुझ्या आवडीची भाजी आहे. आणि हे बघ, पोटभर जेव. सगळी भांडी नीट उघडून बघ. नाहीतर हाताशी येईल तेवढंच खाऊन उठशील. सगळं परत झाकून ठेव. काय होतंय ? डोकं दुखतंय ? मग फक्त सगळ्या अन्नावर झाकण ठेव. मी आल्यावर टेबल आवरते. तू झोप थोडावेळ. दुपारी बरं वाटलं तर क्लासला जा.'

ऑफीसमध्ये जरा नवीन असल्यानं मी इतरांकडं चौकशी केली

यांचा मुलगा केवढा आहे ! तेव्हा कळलं तो बारावीत आहे ! चकित व्हायची पाळी माझीच होती. बारावीत म्हणजे तो आता कायद्यानंसुद्धा सज्ञान व्हायची वेळ आली तरी त्याला भांड्यावर झाकण ठेवायला अजून सांगावं लागत असेल तर पुढं काय होईल ? उगीच काही तरी विचार करू नये म्हणून मी विचारलं की, त्याला काही तब्येतीचा किंवा मेंटल वगैरे काही त्रास, अपुरी वाढ वगैरे असं काही आहे का ? तसं तर काहीच नव्हतं. मग माझ्या लक्षात आलं. मी बरीच गावं फिरलो होतो. त्यांतल्या काही गावी पाहिल्यासारखं ते 'अजून एक पेटीतलं बाळ' होतं.

लहान मूल परस्वाधीन किती असतं हे आपण सुरुवातीला पाहिलंच, पण निसर्ग त्याला स्वाधीन करतो, स्वतःच्या पायावर उभं राहायला शिकवतो. नव्हे दोन पायांवर तोल सांभाळायला शिकवतो. हात मोकळे होतात. म्हणून वासरानं जन्मतःच उड्या मारल्या तरी दोन पायांवर उभं राहिलेलं मूल पाच-सहा वर्षांत त्या आधी प्रगत वाटणाऱ्या वासराला कधीच मागं टाकतं. मग तर जशी संकेतांची म्हणजे भाषा, गणित, कला अशी कौशल्यं वाढीला लागतात तसा खरा विकास होतो. त्यांत त्याला निर्णयशक्तीही येऊन जाते. साधं खाणंजेवणं तर सोडाच त्यांतलं बरंवाईट, जगातलं-माणसांतलं चांगलंवाईटपण, आपल्या भविष्यातली आखणी - अशा अनेक गोष्टी मुलं करतात, तेवढी समज नि निर्णयशक्ती त्यांना येत असते.

बाकी पूर्ण परिपक्वता ही जरी थोडी अवघड गोष्ट असली तरी एक निसर्गानं व वातावरणानं होणारा विकास हा या क्षमता जरूर वाढवीत असतो. त्यात खरं तर अडचण अनेकदा 'मुलाला लहान समजणाऱ्या, पेटीतलं बाळ समजणाऱ्या' पालकांचीच असते. आता त्याला थंडीवाऱ्यात, पावसात जाऊ देणं गरजेचं असतं. होईल एखादेवेळेस सर्दी. पण पुढं स्वतःच्या सोसण्याच्या कुवतीचा अंदाज घेऊन निर्णय घ्यायला तरी हे

त्यातूनच शिकणार असतं. पण या पेटीतल्या किंवा काही दिवसांतल्या बाळाची काळजी घ्यायची सवय झालेल्या एखाद्या पालकाला ही काळजीची सवय इतकी नकळत जडते आणि तो त्याचा स्वभाव होऊन बसतो की, उघड्या आकाशाखाली, जगरहाटीच्या ऊनपावसातसुद्धा टिकायची क्षमता यायच्या वयाच्या मुलाला ते अजून पेटीतलं नि परस्वाधीन असल्याचंच समजतात. त्यानं त्या मुलाला एक प्रकारचं पांगुळपण आपण अकारण आणतो आहोत, हे लक्षात घेतलं तर बरं नाही का ?

मग अशी मुलं, तरुणपणीसुद्धा निर्णयासाठी आईवर अवलंबून राहातात. काय खावं इथंपासून काय शिकावं इथंपर्यंत कुठलेच निर्णय त्यांना घेता येत नाहीत. यात खरं तर मुलाचं आपण हित करीत नाही, तर त्याचं भरून न येणारं नुकसान करतो आहोत. शिवाय ते अनैसर्गिकही आहे हे या 'मायेच्या भ्रमात' विसरायला होतं. मग अनेकदा बाहेरच्या परिस्थितीचे चटके, अनपेक्षित धक्के, अपयशं, मनाविरुद्ध माणसं, हवामानं, वातावरणं - अनेकांना सहन करता येत नाहीत. शेवटी अशी आई कितीही खंबीर असली तरी ती किती काळ पुरणार असते ? पुढं उघड्या जगात कधी तरी माणूस फेकला जातोच. मागचे दोर तुटतात. किनारे सुटतात. नावा नदीत लोटून आयुष्याचे पुढचे प्रवास करावेच लागतात. त्यावेळी मग योग्य वाढ झाली तर टिकाव लागतो. त्यासाठी निर्णयशक्ती, परिस्थिती, माणूस हे सारं वाचता यावं लागतं. त्यावर आपला जास्तीत जास्त योग्य निर्णय आणि कृती यांचा ठामपणा शिकावा लागतो. तो असला तर यशस्वी होता येतं. याची काळजी आधी घेतली नसली तर मोठं मूलही चाचपडत राहातं.

अनेकदा असंही घडतं की, हे पूर्वीपासून स्वतंत्र नि समर्थ होण्याचं शिकवलं नसलं तर हे पेटीतलं बाळ कधी आईच्या तोंडाकडं निर्णयासाठी पाहातं, मग कधी मोठं झाल्यावर पत्नीच्या, कधी मित्राच्या, कधी बॉसच्या,

कधी कुण्या फसव्या सहकाऱ्याच्यासुद्धा. असं कुणी प्रत्येक प्रसंगात असतंच असं नाही. कुणी नसलं की, मग परिस्थितीला तोंड देण्यात ते मूल कच खातं, आजारी पडतं, अपयश आलं तर कुणावर तरी ढकलतं, कधी चिडचीड करतं, कधी सरळ खोटं बोलून परिणामांतून स्वतःची सुटका करून घ्यायला बघतं. तोवर त्यांची पुढची पिढी पुढं आलेली असते, तिला कसं घडवावं हाही प्रसंग पुन्हा उभा राहातो. मूल कुठं काही कारणानं दुर्दैवानं कमी वाढीचं जन्मलं तर नाइलाज आहे, त्याला इन्क्युबेटर - पेटीच - काय आणखी ज्या ज्या आवश्यक गोष्टी, वाढ पूर्ण होण्यासाठी लागणाऱ्या असतील त्या मदती अवश्य आल्या, याबद्दल कुणाचं दुमत नाही. पण निसर्गसुद्धा जिथं त्याला मदत करून स्वावलंबी करू पाहातो, तिथं पालकांनी निदान त्याला पूरक संस्कारांचं काम करून व्यक्तीला मनानं, बुद्धीनंही स्वावलंबी करणं हे गरजेचं आणि नैसर्गिक नाही का ?

पण अनेकांना, विशेषतः अशा आईसारख्या, वडिलांसारख्या, पत्नीसारख्या जवळच्या कुणाला आपण त्या बाळाला, पुढं तरुणाला निर्णयाला मदत करण्याच्या, त्याची काळजी घेण्याच्या नादात त्याच्या एका क्षमतेपासून, सामर्थ्यापासून वंचित करतो आहोत याची बहुधा जाणीवच राहात नसावी. उलट त्या क्षणी आपण त्याचं भलं करतो आहोत, त्याचं नुकसान होऊ नये याची काळजी घेतो आहोत - अशाच भावनेत ते वावरत असतात. पण त्यात एक संभाव्य स्वावलंबी आयुष्य डळमळीत होऊन जातं, एवढं ध्यानी घेतलं तर बरं नाही का ?

पण असं वर्षानुवर्षं घडतं, एवढं खरं. त्यांतही अलीकडं जास्तच, कारण मुलंही एखादीच. त्यामुळं कौतुकाची. साहजिकच जगाच्या नदीत पोहायला ढकलून द्यायचं धाडस पटकन होत नाही. कळूनसुद्धा अनेक जण वर्षानुवर्षं त्यांचा पोहायला शिकण्यासाठी लावलेला डबासुद्धा ती मोठी

झाली तरी काढायचं धाडस करीत नाहीत. त्यात आता अनेक स्त्रिया कर्तृत्ववान. स्वतःच्या पायावर आर्थिकदृष्ट्यासुद्धा उभ्या. ही चांगलीच गोष्ट आहे. बदलता काळ व कर्तृत्वाच्या समान संधी या दृष्टींनी ते योग्य आहे. त्यातली सावध राहण्याची गोष्ट पुढंच आहे. ती गोष्ट तशी स्त्री-पुरुष म्हणून कुणालाही समानच आहे.

प्रश्न अतिकाळजीच्या स्वभावाचा आणि बेसावधतेचा आहे. अडचण निर्माण होते ती कर्तृत्वाच्या नकळत निर्माण होणाऱ्या अभिमानामुळं. त्यात सुबत्तेमुळं भर पडते. ती अनेकदा मुलांच्या शारीरिक प्रकृती कमकुवत करणारीही ठरते. त्यात प्रत्येक गोष्टीत लक्ष घालण्याच्या मोठ्यांच्या सवयींमुळं अकारण काळज्या लागतात. अवाजवी आर्थिक अनुकूलतेमुळं बेसावधतेत काही वेळा भर पडते. मुलांना थोडं गरजेचं असलेलं अभावांचं, कष्टांचं वातावरण दिलं जात नाही. कुठला त्रास पडू दिला जात नाही. निर्णय स्वतःकडं ठेवणारं आणि त्यामुळं मुलांना परावलंबी बनवणारं असं एक वातावरण त्यामुळं तयार होतं. ते मुलांच्या मानसिक प्रकृती कमकुवत करतं. यानं होणारं नुकसान पाहायला कदाचित हे पालकसुद्धा असणार नाहीत. परिणाम त्या व्यक्ती भोगतील, पत्नीसारखी त्यांच्या जवळची, ऑफीसमधली, व्यवसायातली - माणसं आणि कदाचित पुढली पिढीसुद्धा.

अगदी अलीकडची गोष्ट. हैद्राबादला जाणारी लक्झरी सुटण्याची वेळ. आय्आय्टीतून उच्च शिक्षित झालेला नोकरदार तरुण गाडीत खिडकीजवळ बसलेला. बाहेर पोचवायला आलेली आई खाणाखुणा करून लक्ष वेधून घेत होती. अखेर त्याचं लक्ष गेलं. जाताच तिनं खुणेनं काचेची खिडकी उघडायला सांगितली. इकडं वडील माझ्याशी जुनी ओळख निघून बोलत होते. आईचा चेहरा मात्र काळजीचा. सुनेला नि नातवाला तिन्हीसांजेचं बाहेरचं वारं सोसणार नाही म्हणून आईनं स्टॅण्डवर आणायला नको म्हटलं

होतं. त्यामुळं त्या तरुणाची पत्नी नि मुलगा घरात. आई काळजीभरल्या चेहऱ्यानं नि डोळ्यांत अश्रू घेऊन स्टॅण्डवर. वडील आपले तटस्थपणे पाहात होते, आयुष्यभर पाहात असतील तसेच, बहुधा.

मुलगा आठवड्याच्या प्रशिक्षणासाठी चालला होता. आईनं मुलाला खिडकी उघडल्यावर सांगितलं, 'रात्रीची खिडकी उघडी ठेवू नको. फार गार वारं असतं. त्रास होईल. गाडी सुटताच खिडकी बंद कर. आणि बाळाची काळजी करू नको, मी आहे !'

तेवढ्यात शिट्टी वाजून लक्झरी सुटली. सुटतासुटता आईनं त्याला बजावलं, 'बॅगेतल्या डब्यातला लाडू खा. बाहेरचं खाऊ नको, पोट बिघडेल.' तिचं वाक्य संपायच्या आत गाडी सुटली होती. मी वळून पाहिलं. खिडकी बंद झाली होती. आईनं निःश्वास टाकला होता. आणखी एक पेटीतलं बाळ रवाना झालं होतं.

मला वाटलं, हा अनुभव, हे विचार, हे धोके, हे उपाय हे सारं निदान आपल्याला वाटतं म्हणून तरी लिहून ठेवलं पाहिजे. बरोबर असेल आणि कदाचित हे वाचनात आलं तर हे 'बाळ', निदान त्याचं पुढचं 'बाळ' तरी वाचेल अन् 'वाचवेलही !'

१५. निःशंकांचा पेच

आत्मविश्वास असणं म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा एक अत्यंत महत्त्वाचा गुण असणं आहे, हे सर्व जाणतात. अनेकदा शिकण्याच्या वयात आत्मविश्वासाचा संस्कारसुद्धा मुद्दाम घडवला जातो. आपल्या स्वतःच्या कुवती, ज्ञान-माहिती, परिस्थितीबद्दलच्या आडाख्यांची अचूकता - अशा गोष्टींतून या आत्मविश्वासाचं दर्शन घडू शकतं. आत्मविश्वास नसला तर अनेकदा त्या त्या कामांसाठी लागणारी किमान कुवत असूनसुद्धा अनेकांना ताणतणाव येतात, अपयशं येतात, निराशा येते. ती टाळायची असली तर आत्मविश्वासाच्या गुणाची मशागत वेळी आणि चांगली होणं कुणालाही, कुठल्याही वयात-क्षेत्रात गरजेचंच आहे.

मात्र आत्मविश्वास म्हणजे स्वतःच्या कुवतीवर किंवा ज्ञानावर-माहितीवर ठाम असणं आणि ते ठासून सांगणं असं मात्र नव्हे. पण अनेकदा जी असेल ती माहिती ठामपणानं सांगण्यालाच आत्मविश्वास समजलं जातं. अशा माणसांना ना वस्तुस्थितीची खात्री करावीशी वाटत, ना कुणाचं मत - सल्ला घ्यावासा वाटत, ना त्यांच्या मतांची नि माहितीची शंका येत.

एकदा एका उमेदवाराची मुलाखत चालली होती.

सहज सामान्य ज्ञान म्हणून पॅनेलनं विचारलं की, 'इंग्लंडची राजधानी कोणती ?'

त्यानं उत्तर दिलं 'लंडन.'

पुन्हा विचारण्यात आलं, 'तुम्हाला यु.के. हा देश माहीत आहे काय ?'

त्यानं सांगितलं, 'होय.'

त्यावर त्याला विचारलं गेलं, 'त्या देशाची राजधानी कोणती ?'

तो आत्मविश्वासानं उत्तरला, 'लंडन.'

त्यावर थोडं चकित होऊन पॅनेलनं विचारलं की, 'दोन्ही देशांची राजधानी एकच कशी काय ?'

त्यावर पूर्ण आत्मविश्वासानं त्यानं सांगितलं, 'त्या दोन्ही देशांत तसा सामंजस्य करार झालेला आहे !'

आता मात्र त्या पॅनेलला यात फारच गंमत वाटू लागली की काय, कोणास ठाऊक. असं ऐकतो की, पुढं त्यातल्या एकानं विचारलं , 'तुला ब्रिटन हा देश माहीत आहे का ?'

उमेदवार निःशंक होता, 'होय.' तो उत्तरला.

'त्या देशाची राजधानी कोणती ?

तितकंच निःशंक उत्तर 'लंडन.'

'ते कसं काय ?'

उमेदवार उत्तरला, 'ते ब्रिटननं मान्य केलं आहे.'

आता थोड्या सरावलेल्या पॅनेलनं विचारलं, 'काय सामंजस्यानं का ?'

'नाही. आंतरराष्ट्रीय दबावामुळं !'

आता मात्र पॅनेलला स्वतःच्याच सामान्य ज्ञानाविषयी शंका येऊ लागली. एक शेवटची खात्री करावी म्हणून त्यांनी विचारलं 'दबाव कुणाचा ?'

निःशंक उत्तर आलं, 'मध्यपूर्वेकडील देशांचा !'

पॅनेल पुढच्या मुलाखती घेऊ शकलं की नाही आणि या उमेदवाराची निवड झाली की नाही हे मात्र कळलं नाही.

आपण अनेकदा पाहिलं असेल की, असे लोक आपल्याला अनेक क्षेत्रांत अनेकदा भेटतात. ते त्यांच्या कल्पनांविषयी, माहितीविषयी चांगले

ठाम असतात. वस्तुस्थिती त्यापेक्षा खूप वेगळी असूनसुद्धा. या बाबतीत लोक फारसे सावध नसतात. खरं तर बरोबर आहे ते माहीत असणं आणि माहीत आहे ते बरोबर समजणं यांत किती फरक आहे. त्यासाठी आत्मविश्वासाला सतत शिकण्याची, नम्रतेची आणि एका चांगल्या संदेहाची गरज असते. आपल्याला माहीत जरूर असावं, जरूर ते सांगावं पण त्याच बरोबर त्या पलीकडचं काही खरं असेल, असू शकेल अशी भूमिका तर असावीच पण ते जे अधिक बरोबर आहे ते शिकून घेण्याची तयारी ठेवावी. तशी भूमिका तरी असावी. म्हणून खरी प्रगती व्हायची असेल तर आत्मविश्वास तर गरजेचाच आहे, पण असा थोडा सात्त्विक नम्रपणा नि संदेहसुद्धा त्याच्या जोडीला असला तर माणूस निदान खात्री तरी करीत राहील की त्याला वाटतं आहे ते बरोबर आहे की नाही किंवा त्या वस्तुस्थितीत काही फरक पडला आहे का किंवा आपला समजुतीचा काही घोटाळा तर कुठं नाही ना ?

त्या अर्थानं निःसंदेहता हाही एक पूरक गुण आहे. आपण पाहिलं असेल की, तरुणांना, मुलांना आत्मविश्वास म्हणजे हा ठामपणा काही वेळा इतका शिकवला जातो की, कुठलीही गोष्ट तुला माहीत आहे का, तर विचार करण्याआधीच त्याचं उत्तर 'हो' म्हणून टाकील. अमुक एक गोष्ट तुला जमेल का तर लगेच 'हो' म्हणून टाकील. आणि अर्थातच नंतर मात्र अडचणीत येईल. ते ठरलेलंच असतं. अशा वेळी या संदेहाच्या उपयोगाची बाजू लक्षात यायला लागते.

जसं गाणं चांगलं यायला हवं असलं तर आपलं गाणं किंवा आपला स्वर निदान चुकलेला तरी कळावा लागतो, तर तो सुधारून बरोबर करता येतो. त्याबद्दल स्वतःला एका चांगल्या अर्थानं 'संदेह' बाळगावा लागतो. शंका यावी लागते, तर तो बरोबर लागला आहे की नाही हे कळतं. वाटल्यास

जाणकार गायकाची - श्रोत्यांची किंवा वेळी पेटीसारख्या साधनाची मदत घ्यावी लागते. खरे गायक, वादक ती नेहमी घेत असतात, हे कळलं तर आश्चर्य वाटेल, त्यातून शिकावं असंही वाटेल.

पूज्य विनोबांसारखे प्रकांड पंडित, अलौकिक प्रज्ञापुरुषसुद्धा गीतेचं मराठी रूपांतर करीत होते त्यावेळची गोष्ट आहे. त्यावेळी त्यांना मूळ गीतेच्या अर्थाबद्दल काही आत्मविश्वास नसेल का ? तर तो जरूरच होता आणि असण्याएवढी विद्वत्ता व भावही त्यांच्याजवळ होता. पण गीताईची पहिली रचना केल्यानंतर, विनोबा ते रूपांतर बरोबर आहे अशा 'आत्मविश्वासा'त राहिले नाहीत. गीताईच्या प्रत्येक श्लोकाच्या प्रत्येक शब्दाच्या योग्यायोग्यतेबद्दल 'संदेह' व्यक्त करीत राहिले, सूचना, दुरुस्त्या स्वीकारीत राहिले, ते काम तडीला लावीपर्यंत. मूळ लेखनानंतर हे काम सुमारे दोन वर्षं सुरू होतं आणि त्यात अर्थाची अधिक अचूकता आणण्यासाठी विनोबांनी एकूण नऊशे दुरुस्त्या केल्या, हे लक्षात घेण्यासारखं आहे. पण विद्वत्ता, आत्मविश्वास यांच्या जोडीला ऋषितुल्य नम्रता आणि संदेह, हे त्यांनी बाळगले म्हणूनच मराठीत दोनशे बावीस पेक्षा जास्त आवृत्त्या आणि बत्तीस लाखांपेक्षाही जास्त प्रती निघालेली 'गीताई'सारखी एक अद्वितीय कृती ते घडवू शकले.

इथं मात्र गाण्यात काय, काव्यात काय, प्रवचनात काय जिकडंतिकडं आत्मविश्वासाचा उत्साह ओसंडून वाहताना दिसेल. कुणीही म्हणायचा अवकाश, उत्साही गायक गायला तयार, कवी रचना करायला नि वाचायला तयार किंवा प्रवचनेच्छु प्रवचनाला तयार ! आपल्याला ते येतं आहे याविषयी ते इतके निःशंक असतात की, 'म्हणा' म्हणणाऱ्याला काळजी वाटावी. अनेकदा वाटतेही. कारण शेवटी ते हे ठरवणाऱ्यावर येतंच. लोक त्यालाच 'जाण' नाही,'अंदाज' नाही,'ज्ञान' नाही अशी 'संभावना' बरोबर करतात!

पण म्हणणारे-कवी-प्रवचनकार असे लोक मात्र निःशंक असतात.

विशेष म्हणजे त्यांना अनेकदा स्वरांतलं कमी-जास्त कळत नसतं, चांगल्या श्रवणाचा अभाव असतो. उत्साही कवींना शब्दसंपत्ती कमी पडते याची जाणीव नसते. एकतर आपलं काव्य गेय असावं, नाही तर काव्यमय गद्य वाटू नये एवढे तरी प्रास-अनुप्रास साधणं तरी जमलं पाहिजे हे लक्षात येत नाही. उत्कृष्ट-निकृष्ट काव्यातला फरक कळत नसतो. मुक्तछंद म्हणून असलं, तरी ते काव्य असतं व त्यात छंद असतो याची कल्पना नसते. या सगळ्या काव्यप्रकारांतलं भरपूर वाचन नसतं. प्रवचनकाराजवळ स्वतःचा अनुभव, स्वतःचं चिंतन यांचा जो पाया लागतो त्याची जाण नसते, उत्तम वाचन - श्रवण यांचा अभाव असतो. हे अनेक क्षेत्रांत असतं. विशेष म्हणजे याची त्यांना सुतराम कल्पनाही नसते. ते सांगतात, करतात, लिहितात ते बरोबर आहे याची त्यांना इतकी निःशंक खात्री असते की, त्यांना सांगायला जाणाऱ्यालाच आपलं काही चुकलं तर नाही ना असं वाटावं. अशा निःशंकपणे त्यांचं कार्य सुरू असतं.

हे नुसतं एवढ्यासाठीच सांगायचं नाही तर मुलं आपापली शिक्षणाची क्षेत्रं निवडतात त्यावेळीसुद्धा हा संदेहगुण त्यांच्याजवळ नसतोच. आईला किंवा वडिलांना आपला मुलगा हुशार वाटणं एकवेळ समजू शकतो, वास्तविक तेही खरं नाही पण आता ते दुरुस्त होणं कठीण म्हणून समजून सोडून देऊ. पण मुलालासुद्धा मेडिकलपासून इंजिनिअरिंग-आय्.ए.एस्. पर्यंत सारं काही आपल्याला जमू शकेल असं वाटतं. त्या पोटी ते इतरांच्या बरोबरीनं त्यात भरीला पडून अकारण गुंता ओढवून घेतात. कुवतीच्या रास्त अंदाजानं पाण्यात उडी घेणाऱ्याचं ठीक असतं, तो स्वतःही बुडत नाही आणि दुसऱ्यालाही अडचणीत आणीत नाही. पण नुसत्याच निःशंकाचं काम मात्र अडचणीचं असतं.

ते काम दोन बाजूंनी अडचणींचं असतं. एक आत्ता म्हटलं तसं कुवत नसली आणि निःशंक असले तर स्वतःच काम ओढवून घेतात. कुणी सांगितलं तरी अर्थातच होकार भरतात. पुढं ते काम लटकून अडचण येते म्हणून प्रश्न असतो. दुसऱ्या बाजूला जर असा बिनकुवतीचा किंवा कुवतीचा योग्य अंदाज नसलेला कुणी भेटला नि आपल्याला कळलं नाही तर त्याच्या त्या 'निःशंक होकारा'नं आपण काम सोपवतो नि पुढं ते काम त्याला न निभल्यानं किंवा अपेक्षितपणे न झाल्यानं आपणही अडचणीत येतो. वेळी वेळ-पैसा-प्रतिष्ठा अनेक प्रकारची नुकसानंही वाट्याला येतात.

यात पुन्हा निःशंकतेचा पेच थोडा अधिक अडचणीचा आहे. त्याचं कारण असं की, भयाला एकदम निर्भयता असा चटकन सुचणारा विरोधी पर्याय असू शकतो. तसा निःशंकतेतल्या अडचणी लक्षात आल्या तर साशंकता असा विरोधी पर्यायही चटकन सुचवण्यासारखा किंवा हिताचा ठरत नाही. बिनधास्त निःशंकतेनं घोटाळा होतो तर साशंकतेची सवय तोच घोटाळा आणखी वाढवू शकते. त्याला प्रत्येक गोष्टीची शंका यायला लागली तरीही व्यवहार अवघड होऊन बसतो. पूर्वी शेरलॉक होम्सच्या कथा जर सतत वाचत राहिलं तर आपल्या जेवणाच्या टेबलावर बसण्यापासून दारावरच्या बेलपर्यंत सर्वत्र - शंका वाटायला लागते. काही गुन्हा पुढं घडला तर आपण ती ती घटना घडण्याची वेळ, आजूबाजूचे तपशील सारं लक्षात ठेवलं पाहिजे असं उगाचच वाटू लागतं. मग प्रत्येक गोष्टीत शंकाच शंका यायला लागतात, तसं होतं.

एका गृहस्थांनी गुन्हेगारीक्षेत्र, पोलिसतपास, रहस्यकथा अशी पुस्तकं आवडीनं इतकी वाचली की, विचारता सोय नाही. एकदा त्यांना बोहारणीला स्वतःचे जुने शर्ट वगैरे द्यायचे होते. पत्नीनं नेहमीप्रमाणं जरा जुने-मध्यम कपडे एकत्र करून द्यायचा ढीग केला. तेव्हा त्यांनी तो ढीग

बाहेर नेण्यापूर्वी थांबायला सांगितलं. एक कात्री घेऊन त्या शर्टपॅन्टवरची शिलाईच्या दुकानाची मार्किंग ते कापून काढू लागले. पत्नीला अर्थात कळेना. ते म्हणाले, 'हा शर्ट पुढं कुठं जाणार ते आपल्याला माहीत नाही. समजा एखाद्या गुन्हेगाराच्या हातात तो पडला, त्यानं तो गुन्हा करताना वापरला. कुठं त्याचा खून झाला. तर या शर्टच्या कॉलरवरच्या या शिलाईदुकानच्या मार्कवरून पोलीस संशयावरून आपल्यापर्यंत येऊन पोचतील ! निर्दोष असलं तरी सिद्ध करायला आपल्याला खर्च येईल की नाही ? त्यापेक्षा हे मार्क्स काढून टाकतो.'

पत्नीला या हुशारीचं कौतुक वाटलं.

पण थोड्या वेळानं ती जरा विचार करून म्हणाली, 'असं काऽही होणार नाही. खूनबिन सोडा, ते तुमच्या पुस्तकामुळं तुमच्या डोक्यात आलंय. पण साधी कुठं पाकीटमारी जरी झाली आणि पोलीस जरी माग काढीत आपल्या घरी आले तरी तुम्हाला ते काही करणार नाहीत.'

त्यांनी पत्नीला विचारलं, 'कशावरून?'

'तुम्हाला पाहिल्यावरच त्यांच्या लक्षात येईल. त्यांना चांगली पारख असते. हे गृहस्थ पाकीट मारू शकणार नाहीत फार तर यांचं पाकीट जाऊ शकेल !' पत्नीच्या म्हणण्यावर त्या गृहस्थांनी क्षणभर विचार केला. पत्नीचं म्हणणं अनेकदा बरोबर ठरत असे. त्यामुळं त्या गृहस्थांनी आपलं ते काम थांबवलं.

यात संदेह तर गृहस्थांनाही आहे. नुसता तर्क किंवा कल्पना म्हणून तो लढवता येतो, बरोबर आहे असं वाटतं. पण त्याला मोल नाही. तेव्हा असल्या शंका परिस्थितीशी ताडून पाहिल्या की निकालात निघतात आणि शंकेचा एक पेच सुटतो. तर पत्नीच्या बाजूनं विचार केला की, निःशंकतेचा दुसऱ्या बाजूचा पेचही सुटतो. पत्नी नुसतीच निःशंक नाही. पतीच्या

म्हणण्यावर तिनं आवश्यक विचार केला आहे. सर्व बाजूंनी केला आहे. हे गृहस्थ म्हणतात ते घडू शकतं अशी शंका तिनं विचारात घेऊन पाहिली. ती परिस्थितीशी ताडून पाहिली. ती खरी ठरण्याची शक्यता तिला नीट रास्तपणे जोखता आली. मग ती निःशंक झाली. तिनं निःशंकपणे या गृहस्थांनी हे काम करायला हरकत नाही पण त्याची जरूर नाही हे सांगितलं. ते वास्तववादी होतं.

म्हणून संदेह, शंकाही हवी आहे नि निःशंकताही हवी आहे. फक्त दोन्हींतल्या सीमारेषा पुसट आहेत, हा त्यांतला पेच आहे. या दोन्हींचा सुवर्णमध्य काढण्याची कला आपल्याला गरजेची आहे. पण त्यांचा सुवर्णमध्य गाठायचा मार्ग मात्र, 'हा पेच समजून घेऊन, योग्य कृतींचं संतुलन साधण्यातून जातो', हे लक्षात घेणं गरजेचं आहे ! मग कामाचं क्षेत्र कुठलंही असो !

१६. देवाची मुलगी

एका आश्रमात जायचा योग आला. आश्रम बहुद्देशी होता. सर्वसाधारणपणे गेल्यावर दरवाजापाशी कुणी गेटमन, वॉचमन असतात तसेच तिथंही होते. आल्याआल्या त्यांनी दार उघडलं. पण त्यांची शरीरयष्टी आणि मुळातच सहजपणे जाणवणारा रुबाबदारपणा लक्षणीय होता. त्यामुळं त्यांचं वय साठीच्या पुढं आहे हे कळत असलं तरी कार्यक्षमतेनं वयावर कधीच मात केलेली स्पष्ट दिसत होती. त्यांनी आदबीनं स्वागतकक्षाकडं नेलं. गेट पुन्हा बंद झालं. कक्षातल्या माणसासमोर टेबल होतं. समोरच्या खुर्चीवर बसण्याची त्यांनी खूण केली. त्यांच्या हातातलं काम संपल्यावर त्यांनी नित्याची चौकशी केली. उत्साहानं सर्व माहिती दिली. संबंधित माहीतगार माणूस बोलवला. त्याच्या बरोबर सर्व परिसर आणि लागणारी माहिती मिळेल अशी व्यवस्था करून दिली.

आतला सारा परिसर काही एकरांचा होता. तसा पायी सर्व फिरणंही कठीण होतं. पण एकच गोष्ट सर्वत्र चाललेली होती, ती म्हणजे काम. वाटेत अशा कितीतरी मोठमोठ्या वृक्षांच्या रांगा होत्या. कुठं पार बांधलेले वृक्ष होते. त्याखाली कुणी बसलेलंही दिसत होतं. पण जाताना तिथं शांत बसलेला माणूस परत येताना दिसत नव्हता. कुठं जागा रिकामी. कुठं दुसरं कुणी येऊन वाचत बसलेलं, शांत ध्यान करीत बसलेलं, कुणी भजन म्हणणारंही होतं. पण समोर ऐकायला थांबलेलं कुणीच नाही. इतर कुठं माणसं दिसत ती कामातच. कामं पहावी तर ती खणण्यापासून, वैद्यकीय सल्ला-औषधं देण्यापर्यंत सर्व. पण दोनच गोष्टी कुठं दिसल्या नाहीत. एक पैशानं काही दिलं-घेतलं जात नव्हतं आणि कष्टाशिवाय माणूस दिसत नव्हता.

शेवटी जरा मंदिरासारखी काही इमारत वाटली. म्हणून उत्सुकतेनं प्रवेश केला. आत नांगरधारी देवाची मूर्ती. वर तीनच शब्द. श्रम-ज्ञान-प्रेम. मनःपूर्वक स्वागताचा अगत्याचा बोर्ड. कुठं पैसा ठेवायची सोयसुविधा नाही. एक विनंतीचा बोर्ड - आलाच आहात तर काही श्रम करून जा, पुस्तकालय-निरीक्षण कुठूनही काही ज्ञान घ्या, त्याची ज्ञाननोंदीत नोंद करा. नोंदीची दुसरी प्रत करा - जाताना गेटवर दाखवण्यासाठी व पुढं बरोबर नेण्यासाठी. तिसरं प्रेम. त्यासाठी रानातला चारा स्वतः कापून आणून गोठ्यातल्या जनावरांना घालून जाण्यापासून असंख्य पर्याय दिलेले होते. पण सारं प्रेम श्रमाधारित, सक्रिय, शिकवून जाणारं. शेवटी लिहिलं होतं 'श्रमदेवा'चं दर्शन तर घेतलंच आहात, जमल्यास यांतली एखादी तरी 'पूजा' करून जा.

मला तिथल्या प्रसन्न शांततेचा भंग करूनही विचारावंसं वाटलं की, इथं फक्त शंभर लोकांची सोय आहे, असं कळतं, त्यांचं चालतं कसं, या गाईगुरांपासून सोलरपर्यंत असंख्य यंत्रणाही कशा चालतात ? तो थोडक्यात उत्तरला, 'इथं नव्वद टक्के स्वावलंबन आहे. याचं नावच 'श्रमआश्रम' आहे. आठ तास श्रम, तीन तास हरिनाम वा भजन-वाचन, एक तास छंद. एवढं प्रत्येकजण करतो. कामं निवडून घेतलेली आहेत. इथं जे निर्माण होऊ शकतं, पिकतं, शिजतं त्यावरच राहाण्याची प्रत्येकाची मानसिक तयारी आहे. किमान आठतास कुठल्यातरी प्रकारे आश्रमासाठी राबल्यानं कुणालाच अपराधी वाटत नाही. आर्थिक मूल्यही मिळत नाही. मिळतं ते श्रमशिक्षण आणि श्रमांची प्रतिष्ठा शिकणं.'

मी विचारलं, 'तुम्ही इथं किती वर्षं आहात ?'

'वर्षं ? वर्षं कुठलं इथं जास्तीत जास्त एक महिनाच राहाता येतं. येऊन पंधरा दिवस झाले. अजून पंधरा दिवसांनी मी इथून जाईन. मी बाहेर

कारखान्यात कामाला आहे. माझी एक महिना रजा मी 'श्रमदेवा'साठी दिली. तीही नंबर लागला तर.'

'म्हणजे ?' मी न समजून विचारलं.

'या श्रमजीवनासाठी येऊ इच्छिणाऱ्यांचीही प्रतीक्षायादी आहे. आपल्याला येऊ शकत असलेल्या कामांची आणि इथं गरज असलेल्या कामांचीही. ती सांगड पडली तर बोलावणं येतं. आपल्याला जमत नसलं तर ते आमंत्रण दुसऱ्याला जातं. पुन्हा आमंत्रणाची प्रतीक्षा करायची.'

'ही व्यवस्था कोण ठरवतं ?'

'ते स्वागतकक्ष ठरवतो. स्वागतकक्षातल्या व्यक्तीच फक्त जास्तीत जास्त तीन महिने इथं असतात. तीन महिन्यांनी त्यांनाही जावं लागतं. त्यामुळं कुणाचेच कुठलेच व्हेस्टेड इंटरेस्ट्स् - गुंतलेले संबंध नाहीत. श्रमांचं नि साधेपणाचं मूल्य एका महिन्यात कळून जातं. हा वेषसुद्धा इथं विणलेला, शिवलेला आहे. एक तर बाहेरच्या सुखसोयींची, भूलभुल्लैय्याची किंमत कळते, नाही तर त्यांची गरज उरत नाही. खऱ्या समाधानाचा मार्ग सापडतो. एक नक्की इथं कुणीच कायमचं नाही आणि अनुत्पादकही नाही आणि श्रेष्ठकनिष्ठही नाही !'

मी विचारमग्न होऊन त्यांची परवानगी घेऊन खुरप्यानं थोडा ओला चारा कापून आणून जनावरांना घातला. त्यांच्या डोळ्यांतल्या कृतज्ञतेचं मूल्य पैशापेक्षा किती विशाल होतं याची एका क्षणात कल्पना येत होती. मी आज आलो नसतो तरी दुसऱ्या कुणी तो चारा घातला असताच ही जाणीवसुद्धा मन जमिनीवर ठेवणारी होती. नजरेसमोर बाहेर चौकाचौकातली अन्न-वस्त्रं-वस्तू यांची चंगळवादी उधळपट्टी नि बेकारांना काम नाकारणाऱ्या व्यवस्था, इकडं पंचतारांकित हॉटेल्सचा गावोगावीचा झगमगाट, गावातल्या स्टॅण्डपर्यंतच नव्हे तर चौकातसुद्धा वाहनाशिवाय न जाणाऱ्या पिढ्या -

तरळून जात होत्या.

अगणित ऑफिसमधले कामं सोडून अकारण इतरत्र फिरणारे लोक, कामांची टाळाटाळ, पगार असलेल्या कामांसाठी शे-शंभर रुपयांपासून कोट्यवधी रुपयांपर्यंत जादा पैशाची अपेक्षा करणारी वाईट संस्कृती, आपापल्या कामाच्या टेबलवर कामाच्या वेळेतसुद्धा न भेटणारे, भेटलेच तर कामात मदतीऐवजी दिरंगाई-कागदपत्रांची नुसतीच फिरवाफिरव चालू ठेवणारे लोक, कमीत कमी कष्टांत जास्तीत जास्त नफा मिळवण्याचे मार्ग शोधणारे आणि त्यांच्यामागं असलेले असंख्य लोक - अनंत गोष्टी आपल्यालाही आठवतील. हे विचार करीत आश्रमातून बाहेर पडताना त्या वातावरणाशी परिचय झाल्यानं स्वागतकक्षात निरोप घेताना त्या पहिल्या गृहस्थांच्या पाया पडून, दोन शब्द बोलून जावं म्हणून मी त्यांच्या टेबलाशी वाकलो. ते खुर्चीत बसून आपले श्रम करीत होते पण पाया पडायला वाकल्यावर लक्षात आलं त्यांना दोन्ही पाय नव्हते. कुठल्याही परिस्थितीत श्रम नि कर्तव्य करता येतं हा धडा इतका तीव्रपणे कुठं मिळाला नव्हता ! हात जोडून त्यांनी आणि मी एकमेकांचा निरोप घेतला.

बाकी जगाचं राहू दे. पण अशा 'श्रमआश्रमां'ची गरज ही नोकरवर्ग तयार करणाऱ्या, पारतंत्रातल्या सुरू झालेल्या आणि स्वातंत्र्य मिळालं तरी सुरू राहिलेल्या तथाकथित शाळांपेक्षा किती मोठी आहे याची जाणीव होते. शिकणाऱ्या मुलांच्या मानसिकतेवर हे लगेच कळतं. एक त्याला पुढं काय करायचं आहे आणि तेच खरं का करायचं आहे ? - या दोन प्रश्नांच्या खऱ्या उत्तरांत आपली परिस्थिती कळून जाते. डॉक्टर, वकील, व्यावसायिक, सनदी अधिकारी, इंजिनिअर - काहीही नावानं असो त्याला 'मोठ्ठा नोकर' व्हायचं आहे आणि तेही केवळ त्यांतल्या त्यांत जास्त 'पैसा नि प्रतिष्ठा' मिळेल या सुप्त किंवा उघड हेतूनं व्हायचं आहे. म्हणजेच हीच गुलामगिरी

पुढं चालवायची आहे. त्यातल्या कुणालाच 'श्रमिक व्हायचं नाही, शेतकरी व्हायचं नाही, मजूर व्हायचं नाही' कारणं उघड आहेत. इतकं श्रमाचं मूल्य कमी आहे. असमान तर प्रचंड आहे. काम बुद्धिनिष्ठ, कौशल्यनिष्ठ झालं की मूल्य वाढतं, नि शरीरनिष्ठ, शरीरश्रमाचं झालं की मूल्य विलक्षण घसरतं. प्रतिष्ठा कमी होते. या समीकरणानं आपलं सामाजिक नुकसान किती केलं आहे, जसं जातिव्यवस्थेनं एके काळी केलं - याची कल्पना विचारी लोक जरूर करू शकतील. पण त्यासाठी अशा श्रमआश्रमांची नि त्यातून तयार होणाऱ्या घटकांची, त्यांनी नंतर केलेल्या अंमलबजावणीची गरज केवढी आहे ?

आहे त्या ठिकाणी जरी आपले श्रम आपण प्रामाणिकपणे करू शकलो आणि अनुत्पादक राहिलो नाही तरी खूप झालं. आपण पत्करलेलं काम 'भले ते वैद्याचं असो वा मजुराचं - ते जरी प्रामाणिकपणे करू शकलो तरी तीही ईशसेवाच आहे.' मनातलं त्या आश्रमातल्या माणसाचं वाक्य जात नव्हतं, 'इथं कुणी अनुत्पादक नाही म्हणजे साध्या भाषेत फुकट नि विनाकष्ट खाणारा नाही आणि कुणी श्रेष्ठ-कनिष्ठही नाही !' इथं तर साधे डॉक्टरसुद्धा आपल्या कंपाउंडरला कनिष्ठ समजतात. एक गाणं कुणी शिकायला आला तर शिकवणारा स्वतः गुरू बनून जातो नि शिष्याला कनिष्ठ समजतो. वास्तविक एवढ्यापुरता तो शिष्य व्हायला तयार झाला म्हणून खरं हा गुरू झाला - इतका सरळ विचारही सुचत नाही !

मला गेल्या शतकातल्या एका सत्पुरुषांची आठवण झाली. कोणताही 'सत्पुरुषपणा' न करणारे प्रिं. भैय्याजी कायंदे हे एक प्रयोगशील सत्पुरुष होते. उत्तरायुष्यातही सदैव कार्यमग्न, कर्तव्यनिष्ठ, विनाअवडंबर, साधं जीवन जगत. त्यांच्याकडं श्री. परांजपेसाहेब नावाचे एक जिज्ञासू साधक येत असत.त्यांनी पुढं भैय्याजींचं चरित्र लिहिलं. ते एकदा सकाळी भैय्याजींकडं

आले आणि काही शंका - प्रश्न सुरू झाले. तर थोड्या वेळानं भैय्याजींनी त्यांना स्मरण दिलं की, तुमची जर कामावर जायची वेळ झाली असली तर तुम्ही जा. कारण आपल्या कर्तव्याच्या ठिकाणी वेळेवर हजर असणं आणि ते मनापासून करणं ही देवाची सेवा आहे. हे समजावताना ते म्हणाले की, एक लक्षात घ्या 'कर्तव्य ही परमेश्वराची मुलगी आहे. तिची काळजी घ्या. आपल्या कर्तव्यात कसूर करणं, अप्रामाणिकपणा करणं म्हणजेच देवाच्या मुलीची हेळसांड करणं आहे. कोणत्या पित्याला ते आवडेल ?'

हे मनोमन पटतं ते बाहेरची आपली परिस्थिती पाहिली की ! ज्या त्या ठिकाणी जो तो आपलं कर्तव्य काळजीपूर्वक नि प्रामाणिकपणे करील, तर जगण्याचा स्वर्ग आणखी कुठला ? त्याला काही मोठं कुणी अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर, व्यावसायिक, तज्ज्ञ, ज्ञानी व्हावं लागत नाही. कारण देवाच्या दरबारी ही श्रेष्ठ-कनिष्ठता मुळीच नाही. आपली कर्तव्याची मुलगी योग्य स्थळी, योग्य पद्धतीनं सांभाळली जाते आहे ना हेच फक्त पाहिलं जातं ! आता तर यात स्त्री-पुरुष भेदही नाही. कर्तव्य मुलगी म्हणा नाही तर देवाचा मुलगा ! काळजी घेतली जाते ना आणि कर्तव्य प्रामाणिकपणानं होतं आहे ना हेच देव पाहातो आहे. मग ते कसं साधावं हे त्या श्रमआश्रमांसारख्या ठिकाणाहून शिकावं, घरात तसं वातावरण ठेवून शिकावं नाही तर समाजात तसं वातावरण रुजवून शिकावं.

पण कर्तव्य हे देवाचं मूल, सुस्थळी पडल्याचं समाधान देवाला आपल्याकडून कितपत होत असेल, असं आपल्याला वाटतं ?

१७. सत्प्रवृत्तींची वाटचाल

अपघात ही गोष्ट दुर्दैवी आणि गंभीर असली तरी ती आता इतकी अपूर्वाईची राहिली नाही. वर्तमानपत्रात एक सदर ठेवलं तर रोज त्यात बातमी येईल एवढे अपघात नुसत्या हायवे-एक्सप्रेसवेवरच नव्हे तर गावोगावी होत असतात. अलीकडं वर्तमानपत्रांच्या विभागवार, हळूहळू जिल्हावार आवृत्त्या निघतात. कालमानानुसार त्यांची गरज आहेच. त्याही आपल्या पाहाण्यात आल्या असतील. दुर्दैव हे आहे की, एकाच दिवशीची एकाच वृत्तपत्राची एखाद्या जिल्ह्याची आवृत्ती आणि दुसऱ्या कुठल्या तरी जिल्ह्याची आवृत्ती जर पाहाण्यात आली तर दोन्हींतही आढळणाऱ्या दोन प्रकारच्या तरी बातम्या हमखास सारख्या असतात. त्या बातम्यांशिवाय वृत्तपत्रांचा एखादा दिवस तरी जात असेल की नाही याची शंकाच आहे. या बातम्या पहिल्या पानावर हटकून असतात, नसतील तर आतल्या पानावर तरी दिसल्याशिवाय राहात नाहीत. त्यातली एक म्हणजे अपघात. दुसरे अर्थातच कुठले तरी आर्थिक घोटाळे अन् भ्रष्टाचार. ते तर एखाद्या गावकार्यालयापासून ते दिल्लीदरबारपर्यंत कुठंही आता घडतात.

बरं याला ना व्यक्तींचा अपवाद ना वस्तूंचा. व्यक्ती सामान्य कारकून, नोकरदारापासून उच्चपदस्थांपर्यंत किंवा श्रेष्ठ वलयांकित, पंचतारांकित बुवा-कुठले अध्यक्ष-कुणी नामांकित कंपनीचे मालक - यांच्यापर्यंत कोणीही असतात. आर्थिक घोटाळ्याच्या वस्तूंत तर गाईगुरांचा चारा-पशुखाद्यं-खतं इथंपासून तोफा-बंदुकाच नव्हे तर अण्वस्त्रांपर्यंत कुठल्याही वस्तूंचा आर्थिक घोटाळा असू शकतो, हे आता आपण रोज पाहून-वाचूनसुद्धा कंटाळलेले आहोत. आश्चर्य आहे त्याचं काही प्रमाणही

आता तसं मर्यादित नाही. साधं पोस्टातलं एक रुपयाचं तिकीट किंवा सरकारी कार्यालयात एक रुपयाचा फॉर्म बाहेर दोन रुपयाला मिळण्यापासून आता तर मोठ्या व्यवहारात कोटी नि अब्ज रुपयांचेच आकडे वाचायला मिळतात. वाईट हे की, या साऱ्या काळवंडलेल्या पैशाची नि त्यामुळं पसरणाऱ्या चैनचंगळवादाची भरपाई या ना त्या रूपानं हातातोंडाची गाठ घालणाऱ्या सामान्यांच्या खिशांतून होते, मध्यमवर्गाच्या विविध करांतून होते.

कृष्णजींनी या पैशाच्या भ्रष्टाचाराला रोग म्हटलेलं आहे. ते त्याला कर्करोग म्हणत. त्या काळी त्यांना जाणवणाऱ्या पैशाच्या काळ्या बाजाराबद्दल त्यांनी कॅन्सरसारखा तो शरीरभर पसरला आहे, हा सावधगिरीचा दिलेला इशारा पुढच्या पुढच्या काळानं किती खरा ठरला आहे, हे दाहक सत्य आपण रोज वाचतो, पाहातो, अनुभवतो आहोतच. त्यात अधिक धोका हा की, काम आणि कामाचं मूल्य यांतला प्रामाणिकपणा हा मोलाचा गुण मुळात दुर्मीळही होत चालला, उलट त्याची गणना आता बावळटपणात व्हायला लागली आणि दुधात पाणी घालण्याऐवजी पाण्यात दूध घालण्याचा आणि ते दुधाच्या दरानं विकण्याचा काळ प्रत्येक क्षेत्रात आला आहे, हे दुर्दैव आहे.

त्याच बरोबर वर्तमानपत्रातला आपला रोजचा साथीदार अपघात. त्या त्या घटनेप्रमाणं कुणी गंभीर, अत्यवस्थ, जागीच ठार, पाय गमावला, हात गमावला - अशा बातम्या वाचून क्षणभर हळहळ वाटते, माणूस थोडा वेळ चर्चा करतो. सोडून देतो. पुढं दिवसाची कामं असतात. उद्या उजाडताच पुन्हा नवा अपघात समोर असतोच. वाचायला भीषण असला तरी आपल्याशी कुठला ओळखीचा, नात्याचा संबंध नसला तर ही गोष्ट सहजपणे सोडून दिली जाते.

वास्तविक ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, केवळ तांत्रिक चूक किंवा आकस्मिकता यांनी घडणारे अपघात खरे किती प्रमाणात असतात? जास्तीत जास्त असतात ते साधारणपणे वाहतुकीचे नियम तोडणं, बेदरकारपणा, अतिवेग, वाहनावर लक्ष नसणं, घाई, अवेळी रात्री दोन ते चारच्या दरम्यानचं धोकादायक ड्रायव्हिंग - असल्याच अनेक कारणांनी घडणारे असतात. असं कुणी सुचवणंही पुन्हा त्यांना अप्रिय वाटतं.

एरवी चार-चार, सहा-सहा दिवस सुट्टी काढून सहलीला, लग्नकार्याला, यात्रांना , नाटकं-मैफिली यांना जाणारे येण्यासाठी परतीच्या प्रवासाला साधा एक दिवससुद्धा ठेवीत नाहीत. मग शेवटचं ठिकाण उरकून जेवण करून रात्री अकराला प्रवासाला सुरुवात करतात. पहाटे पाच-सहापर्यंत पोचून कामाचा दिवस गाठायच्या घाईत असतात. मग ड्रायव्हरला तीन-चारला कधी तरी एक क्षणभर झापड. मग अनेकांचा तो प्रवास अखेरचाच ठरतो. एकूण माणसाचे त्यानंच बनवलेले कायदे तोच पाळीत नाही आणि मोडून नुकसानीत येतो.

हे सारं आपल्याला चिरपरिचित आहे. आश्चर्य हे की, ज्या निसर्गाचे आपण घटक आहोत, त्यातल्या त्यात, त्यातले सर्वांत प्रगत घटक आहोत अशी आपण समजूत करून घेतो आहोत, ते तसं काही प्रमाणात खरंही आहे, पण त्याच्या वर्तनाचा आपण कधी अभ्यास करीत का नाही ? आम्ही आमची ऑफिसची कबूल केलेली वेळ पाळीत नाही, प्रामाणिकपणे काम करीन म्हणून कामाला लागताना लिहून दिलेला किंवा शपथविधीत उच्चारलेला शब्द पाळीत नाही. पण निसर्गाचा एवढा मोठा घटक असलेला सूर्य मात्र रोज ठरलेल्या वेळेला उगवतो, ठरलेल्या वेळेला मावळतो !

साध्या पंचांगातसुद्धा वर्षभर आधी गणितानं वेळ काढलेली असते. अर्थात यात आपण व्यवस्था निर्माण केल्याचा भ्रम बाळगू नये, निसर्गाची

व्यवस्था कळल्याचा आनंद फार तर मानावा. त्या पंचांगात अशी वेळ असते की, सकाळी ६.१५ ला सूर्य उगवेल किंवा काय तो संध्याकाळी ६.४२ ला मावळेल, तर तो त्याच अचूकतेनं ते काम त्या त्या वेळी करतो. त्यानं देवाला, निसर्गाला दिलेला शब्द तो पाळतोच पाळतो. त्यात दुसऱ्या गोलार्धात जायची तो घाईही कधी करीत नाही आणि हा गोलार्ध बरा म्हणून इकडं वेळ काढून रेंगाळतही नाही. आपल्याकडं मंत्रीपद गेलं तर अनेकांना सरकारी निवासस्थानात इतकं रेंगाळावंसं वाटतं की शेवटी न्यायालयीन कारवाई करून सामान बाहेर काढायची वेळ येते. यावरून तरी निसर्गाचं काही तरी शिकावं, असं वाटतं.

म्हणून निसर्गात असे दिवसाला दहा अपघात नाहीत. अपघात हा अपवाद आहे रहदारीचा नियम नव्हे, हे आता आपण जाणून घ्यायची वेळ आली, नाही का ? तीच गोष्ट निसर्गाच्या प्रामाणिकपणाची आहे. आपण जे पेराल, जे द्याल ते तसंच उगवून द्यायचा प्रामाणिकपणा निसर्गाकडं आहे. भात पेरला तर निगराणी केल्यावर आलेल्या लोंब्यांत तांदूळच असेल, गहू असणार नाही. उसाच्या फांद्या लावल्या तर येईल तो ऊसच असेल, जोंधळा येणार नाही की नाचणी.

हेच आपलं मूल शिक्षणासाठी शहरात किंवा परदेशात पाठवलं तर कबूल केलेली गुणवत्ता नि पदवी घेऊन येईलच असं नाही पण कदाचित चैन, कदाचित प्रेमविवाह, कदाचित व्यसन घेऊन येईल. काय लावून कुठलं पीक येईल हे 'जाणत्या नि श्रेष्ठ' माणसाच्या बाबतीत सांगता येऊ नये हे किती आश्चर्य नाही का ? नोकरीला लागताना काम करायचं प्रामाणिकपणे लिहून दिलेलं न पाळता त्याच कामासाठी पैसे खाईल, काम अडवून धरील, फाईल गहाळ करील, संपटाळेबंदी करून कंपनीच धोक्यात आणील - काय पेरलं त्याचं काय उगवून येईल - हे सांगणं कठीण नाही का ? कुठं

कुणी प्रामाणिकपणे, सरळपणे, तत्परतेनं, सचोटीनं वागलं की अपघात झाल्यासारखं वाटतं, ही निसर्गाला काय किंवा त्याच्याही निर्मात्या देवाला काय पहावी लागणारी शोकान्तिका आहे, जे जाणते जरूर ओळखतील.

म्हणून पू. भय्याजी कायंदे यांनी माणूस पारखण्याच्या दोन खुणा सांगितल्या त्या मोलाच्या आहेत. ते दोन प्रश्न करीत, एक - तुम्ही दिलेला शब्द पाळता का ? आणि दुसरा - दिलेली वेळ पाळता का ? त्यांच्या दृष्टीनं, व्यवहार काय परमार्थ काय, दोन्हींतही माणूस काय करील, कुठवर प्रगती करील याची परीक्षा या दोन प्रश्नांच्या उत्तरांत बरीचशी होऊन जाते.

पण आपण माणसांचं जग या अप्रामाणिकतेनं नि अपघातप्रवृत्तींनी एवढं बिघडवून ठेवलं आहे की, आपला विनाश तर आपण रोज पाहातोच आहोत. पण त्यात निसर्गाचा विनाशही करण्याचा आपला अविचार आहे. पेरलेलं उगवून देण्याची जबाबदारी मातीनं घेतली आहे, प्राणिज आणि इतर मदती पिकांना होत आहेत. पण माणसाला प्रगतीसाठी रस्त्यांवर वेग वाढवून जशी घाई करायची आणि अर्थातच अपघात घडवायची खोड आहे, त्यात त्यानं निसर्गालाही ओढायचा प्रयत्न केला आहे. निसर्गानं कबूल केलेला शब्द पाळून काळ्या आईनं मायेनं दिलेल्या एक टनावर तो खूश नाही, चार महिन्यांनी मिळणाऱ्या पिकावर-फळावर तो तृप्त नाही. त्याला वाटतं आपल्यासारखंच तुफान वेगानं गाडी चालवली म्हणजे लवकर पोचायला होईल आणि जादा पैसे मोजले की, आपलं काम लवकर होईल.

विचार केल्यावर आपल्या लक्षात येईल की, निसर्ग चार दिवसांनी देणारी गोष्ट त्यानं दोन दिवसांत द्यावी आणि एक टनाची चार टन द्यावी म्हणून 'रासायनिक खतांची लाच' त्यानं सवयीप्रमाणं जमिनीला दिली. तिनं आपल्याच लेकराचा हा लोभ काही काळ सहन केला. शेवटी अति घाईनं लवकर पोचण्याऐवजी अपघात व्हावा अन् पैसा चारणारा कायद्याच्या

कचाट्यात सापडावा तशा जमिनीही बिघडल्या. चार दिवसांनी मिळणार ते दोन दिवसांतच नव्हे अजिबात येईना झालं, आलं तर दूषित यायला लागलं. जमिनी खारवड होऊन त्या नापीक झाल्या. रसायनांचा पैसा चारण्याचा प्रयत्न करणाऱ्या लाचखोर माणसाला काहीच न देण्याचा कायदा निसर्गानं हाती घेतला.

हे चित्र आपण पाहावं, अंतर्मुख व्हावं असंच आहे. पण ते निराशा करणारं वाटलं तरी तसं नाही. कदाचित या चुकाच आपल्याला शिकवतील - योग्य वेग, खबरदारी अन् प्रामाणिकताही. सद्गुणांचा आवाज तुरळक अन् हळू असला तरी तो नष्ट झालेला नाही, होणारही नाही. सज्जनता कमी आढळली तरी तीच हितकारक ठरणार आहे. आज ती अव्यवहार्य वाटते पण ती तशी नाही. अप्रामाणिकपणा हा स्वार्थानं फोफावलेला व्यवहार असू शकेल पण तो कधी कायदा होणार नाही. कारण निसर्ग आहे आणि तो प्रामाणिक आहे. तो त्याचे कल्याणाचे कायदे करतो, पाळतो आणि आपण नाही पाळले तर पाळायला लावतोही. आता निसर्गाच्या हितकारी कायद्यांतून शिकायचं की आपल्या चुकांतून शिकायचं एवढीच सवलत आपल्याला आहे.

याला दुसरंही एक कारण आहे. याच साऱ्या अप्रामाणिकतेच्या, बेदरकार अपघातांच्या काळात अत्यंत प्रामाणिक व विनाअपघात सेवा देणारेही अनेक जण गावोगावी आहेत. सूर्यासारखे सत्पुरुष सर्व काळी सर्व ठिकाणी जगत आहेत. त्यांनी सारं जगून दाखवून ज्यांची सद्बुद्धी थोडी कमकुवत आहे त्यांना बळकट केलं आहे, जे बळकट आहेत त्यांची प्रशंसा केली आहे आणि ज्यांच्यात ही सज्जनता निद्रिस्त आहे त्यांना जागं केलं आहे, सावधान केलं आहे.

पूज्य विनोबाजी आश्रमात असताना त्यांच्याजवळ एक घड्याळ

होतं. एक गृहस्थ आले, त्यांनी ते पाहिलं. त्याकाळी घड्याळं ही वस्तू तशी मोठी होती. ते विनोबाजींना म्हणाले, 'इथं आश्रमात वेळोवेळी घंटा होत असतात. तुम्ही इथंच असता. त्यामुळं तुम्हाला वेळ कळत असते. मला कधी फिरावंही लागतं त्यामुळं तुमच्यापेक्षा मला याची गरज जास्त आहे. तेव्हा तुम्ही हे घड्याळ मला द्या.' विनोबाजींना पटलं, त्यांनी ते घड्याळ उचलून त्यांना दिलं.

काही दिवसांनी कुणाच्या तरी लक्षात आलं की, विनोबांकडं घड्याळ नाही. ते पाहणाऱ्या दुसऱ्या एका गृहस्थांनी एक उत्तम नवं घड्याळ विनोबांना दिलं. नंतर पूर्वीचे ते गृहस्थ पुन्हा विनोबांच्या भेटीला आले असता त्यांना ते नवं घड्याळ दिसलं. ते म्हणाले, 'हे अधिक आधुनिक आहे. मी फिरस्त आहे. नवं मला अधिक उपयोगी पडेल. मी सतत फिरतीवर असतो, मी हे जुनं घड्याळ तुम्हाला परत करतो.' विनोबांना ते पटलं. त्यांनी नवं घड्याळ देऊन टाकलं. जुनं पुन्हा बांधलं.

प्रश्न घड्याळाचा नाहीच. अनासक्तीचा आहे, असंग्रहाचा आहे. त्याच बरोबर मालकी नि विश्वस्तभावनांच्या सत्प्रवृत्तींचा आहे. त्यामुळंच विनोबा हा सिद्धांत पुढं मांडू शकले की, तुमच्याजवळ जास्त पैसा आहे. दुसऱ्याजवळ नाही. त्याला जरूर आहे, ती गरज तुमच्यापेक्षा जास्त असेल तर तो त्याचाच आहे. आपल्याकडं सांभाळायलाच दिलेला आहे. तो त्याला त्याच्या निकडीप्रमाणं दिला पाहिजे. तेच तत्त्व पुढं भूदानात लक्षावधी लोकांनी अंमलात आणलं. भूमिहीन मजुरांना गरजेपुरती जमीन मिळू शकली. भूदान ही जगातली अद्वितीय ठरलेली क्रांती त्यातून घडली.

हे महापुरुषांचं झालं. पण एका अगदी साध्या ठिकाणीही ते अनुभवायला आलं आहे. मी बिऱ्हाडानं पूर्वी एका बंगल्यात राहात असतानाची गोष्ट आहे. तिथं बागकामासाठी एक संजूकाका म्हणून येत. ते

तेव्हापासून आजही येतात, भेटतात. परिस्थिती हलाखीची आहे. वस्तीवरून सायकलनं आमचं घर वीस किलोमीटरवर होतं. म्हणजे जाता-येता चाळीस किलोमीटर सायकलिंग त्यांना करावं लागे. कुठं ठरलं असेल त्याप्रमाणं मेहनतीचं काम करून, संध्याकाळी पाचनंतर पुन्हा वीस किलोमीटर सायकलिंग करावं लागे. एके दिवशी कुठं ठरलेलं काम रद्द झालं. त्यामुळं सकाळी ते परतताना माझ्याकडं आले. मला परिस्थिती कळली. आमच्याकडचं काही काम होतं ते काढलं. त्यांना दिवसाची मजुरी दिली. काम उरकल्यानं चहा-पाणी घेऊन ते रवाना व्हायचे होते. चहा-पाणी झालं तरी ते घुटमळत होते. अखेर मी कारण विचारलं, त्यांनी निम्मे पैसे हातात परत केले. 'म्हटले की, आज खरं तुमचं काम ठरलं नव्हतं. केलं तेही दिवसभराचं नव्हतं, अर्ध्याच दिवसाचं होतं. तेव्हा ही अर्ध्या दिवसाची मजुरी नको. ती परत करायची होती.' माझं म्हणणं दिवस तर गेलाच होता. पण त्यांनी अखेर अर्ध्या दिवसाची मजुरी, ते काम अर्ध्याच दिवसाचं होतं म्हणून प्रामाणिकपणे परत केली. त्यांच्या प्रामाणिकपणाची दाद मला वेगळ्या मार्गानं द्यावी लागली.

ज्यांची रोजची चूल त्यावर अवलंबून आहे तिथंही इतका सद्‌गुण टिकून आहे, हे जरूर लक्षात घेण्यासारखं आहे. सद्‌गुणांचं, सत्प्रवृत्तींचं पीक असं कदाचित गरिबीच्या हवेत जास्त चांगलं येत असेल, प्रामाणिकपणे नोकरी-व्यवसाय करणाऱ्यांच्या, प्रामाणिकपणे कर भरणाऱ्यांच्या घरच्या वातावरणात येत असेल, नाही तर सद्‌गुणांना आयुष्य वाहिलेल्या महापुरुषांच्या सावलीत वाढत असेल पण ते टिकून आहे, वाढतं आहे, फळफुलं येत आहेत, हे नक्कीच !

त्यामुळं परिस्थिती निराशाजनक असली तरी इतिहासाच्या प्रदीर्घ लांबीच्या पडद्यावर ती नगण्य आहे. या सत्पुरुषांची नि त्यांपासून प्रेरणा

घेणाऱ्या असंख्य सामान्य माणसांची प्रामाणिकता जिवंत आहे. ते कष्ट करून निसर्ग देईल त्यात समाधानी आहेत, निःस्वार्थी आहेत, मदतशील आहेत. माणसांनी लोभाच्या आहारी जाऊन वेगाची मर्यादा ओलांडायची ठरवली, स्वार्थाची शास्त्र नि संशोधन केली, तरी निसर्गाचा दिवस मिनिट, घटका पळांसह चोवीस म्हणजे चोवीस तासांचाच आहे, सूर्य ६.१६ म्हणजे ६.१६ ला उगवण्याचा शब्द पाळतो आहे, जमीन आपला उगवून देण्याचा, सुपीकतेचा शब्द न कंटाळता शेकडो वर्षं पाळते आहे, डोंगरासमोर दिलेल्या हाकेला प्रामाणिकपणे प्रतिध्वनी येतो आहे, झाडं प्राणवायू देऊन वेळी त्यांच्याच जिवावर उठलेल्यांनाही जगवताहेत, अथांग खाऱ्या पाण्याचं जरूरीपुरतं गोडं पाणी तयार होऊन तहान भागवतं आहे, माणसाच्या अविचारी शस्त्र नि शास्त्रांना पुरून उरेल एवढी निसर्गाची यंत्रणा अभेद्य आहे. त्याच्याकडं सज्जनतेची बह्मास्त्रं आहेत तोपर्यंत सत्प्रवृत्तींचा आवाज नाजुक असेल, सत्प्रवृत्तींची वाटचाल मंद असेल, एकाकी असेल, सध्या जाणवते तशी काट्याकुट्यांची असेल पण ती सुरूच राहणार आहे, नव्हे यशस्वीही होणार आहे.

प्रगतीच्या घाईसाठी अविचारी संशोधनं, अतिरेक - अप्रामाणिकपणा अन् असत्य यांचा जगभर सध्या कितीही सुकाळ दिसत असो, शेवटी 'सत्यमेव जयते' हेच खरं ठरणार आहे ! सत्प्रवृत्तींची वाटचाल अविरत सुरूच राहणार आहे !

१८. डाकू कोण ?

डाकू म्हटलं की, आपल्यासमोर आधी येतात ते बरेचसे सिनेमात रंगवलेले डाकू. त्यांची ती जरब, शत्रुत्वं, शस्त्रं, हल्ले, लूटमार अशा अनेक गोष्टी. आजही भारताच्या वेगवेगळ्या प्रांतातल्या दुर्गम जंगलांत ही मंडळी कार्यशील आहेत. त्यांना मुळात खरी हवी असते ती जगण्यासाठी संपत्ती. पूर्वी आणि अजूनही सावकारी करणाऱ्याची, नाडणाऱ्यांची, लोकांची लूट करून जनतेला गरीब-अडाणी ठेवणाऱ्या निर्दय संपत्तिवानांचीच विशेषतः लूट होते. अनेकदा या लुटीतून गरीबांना काही कैवारीही गवसतात, त्यांना काही पैसा-अन्य मदतही मिळते. मूळ डाकूगिरीचा मार्ग अवैध असला तरी सामाजिक असंतोषावर मार्ग काढायला जेव्हा राज्ययंत्रणा अपुरी पडते, न्याय्य समता नाकारली जाते तेव्हा घडणारे ते उद्रेक असतात. नाइलाज होऊन रस्त्यावर येऊन कायदा हातात घेऊन आर्थिक गुन्हेगारीला त्वरित व प्रत्यक्ष शासन करण्याचा तो प्रयत्न असतो, हेही दुर्लक्षित करता येत नाही.

आता डाकूही स्वार्थी, सुखलोलुप झाले, चैनचंगळवादी झाले तर मग अर्थातच हे चित्र राहणार नाही. तशाही घटना असतात. मग अर्थातच सामान्यांची अशा डाकूंना सहानुभूती नसते. उलट सामान्य माणसं दोघांकडूनही भरडली जातात. या खासगी सावकारांकडून अन् डाकूंकडूनही. म्हणून माणूस डाकू बनला असेल तर 'लोभा'नं बनला की, पोटासाठी बनला, व्यवस्था त्याला काम पुरवण्यात, सरळ जगू देण्यात असमर्थ ठरली म्हणून त्यानं हा कष्टांचा चुकीचा मार्ग अवलंबला का हे पहावं लागेल. डाकूगिरीचा जिवावरचा धोका कुणी आनंदानं पत्करलेला नसतो. प्रश्न कधी पोटाचा, कधी अन्यायाचा असतो. तो न्यायानं, श्रमसंधी देण्यानं सुटतो.

पण हा मूळ प्रश्न एवढा सोपा नाही. विनोबांनी सांगितलेली एक गोष्ट पाहू. सिकंदरला जग जगज्जेता म्हणून ओळखतं. तलवारीच्या जोरावर, त्या योद्ध्यानं अनेक बलाढ्य राजांनाही जिंकलं, ती राज्यं बळकावली. नव्या नव्या लढाया करून प्रदेश जिंकायचे आणि बळकावायचे, अधिक संपत्तिवान व्हायचं हाच उद्योग करून त्याचा साम्राज्यविस्तार चालू होता. या वाटचालीत त्याच्या आड आला तो एक निडर, शूर डाकू. जंगजंग पछाडून तो त्याला पकडू शकला नाही. हे शल्य त्याच्या विजयी घौडदौडीत डाचत होतं. अखेर खास प्रयत्न करून त्या डाकूला सिकंदराच्या सैनिकांनी कौशल्यानं पकडलं. सिकंदराच्या दरबारात त्याला हातकड्या घालून बंदोबस्तात हजर केलं.

सिकंदरानं रागानं विचारलं, 'तू ही काय डाकूगिरी चालविली आहेस ? तुला याची जबर शिक्षा भोगावी लागेल.'

'हे पहा, तू जे चालवलं आहेस तेच मी करतो आहे !' डाकू शांतपणे उत्तरला.

सिकंदरासारख्या सम्राटाला अरे-तुरेतलं सडेतोड उत्तर ऐकावं लागेल असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. त्याचा पारा आणखीच चढला.

त्यानं ओरडून विचारलं, 'मी सिकंदर आहे, सम्राट आहे. तू कुणाशी बोलतोस याची तुला जाणीव आहे का ? तुझी नि माझी बरोबरी कशी होऊ शकेल ?'

डाकू निर्भीडही होता. सत्यवादीही.

तो तितक्याच शांततेने उत्तरला, 'आपल्यात तुला वाटतो तसा काही फरक नाही. मी कुठं एकट्यादुकट्या श्रीमंताला लुटतो. तू दुसऱ्या राजाला नि राज्याला लुटतोस. आपण एकाच प्रकारची कामं करतो आहोत. फरक एवढेच आहेत की, तुझं लूटमारीचं प्रमाण माझ्यापेक्षा मोठं आहे, माझं फार

छोटं आहे आणि दुसरं हे की, तू आजवर लूटमारीत यशस्वी झाला आहेस मी आज दुर्दैवानं असफल झालो म्हणून हातकड्या पडून तुझ्या दारात उभा आहे. तू स्वतःला फार मोठाही समजू नकोस. दुसऱ्याला आपल्या स्वार्थासाठी लुबाडण्याचा आपला हेतू सारखाच आहे, तीच डाकूगिरी आहे, त्यात आपण एकच काम करतो आहोत. मी लहान आहे, अयशस्वी आहे. माझा न्याय इथंच होईल. तू मोठा डाकू आहेस, तुझा न्याय कदाचित मोठ्या दरबारात, कदाचित देवाच्या दरबारात होईल. पण लोभाची शिक्षा दोघांनाही होईलच, हे लक्षात ठेव !'

सिकंदर हे ऐकून सर्द झाला. एका सामान्य डाकूला असलेलं हे आकलन, ही आपल्याला जागं करणारी गोष्ट आहे. विचार केला तर लक्षात येईल की, कुठल्याही प्रकारची पैशाची, श्रमांची, विचारांची, संपत्तीची लुबाडणूक ही डाकूगिरीच आहे. किंबहुना श्रमाच्या रास्त मूल्यापेक्षा घेतल्या जाणाऱ्या, म्हणजेच उकळलेल्या, नाडून वसूल केल्या जाणाऱ्या प्रत्येक कृतीला हेच नाव व तेच परिणाम आहेत. मग ते पगार घेऊन प्रामाणिकपणे संशोधन, अध्यापन न करणं असो, कामासाठी नडलेल्याकडून नोकरी लागण्यापासून अगणित कामं करून देण्यासाठी गल्लीपासून दिल्लीपर्यंत घडणारा कोणताही व्यवहार असो, महागड्या औषधपाण्याच्या चक्रात रुग्णाला अडकवून पैसा उकळणं असो, सदसद्‌विवेक बुद्धीच्या मताची व्यापारी देवघेव असो - की आणखी काही असो ! ही डाकूकल्पनेची मूळ व्याप्ती फार मोठी असल्याचं लक्षात येईल.

पूर्वीच्या काही दुर्जेय डाकूंच्या प्रदेशातून विनोबांची भूदानासाठी पदयात्रा चालली होती. वाटेतले डाकूगिरीचे धोके सर्वांनी त्यांना जाणवून दिले होतेच. पण मृत्यूलाही न जुमानणारे आणि जगालाच दान देत आलेले असंग्रही विनोबा याला घाबरून कुठला मार्ग बदलतील नि 'सुरक्षित'

मार्गानं जातील ही शक्यता नव्हती. उलट चंबळसारख्या डाकूंच्या प्रसिद्ध भागांतून त्यांचा पायी प्रवास तितक्याच निर्भयपणे सुरू होता. विनोबांना त्या डाकूंनाही समजून घ्यायचं होतं. त्यांतले बहुसंख्य पोटासाठी डाकू झालेले होते. बाबा कसायला भूदानातून जमीन देणार होते. तिच्या साहाय्यानं डाकूगिरीचा त्यांनाही नावडता, अप्रतिष्ठित मार्ग सोडायची संधी त्यांना मिळणार होती. त्याला त्यांची तयारी होती. पुन्हा हा समाज कसा वागवेल ही भिती असूनही उलट विनोबांनाच शरण येऊन शस्त्रत्याग करून साधं, कष्टाचं, निर्भय जीवन जगण्याची इच्छाच त्यांतल्या असंख्य डाकूंनी व्यक्त केली होती. ज्यांच्या डोक्यावर पकडण्यासाठी सरकारी इनामं लागली होती असे अनेक खतरनाक डाकूही त्यांत होते. लच्छीसारख्या डाकूला त्या काळातलं पाच हजाराचं इनाम होतं. पण त्यालाही विनोबांच्या चंबळमधून घुमणाऱ्या सरळ - तपःपूत - निरिच्छ - कल्याणकारी आवाहनानं हालवून सोडलं. विशेषतः विनोबांच्या स्वतःच्या प्रामाणिक आचरणाचा त्याच्यावर फार प्रभाव पडला. वास्तविक हे कळलं त्यावेळी तो मुंबईसारख्या लांबच्या ठिकाणी गुप्त जागी होता. पण तिथंसुद्धा त्याची ही सद्‌बुद्धी जागी झाली. नंतर शरण जायला तो सहकुटुंब शस्त्रांसह विनोबांकडं चंबळखोऱ्यात आला. विनोबांसारख्या सत्पुरुषाच्या ठिकाणी असलेल्या ईश्वरामुळं त्याच्यासारख्याच्या ठिकाणचा ईश्वर जागा झाला. ही घटना विनोबांनाही भारावून टाकणारी ठरली.

प्रश्न निर्माण होतो तो असा की, आज तर जीवनाचं प्रत्येक क्षेत्र अशा लूटमारीनं, ग्रस्त आहे. ते नुसतंच पोटाच्या प्रश्नामुळं घडणारी लूटमार नव्हे तर भरल्या पोटी चैनीसाठी लूटमार करण्यानं ग्रस्त आहे. तो लोभाचाच कारभार असल्यानं त्याला पूर्णविराम कुठंच नाही. लोभाचं भांडं अनाकलनीय आकाराचं असतं, चैनींचा प्रवास न संपणारा असतो ! अशावेळी त्यासाठी

जर ही लूटमार चालणार असेल तर अर्थातच तीही कधी न संपणारी राहील. याला सरळ लूटमार, डाकूगिरी म्हणून ओळखणारा परमेश्वर किती हृदयांत जागा होऊ शकेल आणि तो जागा करू शकणारे किती विनोबा आपल्याकडं तयार असतील ? जगाबरोबर रहावं लागतं, इट इज द ऑर्डर ऑफ द डे, पैशाची किंमतच कमी होते आहे, भविष्याची काळजी नको का करायला, इतर देश किती पुढं गेलेत चैन नि करमणुकीत - ते आजच्या ग्लोबल वातावरणात नको का बघायला - असली परतंत्र, भुलल्यासारखी, स्वत्वहीन समर्थनं न देता या सर्वत्र पसरलेल्या लुटालुटीला 'ठाम नकार' देऊन गरीबी नव्हे तर 'साधेपणा'ची पताका खांद्यावर घेऊन सर्वांच्या स्वास्थ्याच्या पंढरीची वारी करायला तयार असलेले किती वारकरी पुढं येतील ? काही समजूतदार वारकरी तरी जरूर येतील !

निदान विनोबांनी मोठ्या तळमळीनं विचारलेला चंबळखोऱ्यातल्या पहिल्या प्रवचनात विचारलेला 'डाकू कोण ?' हा प्रश्न विचाराची सुरुवात करायला पुरेसा ठरू शकेल असं वाटतं. विनोबा तेव्हा पुढं म्हणाले, 'हे डाकू कोण, हे केवळ एक ईश्वरच जाणे. काही जणांना डाकू म्हणून ओळखतात, परंतु तेवढेच डाकू असतात असं नाही, देवाच्या दरबारात त्याहून अधिक लोक अपराधी ठरू शकतील !'

आता आपला आपला विचार आपण करायचा आहे. त्यासाठी आपण समर्थ आहोत, विचारशक्ती आहे, आपल्यातला जागा झालेला ईश्वर निदान आपल्यापुरतं तरी उत्तर आपल्याला नक्की देऊ शकेल आणि त्यावरचा साध्या-सरळ-स्वास्थ्याच्या जीवनमार्गाची प्रेरणाही. फक्त त्यासाठी निदान स्वतःला तरी हा प्रश्न करायची गरज आहे, 'डाकू कोण ?'

१९. औषध की विष ?

अवनीशच्याच कारचा तो आवाज असणार हे साऱ्या बिल्डिंगला ठाऊक होतं. प्रचंड गर्दीच्या, रहदारीच्या त्या रस्त्यावरच्या अपार्टमेंटमध्ये सर्वांत आलिशान फ्लॅटचा तो मालक होता. आता मध्यमवयीन होता. पण ओळखणारे त्याला कॉलेजच्या वयापासून ओळखत होते. कालपासून अवनीशची होंडा सिटी असंख्य वेळा बिल्डिंगशी येऊन थांबली. ब्रेक्सच्या आवाजावरून अनेकांना येण्याजाण्यातली त्यांची अस्वस्थता कळत होती. एरवीची बिल्डिंग मध्यमवर्गीय माणसांची होती. नेहमीची सवय म्हणून नसली तरी एकमेकांना पूर्वीच्या वाड्यासारखी दारं उघडी टाकायची आणि जातायेता एकमेकांच्या सुखदुःखाची दखल घ्यायची सवय होती. अवनीशचे आई-वडील नोकरदार होते. सामान्य शिक्षक होते. त्यामुळं तेही तिथं आले. ते मिळून मिसळूनच राहात असत.

अवनीश मोठा झाला तो बिल्डिंगमध्ये येतजात, खेळतच. पण थोडा अबोल, महत्त्वाकांक्षी, सुदैवानं यशानं साथ दिली. इंजिनिअर झाला. प्रथम स्थानिक वर्तुळाशी परिचित झाला. हळूहळू पैशाच्या वर्तुळाशीही. यशानं मागं बघायची वेळ आलीच नाही. पत्नी आली. ती श्रीमंतांची एकुलती एक मुलगी. तिचं घरच पैसापैसा करीत-खाणंपिणं नि करमणूक यांत वाढलेलं होतं. अवनीशची बदलणारी जीवनपद्धती आणखीच पैशाकडं वळली. हळूहळू त्याची गणना यशस्वी कॉन्ट्रॅक्टर-इंजिनिअर्समध्ये व्हायला लागली. मग पुन्हा सुदैवानं साथ दिली. मुलगा झाला. वाढला तोही अशा यश नि पैशाच्या हवेतच. अवनीशला हळूहळू घरातल्या आईवडिलांची अडचण वाटायला लागली. दोघांच्या पेन्शन जगायला पुरेशा असल्या तरी

त्याच्या दृष्टीनं तो पैसा त्याच्या त्या लाखोच्या नि कोटींच्या उलाढालींपुढं मोजायलासुद्धा दिसणार नाही, एवढा नगण्य होता. पत्नीची कटकट मागं होतीच. त्यांना ती रागानं 'डस्टबिन' म्हणे. वडिलांनी कष्ट करून शिकवलेल्या अवनीशला त्याचं काहीच वाटेना. ते त्याला नातवाकडं लक्ष द्यायला सांगत, सारखं पैसापैसा करू नको म्हणत, आपल्या बिल्डिंगमधल्या शेजाऱ्यांशी संबंध ठेव, त्यांच्या सुखदुःखात सहभागी हो म्हणत - आता पैशापुढं त्याला हे सांगणं ही सारी कटकट वाटू लागली. यथावकाश आईवडिलांची रवानगी आजच्या असल्या विचारसरणीच्या रीतीप्रमाणं 'विसाव्या'चं गोंडस नाव धारण केलेल्या वृद्धाश्रमात झाली. घरातली रोजची चुकीची जीवनपद्धत जगण्यापेक्षा, त्या दोघांनीही ते पत्करलं.

मुलाचं वय कळतं होतं. त्याला आजीआजोबांची गरज होती. आई-वडील, त्यांचे सारखे पैशाचे विषय, त्यावर माणसांना जोखण्याच्या प्रवृत्तीनं त्याची घुसमट होत होती. आई-वडील अचानक कुणाला नकळत वृद्धाश्रमात रवाना झाल्यावर बिल्डिंगमधल्या पैशाच्या दृष्टीनं मध्यम पण प्रेमळ इतर घरादारांनी मूकपणे ढाळलेले अश्रू आणि दबलेल्या आवाजात केलेली चर्चा त्याच्या नजरेतून सुटली तरच नवल. त्याच्या संवेदनशीलतेला ते सारं असह्य होत होतं. लहानपणापासून तो पहिला यावा, पुढं इंजिनिअर होऊन पैसा नि नाव कमवण्यात वडिलांच्याही एक पाऊल पुढं टाकावं. त्यात त्यानं कमी पडू नये म्हणून आईचा तगादा रोज सुरू होता. त्याचा प्रत्येक तास आणि दिवस त्या दृष्टीनं कसा 'घडेल' याची महत्त्वाकांक्षी आईची काळजी म्हणजे त्याला अत्यंत नकोशी वाटणारी गोष्ट झाली होती. त्यातच त्याचं दोन दिवसांपूर्वी कॉलेजमधून वडिलांच्या पैशापोटी झालेलं अपहरण, मग खंडणी, मग पुन्हा त्याच पैशाचा अडथळा, लोभ, होकार-नकार, पोलीसतपास साऱ्या यंत्रणा आणि वेळेत पैसा ठरल्या ठिकाणी न

पोचल्यानं उमलत्या जीवनाची झालेली दुर्दैवी अखेर आज बिल्डिंगमध्ये दबल्या आवाजात चर्चिली जात होती.

आत्ता आलेली गाडी, गेली होती ती अवनीशच्या आईवडिलांना वृद्धाश्रमातून आणण्यासाठी. पण यांच्या या 'पैशाच्या भुताटकीनं भरलेल्या'त्या घरात परत यायला त्यांनी नकार दिला होता. त्यापेक्षा सुखदुःखात सहभागी होणारे तिथले सोबती, कधी भेटायला येणारे त्यांचे जुने मित्रमंडळी हेच विश्व त्यांना अधिक आनंद देणारं होतं. त्यांचा नकार घेऊन ती गाडी एकट्या अवनीशला घेऊन परतली होती. त्या भयाण घरात आता तिघंच होती. अवनीश-पत्नी अन् त्यांचा पैसा !

हळूहळू बिल्डिंगला कळलं की, त्या पैशाच्या मागे लागून माणुसकी सोडलेल्या घरात त्या समाधानी सरळमार्गी आईवडिलांना परतायचं नव्हतं. त्यांचा लाडका नातूही आता तिथं नव्हता. पैसा-पैसा-पैसा करीत शेवटी घरातून प्रथम आईवडील हाकलले गेले होते, चांगुलपणा जोपासणारे शेजारी-मित्र-नातेवाईक दुरावले होते. आता जणू पैसा कमवण्याचं मशीन बनवायला घातलेला उमलता जीवही हातचा निसटला होता. बिल्डिंग पुन्हा मूक झाली होती. तेही जीव पैशाच्या साहाय्यानं जगत होते, पण त्याचा प्रमाणात वापर करीत होते, ते शेजारी पैशाशिवाय इतर असंख्य मिळवण्यासारख्या गोष्टी जाणत होते. आता मात्र तो 'माणसांचा' सारा समुदाय पुन्हा एकदा मुकाट्यानं हळहळत होता.

हा प्रसंग दुर्दैवी असला तरी पैशाची भूल काय नि कशी पडते आहे ते दाखवतो. सावध झाल्यास कळेल की, वास्तविक माणसाचं अंतरंग एवढं समृद्ध आहे की, त्याच्या साहाय्यानं त्यानं एवढ्या कला, संस्कृती, संशोधनं, शास्त्रं, योगविद्या, भाषा, संवाद असा माणसाला खऱ्या अर्थानं समृद्ध करणारा वैभवशाली इतिहास रचला आहे. इतकंच काय सहानुभूती,

प्रेम, करुणा, दया, कृतज्ञता - अशा जीवन सुंदर करणाऱ्या किती तरी मूल्यांची सुंदर उभारणी हजारो वर्षांच्या इतिहासात करीत आणली आहे. त्यांतल्या अनेक गोष्टी तर अशा आहेत ज्यांना पैसा लागत नाही. इतकंच नव्हे तर त्या पैशानं घडवताही येत नाहीत.

खरं तर त्या साऱ्या संशोधनात सोनं-नाणं-वस्तू करीत करीत विनिमयाचं एक साधन म्हणून मिळालेली-शोधली गेलेली एक वस्तू म्हणजे -पैसा. ती जीवन शांत-आनंदी-माणुसकीचं-समृद्ध असं बनवणारी वस्तू कधी नव्हती. कधी होणारही नाही. पण व्यावहारिक सोय पाहण्यासाठी उपयोगी पडावा म्हणून साठवताना हळूहळू त्या पैशानं माणसाचा ताबा कधी घेतला, हे अनेकांना कळलंही नाही. पैशाची विनिमयक्षमता निर्विवाद असली तरी त्यानं कुठलंही नि काहीही घेता येत नाही, मिळवता येत नाही, हे शाश्वत सत्य हळूहळू काहींच्या नजरेआड झालं.

प्रेमाचा ओलावा, प्रोत्साहनाची प्रेरणा, सहानुभूतीचे शब्द, पाठीवरचा धीराचा हात, शाबासकीची दाद, आठवणीनं दिली जाणारी मदत, प्रसन्न करणारी गार वाऱ्याची झुळूक, निसर्गाचं-देवाचं दर्शन - एक ना दोन.अगणित गोष्टी या पैशानं कराव्या वाटल्या तरी न साधणाऱ्या असतात. उलट त्या अनेकदा पैशाशिवायच उत्कृष्टपणे घडतात. पैसा मात्र जगातल्या कुठल्याही गोष्टी मी घडवून आणीन असा भास माणसाच्या ठिकाणी निर्माण करण्यात दिवसेंदिवस कधी नव्हता एवढा यशस्वी होत चालला आहे, असं दुर्दैवानं आढळतं. इतकं की, शिक्षणं, साईड निवडणं, नातेवाईक-मित्रमंडळी जोडणं-तोडणं, शेजारीपाजारी महत्त्वाचे-कमी महत्त्वाचे ठरणं, मनीचेन-लॉटऱ्या झटपट श्रीमंतीचे - लाखाच्या गादींसारखे मार्ग - शेअरबाजार - खाजगी सावकाऱ्या करणं - जमिनींच्या जिवापाड उलाढाली करणं - जो-जो म्हणून मार्ग दिसेल त्या-त्या मार्गानं - पैसा आणि अधिक पैसा मिळवावा या

पलीकडं विचारसुद्धा सुचू नये इतकं अनेकांना या पैशाच्या भुतानं झपाटलेलं दिसतं. हे एवढ्यावर थांबत नाही तर अनेक प्रकारच्या आर्थिक भ्रष्ट व्यवहारांची दारं हाच पैसा खोलायला सुरुवात करतो. अडचणीतल्यांना नाडलं जातं, मग तो बेकार तरुण असेल, संस्था काढू इच्छिणारा संस्थापक असेल, कुठं प्रवेश घेऊ इच्छिणारा विद्यार्थी असेल, नडलेला रुग्ण असेल, अडलेला शेतकरी असेल, बढतीच्या प्रतीक्षेतला पात्र नोकरदार असेल, कुठलं कंत्राटी काम कुणाला द्यायचं असेल - ही यादी अमर्याद आहे. कुठल्याही ठिकाणी हाच 'पैसा' शिरून माणसाला मिळकतीचं काळं दार उघडून देताना दिसेल. आधी माणूस पैशाला खाईल आणि मग पैसा माणसाला नि माणुसकीला.

एक प्रसिद्ध गोष्ट आहे. माणसांच्या जवळच जंगलात राहणाऱ्या सुजाण प्राण्यांना एकदा मनुष्य प्राण्यांच्या ढासळत्या संस्कृतीची नि स्वास्थ्याची चिंता वाटली. काही उपाय शोधावा म्हणून त्यांनी एक मीटिंग बोलावली. माणसांच्या जगात सर्कसच्या माध्यमातून अनेक वर्षं काढून आलेल्या हत्तीचं त्यांनी प्रमुख व्याख्यान ठेवलं. हत्ती म्हणाला, 'माणूस तसा प्राणी म्हणून प्रगत आहे खरा पण त्याची सांस्कृतिकदृष्ट्या बरीच अवनती झाली आहे. आपण तर चारा-गवतापासून प्राण्यांपर्यंत सर्व खाऊन जगतो. पण मला तिथं असं बोलण्यात आलेलं दिसलं की, माणसांच्या जगात आपण खातो ते सर्व प्रकार आहेतच पण त्या व्यतिरिक्त तो आणखीही एक 'पैसा' नावाची वस्तू 'खातो'. मला अनेक वर्षं त्याचा उलगडा होईना. एकदा मला बोलण्यात कळलं की, ती वस्तू कुठं उगवते माहीत नाही पण ती त्याच्या खिशात असते. तशी ती आमची तालीम घेण्याऱ्या रिंग-मास्टरच्या खिशातही होती. एकदा काही काम करताना त्याच्या खिशातून ती वस्तू चुकून पडली. आपण इतके पदार्थ खातो, ज्याची एवढी गोडी माणसाला वाटते ती काय आहे ते

पहावं म्हणून ती नाण्यासारखी चकचकीत गोलसर आकाराची वस्तू मी मुद्दाम हुंगून पाहिली. तिला कुठलाही वास नाही, ती आकर्षक नाही. नंतर मी ती चावून पाहिली. ती चावायला अत्यंत कठीण वाटली. शेवटी त्याचा एक तुकडा पोटात गेल्यावर कदाचित बरं वाटत असावं, म्हणून मी ती शेवटी खाऊन टाकली. तिचा गिळताना त्रास झाला. पोटात ती खुपू लागली. इतकंच काय ती पोटातून कधी बाहेर पडेल असं मला झालं. एकूण माझ्या लक्षात आलं की, साध्या खाण्यापिण्याच्या गोष्टीतही माणसाची फारच अवनती झाली असून एक प्राणिवर्ग या बंधुत्वाच्या नात्यानं त्याच्या प्रबोधनाची काही योजना आपल्यासारख्या सुसंस्कृत प्राणिवर्गानं काढावी अशी माझी शिफारस आहे...!'

थोडं अधिक शिकण्यासाठी श्री रामकृष्णांचा अनुभवही पहावा, असं वाटतं. त्यांच्याकडं दक्षिणेश्वरला एक साधुवृत्तीचा मनुष्य नेहमी येत असे. तो अत्यंत विनयशील व नम्र होता. सद्वर्तनी होता. रामकृष्णांशी तो मोठ्या आदरानं वागे. मध्ये काही कारणानं त्याचं येणं झालं नाही. पुढं रामकृष्ण हृदयराम बरोबर एकदा कोन्नगरला गेले होते. तिथं ते नावेतून उतरले. त्यावेळी नदीकाठावर तो मनुष्य साधुवेषात मोठ्या थाटात बसला होता. त्याचा अवतारच त्याची श्रीमंती दाखवीत होता. पूर्वीची त्याच्या ठिकाणची सारी विनयवृत्ती लोप पावलेली चेहऱ्यावरच कळत होती. रामकृष्णांना पाहताच तो उठून उभा राहिला नाही, आदर दाखवणंही दूर राहिलं. उलट त्यांना समोरून येताना पाहून तो म्हणाला, 'काय महाराज, कसं काय चाललंय तुमचं ?'

त्याची ती इतकी बदललेली वृत्ती पाहून शिष्याला शंका आली. रामकृष्ण हसून शांतपणे म्हणाले, 'हा पैसा बोलतोय बरं. अरे त्याच्याकडं पैसा आला. त्याचा आवाज अन् वृत्ती कशी बदलली पाहिलीस ?' शिष्याच्या

काय ते लक्षात आलं. म्हणून समजूतदार, खरे शहाणे अन् विशेषतः सत्पुरुष हे पैशाच्या लोभात तर नसतातच, उलट त्याच्यापासून जास्तीत जास्त सावध असतात.

यासंबंधीत श्री गोंदवलेकर महाराज यांची एक गोष्ट आहे. माणसाच्या खऱ्या प्रगतीला, किंवा देवप्राप्तीच्या साध्याला किंवा समाधानाच्या ध्येयाला विकारांपासून अनेक गोष्टी आड येतात. त्याविषयी चर्चा चालू होती. काही गोष्टींचा अडथळा कमी असतो, काहींचा जास्त असतो. त्याविषयी श्री महाराजांना विचारता, महाराज म्हणाले, 'विषयवासना आणि पैसा या दोन गोष्टी जास्त वाईट आहेतच पण त्यांतही अधिक वाईट गोष्ट कोणती असं ठरवायचं झालं तर, साधकाच्या दृष्टीनं, स्वास्थाच्या दृष्टीनं अधिक वाईट किंवा अधिक सावध राहण्यासारखी वाईट गोष्ट म्हणजे 'पैसा' होय. त्याचा पदोपदी अनुभव येईल अशा हजारो दुर्दैवी घटनांनी गेल्या काही दशकांचा इतिहास भरून वाहातो आहे.

वास्तविक हेही लक्षात घेण्यासारखं आहे की, या साऱ्या शहाण्या-समजूतदार माणसांना, सत्पुरुषांना 'पैशा'चं माणसाच्या जीवनातलं स्थान कळलं नाही, म्हणून ते असं पैशाच्या विरोधात बोलतात असं नक्कीच नाही. शुद्ध मार्गानं, जरुरीपुरता पैसा स्वकष्टानं मिळवावा, विरक्तीनं त्याचा विनियोग करावा हे साऱ्यांनी उलट आवर्जून सांगितलं आहे. कारण विपन्नावस्थेनं, पैशाच्या अभावानं निर्माण होणारे गरीबीचे चटकेही त्यांना पुरेपूर माहितीचे आहेत. त्या ठिकाणी हाच पैसा औषधाइतकाच गुणकारी आहे हेही ते जाणतात. पण अन्नातल्या मिठासारखं त्याचं प्रमाण फार जपून ठरवावं लागतं, जास्त झालं तर अन्न खाववत नाही, टाकावं लागतं. नकळत, लोभानं किंवा जबरीनं खाल्लं तर विषासारखं उलटून पडतं हेही त्यांनी जाणलं आहे. आपण जाणू तो सुदिन !

२०. अकरावी दिशा

आपला सारा दिनक्रम आणि तसा सारा जीवनप्रवासच मुळात कळत, नकळत एखादी दिशा धरून चाललेला असतो. काही संभ्रमित, दिशाहीन माणसं ध्येयात सारखे बदल करीत असतात. पण तेही दिशा बदलूनच. संभ्रम हाही अनेक दिशा आणि त्यांतल्या निवडीतल्या निश्चिततेचा अभाव दर्शवतो. अगदी लहान मूल झालं तरी उठलं आणि रविवार असला की, लवकर आवरून दिवसभर कसं, कुठं, कुणाकडं, कायकाय खेळायचं याची दिशा त्याच्या डोक्यात असते. मोठ्यांच्या कामाच्या दिशा तर ठरलेल्या असतात. ध्येयांच्याही. अमुक इतका पैसा मिळवणं, अमका जॉब, अमकी कंपनी, ही पोस्ट, हे गाव, अशा पद्धतीचं कामकाजाचं वातावरण - वर्क कल्चर, पुढं अमक्या प्रकारचा जोडीदार, अशा प्रकारचं घर, त्यातली अमुक मांडणी - अशा ज्या असंख्य गोष्टींनी आयुष्य व्यापलेलं असतं त्या त्या गोष्टी या माणसाच्या जगण्याच्या एक प्रकारच्या दिशाच दर्शवीत असतात.

या दिशा इतक्या ढोबळ मानानं सांगता येतात कारण, त्या ठरीव आहेत. पूर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण आणि आग्नेय-नैर्ऋत्य-वायव्य-ईशान्य अशा आठ दिशांसारख्या त्या सर्वांना परिचित असतात. राहतात त्या ऊर्ध्व आणि अधर म्हणजे वरची आणि खालची - ज्या माणूस क्वचितच पाहातो. जग हिंडून पाहण्याची हौस असलेले जसं सांगतात, आमचा दक्षिण भारत पूर्ण झाला. आता पश्चिम व उत्तर.मग पुढच्या सुट्टीत पूर्वेकडं जाणार आहोत, वगैरे. तेच पुढं भारत संपला की, इतर देशांचं सुरू करतात. काही महाभाग तर जगातल्या सर्व दिशांचे देश पाहून झाले, फक्त कुठला तरी उत्तर वा दक्षिण ध्रुव सोडून, वगैरे सांगतात. त्यांनीही अनेकदा पायाखालची जमीन

- म्हणजे स्वदेशातली उत्तम ठिकाणं, गरीबी, शेती, अज्ञान, प्रश्न- अशा अनेक गोष्टी दुर्दैवानं पाहिलेल्या नसतात. तितकंच आपलं आकाश - म्हणजे उत्तुंग व्यक्तित्वं, अपूर्व कामं, कर्ते, हुतात्मे, कर्मवीर, महात्मे, साधू, त्यांची वास्तवं, स्वप्नं, कर्तृत्वं - विचारांची वैभवं, इतकंच काय जवळची देवस्थानं- अशा अनेक वरच्या दिशेच्या गोष्टी अनेकदा पाहिलेल्या नसतात.

तसं असायला हरकत नाही पण या दोन दिशांनी माणसांच्या आठ दिशांतच सरपटणाऱ्या व्यक्तित्वाला महासागराची खोली अन् हिमालयाची उत्तुंगता यांची खरी श्रीमंती येण्याची शक्यता ते गमावतात. फार तर चार ऐवजी दोन पायांवर फिरू शकणारं, स्वतःला स्वतःच थोर, बहुश्रुत, सार्थक समजणारं पण वास्तवात पशुतुल्य जीवन जगतात. पशुपक्ष्यांतसुद्धा साधी चिमणी, कावळा, घार, गरुड ज्या आणि जेवढ्या भराऱ्या जमिनीपासून उंच आकाशात घेऊ शकतात त्याही यांच्या वाट्याला येत नाहीत. तसंच छोट्याछोट्या माशांपासून सागराच्या तळाचा ठाव घेऊ शकणाऱ्या जलचरांची खोलीही आपल्या आयुष्याला हे देऊ शकत नाहीत. ते, त्यांची स्वार्थाची कर्तृत्वं, त्यांची कौतुकाची मुलं, त्यांच्या करिअर, त्यांचे बंगले, त्यांचे इंटिरिअर, अनेक पिढ्यांना पुरणारा त्यांचा पैसा नि एकमेकांची स्तुती करणारं त्यांचं सर्कल, फोटो काढून घेण्यापुरता त्यांचा दानधर्म - एवढंच हे आठ दिशांतलं जमिनीवरचं जग ते जगतात.

ज्यांना उरलेल्या दोन दिशाही कळतात ते कदाचित अशा लौकिक यशांत कमी पडतील, त्यांच्यामागं कुणी भांडावं अशी इस्टेट नसेल पण शास्त्रं, संशोधनं, प्रयोग, सद्गुणांचं आचरण असे असंख्य उपकार या दशदिशा जाणणाऱ्या व्यक्ती जगावर करून जातात. या आठ दिशांचा आणि उरलेल्या दोन महत्त्वाच्या दिशांचा प्रवास घडवणारी आणखीही एक 'अकरावी' दिशा माणसाच्या जगण्याला आहे. ती म्हणजे अंतर्दिशा !

मन आणि मेंदूनं बनणारं जे विलक्षण अंतरंग माणसाच्या ठिकाणी आहे, तिथं ही अंतर्दिशा वास करते. ही अकरावी दिशा माणसाचा उरलेल्या आठ दिशांमुळं घडणारा बहुधा पशुतुल्य किंवा काही प्रमाणात मनुष्यतुल्य प्रवास ठरवते. तसाच ती दिशा माणसाच्या जीवनाला उत्तुंगता आणि खोली देणाऱ्या नवव्या आणि दहाव्या दिशेचा परिणामही घडवते. पण या अकराव्या दिशेची जाणीव फार कमी लोकांना असते. ही दिशा दृश्य नसली तरी ती कितपत विकसित आहे हे माणसाच्या बाहेरच्या वर्तनातून आणि त्याच्या आयुष्याच्या प्रकारावरून सहज कळतं. या अकराव्या अंतर्दिशेचा जाणीवपूर्वक विकास माणसाला देवही बनवील आणि तिच्याकडं दुर्लक्ष माणसाला पशूलाही मागं टाकणारा संकुचित, स्वार्थी जीव बनवील.

एखाद्या गुन्हेगाराच्या कृती घेऊया. तो गुन्हा त्यानं लोभानं, स्वार्थानं केलेला आहे, हे तो स्वतः जाणतो. कदाचित न्यायाधीशही मनानं ते जाणेल. पण पुरेसा पुरावा समोर येत नाही - कधी नष्ट केला जातो - कधी तो कबूल करीत नाही त्यामुळं परिणामी तो सुटूनही जातो. हे अंतर्दिशेच्या अविकसित, विघातक स्थितीवर ठरतं. पण ही अकरावी दिशा सत्य जाणते. त्याच्यामागं अस्वास्थ्य, भय, काळजी अशा अनेक रूपानं लागते. बाहेर मनुष्य कितीही गप्प राहील, निगरगट्टपणा करील पण ही अंतर्दिशा जो आकांत करते तो त्याला टाळता येत नाही. त्याचे पडसाद योग्य वेळ येताच बाहेरही उमटतातच. अविकसित अंतर्दिशा आपल्यापुरतं जगेल, स्वार्थ पाहील - शेवट एकाकीपणात आणि अस्वास्थ्यात होईल. विकसित असेल तर भले दोनच भाकऱ्या असतील पण चौघांत अर्धी-अर्धी खाईल अन् स्वास्थ्याची ढेकर देईल. या साऱ्यासाठी माणसाच्या जीवनाला निसर्गानं दिलेली ही अकराव्या दिशेची महत्त्वाची देणगी भान ठेवण्यासारखी आहे, लक्षपूर्वक विकसित करण्यासारखीही आहे.

म्हणून आठ दिशांची ओळख जितकी लवकर आणि सहज मनुष्य करून घेतो, काही जाणीवपूर्वक जगणारी माणसं उरलेल्या दोन दिशांचीही ओळख करून घेतात व आपलं जीवन घडवतात, तसंच या अकराव्या अंतर्दिशेची ओळख आणि विकास हे किती जरूरीचं काम आहे हे जाणवू शकेल. माणसाच्या आयुष्यातल्या कृतींचे हेतू, त्यांमागचे विचार, त्यांची विधायकता, त्यांचा कल्याणकारीपणा, त्यांचा समाजाला उपयोग, त्यांचा व्यक्तिगत उद्धाराला उपयोग या साऱ्या गोष्टी या अंतर्दिशेच्या जाणिवेवर अवलंबून आहेत. तिची स्थिती जेवढी म्हणून शुद्ध, निर्मल करता येईल तेवढं बरं. ते करणं किती सोपं, किती कठीण असतं हे ठरवायचं असेल तर एक छोटीशी गोष्ट पहावी.

एक परदेशी गृहस्थ विमानानं भारतात प्रथमच मुंबईत उतरले. त्यांना दिल्लीला जायचं होतं. मुंबईच्या चक्रव्यूहातून बाहेर पडल्यावर त्यांनी चौकशी केली की, दिल्लीला किती वेळ लागेल ? तेव्हा जवळच्या समजूतदार माणसानं सांगितलं की, 'तुम्ही याच रस्त्यानं आणि याच दिशेनं जाणार असलात तर दिल्लीला पोचणं फार कठीण आहे.' कारण ते गृहस्थ दक्षिणेला जाणाऱ्या दिशला उभे होते. तो म्हणाला, 'तुम्ही बरोबर उलट दिशेला वळलात आणि जात राहिलात तर दीड दिवसात तुम्ही दिल्लीला पोचाल !'

तसं आहे. आपल्याला आपल्या सध्याच्या स्वार्थ-चैन-करमणूक-पैसा-चंगळ या दिशा कायम ठेवायच्या असतील तर समाधानाचा स्रोत असलेल्या या अंतर्दिशेला पोचणं अर्थातच कठीण आहे. पण आपण सध्याची दिशा बदलायला तयार असू तर मात्र ते सोपंही आहे. कारण ही दिशा आपल्या प्रत्येकातच आहे.

आणखीही एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. एका माणसानं आयुष्यभर पैसा-पैसा करून प्रचंड संपत्ती गोळा केली. तिचे गुणही त्याच्या

बरोबर आले. मतलबी नातेवाईक, लक्ष ठेवून असलेले चोर-दरोडेखोर, त्यांची भीती, काळजी, पुढची व्यवस्था, एरवी सततची अस्वस्थता, आणखी संपत्ती मिळवण्याची निर्माण झालेली हाव, त्यासाठी नव्या मार्गांचा व ते सुचवणाऱ्यांचा शोध इत्यादी इत्यादी..या साऱ्या जीवनाच्या दिशेनं तो एक दिवशी उबगला. स्वतःच्या पोटाला किती पैसा गरजेचा आहे ते त्यानं ठरवलं. जगाच्या कल्याणासाठी झटणारी एक संस्था हुडकली. तिला देणगी द्यायची ठरवली. या देणगीबद्दल कुठलेही आभार-कार्यक्रम-प्रतिक्रिया न देण्याची विनंती केली. गरजेच्यापेक्षा जास्त असलेल्या आपल्याकडच्या उरलेल्या सर्व रकमेचा एक चेक त्यानं काढला. त्या चेकवर सही करायला त्याला फक्त काही क्षण लागले. त्या दिवशी कित्येक वर्षांनी तो निश्चिंतपणे प्रथमच शांत झोपी गेला. त्याला अकरावी दिशा कळली होती.

साठवलेलं कितीही असलं, चुकीच्या दिशांनी कितीही मार्ग चाललेले असले तरी अंतर्दिशेला वळण्यासाठी लागते ती फक्त एक जाग, हवी ती फक्त एक तळमळ, निर्धार अन् एक छोटीशी कृती - एका सहीपुरती, जी करायला फक्त काही क्षण लागतात !

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. **साधनप्रेरणा** : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. **मेरी यात्रा (हिंदी)** : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. **बोधपाठ** : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. **एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह)** : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. **सृष्टिसंदेश : (विवरणासह)** : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. **गुरुतत्त्वतरंगिणी** : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत**

४२. **नाम (इंग्रजी आवृत्ती)** : **The Simplest Path For Spiritual Liberation**

४३ ते ५४. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके)** :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. **शिदोरी** : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. **विचारविसावा** : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. **सारविस्तार भाग २** : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. **महाराजांची शाळा** : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. **साधनपदावली भाग २** : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. **आरतीपुष्पमाला** : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. **विनवणीची वाणी** : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. **श्रद्धेची पहाट** : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. **उपासनामाला** : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. **पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. **अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. **कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)** श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

सत्प्रवृत्तींच्या
धूसर वर्तमानातही
विचार करण्याच्या
आवश्यक, विधायक, उपयुक्त,
सोप्या भाषेतल्या –
दिशा.....